
माफसु यशोगाथा





















MAHARASHTRA ANIMAL & FISHERY SCIENCES UNIVERSITY NAGPUR


प्रस्तावना



पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन आणि शेळीपालन या क्षेत्रातील असंख्य उद्योगांच्या संधी पाहता या व्यवसायांना पुढील काळातही उज्वल भविष्य राहणार आहे. या क्षेत्रात बेरोजगार तरुणांनी यशस्वी होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत. आजच्या युगात यशस्वीता ही व्यक्तीच्या सांपत्तीक स्थितीवर अवलंबून नसून नवीन तंत्रज्ञानाची कास धरणाऱ्या आणि यशासाठी मेहनत घेण्याची तयारी असणाऱ्या कोणाही व्यक्तीला यश मिळू शकेल. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या संलग्नीत महाविद्यालयांमार्फत मिळणाऱ्या तांत्रिकदृष्टया परीपूर्ण अशा विविध प्रशिक्षणांमार्फत आणि वेळोवेळी मिळणाऱ्या मार्गदर्शनामुळे बऱ्याच शेतकरी बांधवांनी पशुसंवर्धन आणि संलग्नीत जोडधंदयांमध्ये आपला जम बसविला आहे. अशा निवडक होतकरु पशुपालकांची यशोगाथा ही इतर पशुपालक आणि बेरोजगारांकरिता एक आदर्श संदर्भ पुस्तीका ठरेल.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरच्या यशोगाथेद्वारे प्रस्तुत यशोगाथांमधून अशिक्षित किंवा बेरोजगार ते उच्च विद्याविभूषित अनेकांनी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, दुग्धतंत्रज्ञान आणि मत्स्यव्यवसायाद्वारे स्वत:चा आर्थिक आणि सामाजिक स्तर उंचावला असून, या यशोगाथा इतर अनेकांना या क्षेत्रात पदार्पण करण्यास प्रेरणादायी ठरतील आणि उत्तम यश, धन, प्रतिष्ठा प्राप्त करण्यात सहाय्यक ठरेल अशी मला आशा आहे.

प्रा. आ. मो. पातुरकर
कुलगुरु






पदवीधर युवकाने पशुपालनातून साधली आर्थिक भरभराट

कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी त्या क्षेत्राची अथवा निगडीत करू पाहत असलेल्या व्यवसायासंबंधीची सविस्तर माहिती असणे आवश्यक असतं. त्यामुळे नंदकिशोर या पदवीधर युवकाने पोलीस बनण्याची संधी चालून आली असतांना ती झुगारून दिली, कारण त्याला स्वयंरोजगार करायचा होता. त्यांच्या जवळ आत्मविश्वास, प्रचंड इच्छाशक्ति असल्यामुळे पशुवैद्यकीय महाविद्यालयातील तज्ञांच्या मार्गदर्शनातून दुग्धव्यवसाय करण्याचे ठरविले. त्यासाठी जिवापाड मेहनत करण्याची त्यांची मानसिक तयारी असल्यामुळे त्यांनी दुग्ध व्यवसायास सुरवात केली.

उपरोक्त व्यवसाय करण्यासाठी लागणारी जागा मोकळी असल्यामुळे त्यामध्ये गोठा तयार करून त्यात गाई, म्हशींची व्यवस्था, तेथील स्वच्छता, चारा, पाणी, औषधोपचार यांची निगा राखणे ही सर्व जवाबदारी ते पत्नीच्या सहकार्याने दोघे मिळुन पार पाडताहेत. त्यासाठी त्यांनी जनावरांच्या चाऱ्यासाठी लागणारी ओलीताखालील एक एकर जमीन सुध्दा विकत घेतली. त्यात विहिर तयार केली, याच ठिकाणी घराची पुनर्बांधणी केली. त्यासाठी त्यांना नाबार्ड बॅके कडुन आणि अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाकडुन कर्ज काढावे लागले. त्यातून त्यांनी नवीन जनावरे घेवुन व्यवसायात भर पाडली.

अथक परिश्रमातून आज त्यांच्या कडे देशी जातीच्या आठ म्हशी, दोन बैल व सहा म्हशींची वासरे आहेत. त्यातून त्यांना दररोज ३५ लिटर दुध मिळते. ते दुध ५० रू लिटर प्रमाणे उदगीर शहरात विक्री केली जाते. त्यामुळे महिन्याकाठी त्यांना कमीत कमी रू ४०,०००/- ते ४५,०००/- उत्पन्न मिळते. दरवर्षी वर्षाकाठी या जनावरांपासुन जे शेणखत तयार होते ते कमीत कमी १५ ते १६ ट्रॅक्टर निघते आणि ते सुध्दा रू ३५००/- प्रति ट्रॅक्टर या दराने विकल्या जाते. ही सारी मिळकत त्यांच्या कठोर मेहनतीचं फळ आहे यात दुमत नाही. भविष्यात या व्यवसायासोबतच कुक्कुटपालनाचा व्यवसाय करण्याचा त्यांचा मानस आहे.

श्री. नंदकिशोर रमेश बिरादार,
रा. मांजरी, ता. उदगीर

मार्गदर्शक :

प्रा. डॉ. अनिल भिकाने व डॉ. शरद आव्हाड

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर







मुक्त संचार गोठा पद्धती : एक प्रगतीचा मार्ग

श्री. व्यंकटराव यांनी मुक्त संचार गोठा पध्द्तीने पशुपालन करण्याचे ठरविले. आई-वडीलां समवेत शेतीव्यवसाय कुटुंबातील सर्वच लोक करतात पैकी दोन भाऊ नोकरी करतात. सन् २००५ साली बंदीस्त गोठ्याची प्रथम सुरूवात व्यंकटरावांनी केली. परंतु त्यांना मुक्त संचार गोठा पध्दत करायची असल्यामुळे त्यांनी पशुवैद्यकीय महाविद्यालयातील तज्ञांकडुन माहिती घेवून २००७ या वर्षापासुन जनावरांसाठी मुक्त संचार गोठा पध्दतीचा वापर करण्यास सुरवात केली. वडिलोपार्जित ६ एकर लागवडीखालील जमिन असुन त्यातील एक एकर जमिनीत त्यांनी सुधारीत चारा पिके धारवाड नेपियर, यशवंत व लसुणघासची लागवड करण्यास सुरवात केली.

मुक्त संचार गोठ्यामुळे गाईना होणारा आजार जसे कासदाह व गोचिडताप यांचे प्रमाण नगन्य झाले. गाईंच्या मुक्त हालचालींमुळे खुरांचे आजार कमी झाले. अपचनाच्या समस्या देखील कमी झाल्या. त्यामुळे गाईच्या दुधात मोठ्या प्रमाणात वाढ होवू लागली. रोगराई साठी लागणारा औषधोपचार त्यातही बचत झाली. मुक्तसंचार गोठ्यामुळे दैनंदिन कामासाठी लागणारा मनुष्यबळाचा वापर ही कमी झाला.

आज त्यांच्या जवळ ५ एच.एफ. गायी व ४ वासरे चांगल्या वंशावळीच्या असल्यामुळे त्यांना दररोज ५० लिटर दुधाचे उत्पादन मिळते. ते दुध २२/- रू. प्रति लिटर दराने दुग्धसहकारी संस्थेला विकल्या जाते. जनावरांपासुन मिळणारे दुध व शेणखत विक्रीतून दर महिन्याला ३५,०००/- रू आवक येते. एकंदरीत उत्पन्नात वाढ झाल्यामुळे नवीन घराचे बांधकाम, नवीन मोटर गाडी तसेच एका व्यक्तिस रोजगार मिळवून दिला.

त्यांनी जनावरे खरेदी करिता नाबार्ड अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण बॅकेकडुन कर्ज घेवून उत्तमरितीने गोठ्याचे सुध्दा बांधकाम केले. स्वत:च्या व्यवसाया बरोबरच गावातील व परिसरातील शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसायासाठी ते नेहमी मार्गदर्शन करतात.

श्री. व्यंकटराव सोपानराव पस्तापुरे,
रा. तळेगाव, ता. अहमदपूर, जि. लातूर

मार्गदर्शक :
प्रा. डॉ. अनिल भिकाने व डॉ. शरद आव्हाड
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर



मराठवाडी म्हैस पालनातून साधली आर्थिक प्रगती


श्री. राम वडले यांच्याकडे ७ एकर जमीन असून सर्वच कुटुंब शेती सोबत पशुपालन व्यवसाय करतात. त्यांनी पशुवैद्यकिय महाविद्यालय, उदगीर येथुन आठ दिवसांचे दुग्धव्यवसाय विषयी प्रशिक्षण घेऊन शेतीला जोड व्यवसाय म्हणुन दुग्धव्यवसाय सुध्दा सुरू केला. उपरोक्त महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या गावाचा पशुपालक असल्याचा त्यांना फायदा मिळाला.

त्यांच्याकडे आठ मराठवाडी म्हशी, दोन बैल व चार वासरे असल्यामुळे दुग्धउत्पादन २५ लिटर निघत असुन ते ५०/- रू. प्रतिलिटर दराने स्थानिक मिठाई विक्रेत्यांना विकण्यात येते. त्यातुन महिन्याकाठी रू. ३०,०००/- सर्व खर्च वजा जाता उत्पन्न मिळते.

एक एकर जागेमध्ये सुधारीत पध्दतीची यशवंत व धारवाड नेपीयर यांची लागवड करून ते चारापिके घेत असतात. तसेच एका बेरोजगाराला रोजगार सुध्दा उपलब्ध करून दिला. उपरोक्त व्यवसायातून जो नफा झाला त्यातून बहिणीला उच्चशिक्षित केले. राहत्या घराची सुधारणा व एक नवीन दुचाकी सुध्दा खरेदी केली.

श्री. राम विश्वनाथ वडले,
गाव कोदळी, ता. उदगीर,
जिल्हा लातूर

मार्गदर्शक :
प्रा. डॉ. अनिल भिकाने व डॉ. रविंद्र जाधव
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर






देवणी गोपालनातून मिळाली घरखर्चाला साथ

श्री. बच्चेसाहेब देशमुख यांच्याकडे असलेल्या दोन एकर शेती तसेच पशुपालनाच्या व्यवसायामध्ये पत्नी, दोन मुले, दोन मुली या सुध्दा सहकार्य करतात. देशमुखांना गोवंशाबद्दल प्रेम असल्यामुळे ते जातीवंत देवणी गोवंशाचे पालन करीत आहेत. सोबतच शासकिय तंत्रनिकेतन महाविद्यालय, लातूर या ठिकाणी चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणुन कार्यरत आहेत.

एखादा व्यवसाय करतो म्हटले तरी, त्याची पुरेशी माहिती असणे आवश्यक आहे. तेव्हा देशमुखांनी पशुवैद्यकीय महाविद्यालयातील तज्ञांच्या सहकार्याने तसेच कृषि विद्यापीठ, परभणी येथे सहा दिवसांचे प्रशिक्षण (दुग्धव्यवसाय) घेवून रितसर दुग्धव्यवसायाची सुरवात केली.

त्यासाठी त्यांनी प्रथम जनावरांच्या निवाऱ्याची घराच्या पुढे सोय केली. त्यात २ देवणी गाई, २ कालवडी खरेदी केल्या. सध्या त्यांच्याकडे ५ देवणी गाई, ४ कालवडी आहेत. जनावरांसाठी पाण्याची सोय म्हणुन त्यांनी एक एकर जमीनीत दोन बोअरवेल खोदल्या. सोबतच चाऱ्यासाठी यशवंत, मारवेल व मका (आफ्रिकन टॉल) यासारखी चारापिके घेतली. शेती व पशुपालन सेंद्रीय पध्दतीने करीत असल्यामुळे देवणी गाई पासुन दररोज ८ लिटर दुध निघते. ते १०० रू प्रति लिटर दराने लातुर शहरात विकल्या जाते. एकंदरीत त्यांच्या दुध व दुग्धजन्य पदार्थाना जास्त मागणी आहे.

जनावरांपासुन निघणारे गोमुत्र दररोज ५ ते ६ लिटर निघत असल्यामुळे ते २५/- रू. प्रति लिटर या दराने धार्मिक कार्यासाठी तसेच टोमॅटो, वांगे, भाजीपाल्यावर फवारणीसाठी विकत घेऊन जातात. तसेच तुप सुध्दा ७ ते ८ किलो निघते. ते १८००/- रू प्रति किलो दराने प्रतिवर्षी विकल्या जाते. दरवर्षी शेणाच्या १५०० गोवऱ्या १०/- रू प्रति गोवरी म्हणुन विकल्या जातात. तसेच सदर देवणी गायींच्या कालवडी व गायीच्या विक्रीतून त्यांना ३.५ लक्ष रूपयांचा तीन वर्षात फायदा झाला आहे. त्यातून त्यांनी सोने खरेदी केले, घरही बांधले व एका मुलीचे लग्नही केले. उपरोक्त देवणी गोपालनात सर्वांनी सहकार्य दिल्यामुळे हे शक्य झाले. प्रत्येक वर्षी राज्यातील विविध पशुप्रदर्शनात त्यांच्या कालवडी व गाईंना बक्षिसे मिळतात. देवणीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी राज्यातील विविध कार्यक्रमात पशुपालकांना ते मार्गदर्शन करतात.

श्री. बच्चेसाहेब व्यंकटराव देशमुख
रा. बाभळगाव, ता. जि. लातूर

मार्गदर्शक :
प्रा. डॉ. अनिल भिकाने व डॉ. शरद आव्हाड
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर





जिद्द व आत्मविश्वासाच्या साथीने बनला यशस्वी दूध उत्पादक

श्री. प्रकाश कणकुरे यांचा वडिलोपार्जित ५ एकर मध्ये शेतीचा व्यवसाय असुन पत्नी समवेत मुले, मुली सर्वच शेतात राबतात. तरी देखील त्यांनी प्रचंड इच्छाशक्ति, जिद्द व स्वत:वर असलेल्याच आत्मविश्वासाच्या भरवशावर एक कर्तबगार दुध उत्पादक म्हणुन जनमाणसांसमोर उदाहरणारादाखल स्वत:ला सिध्द केले.

दुग्धव्यवसाय सुरू करण्याआधी त्यांनी पशुवैद्यकीय महाविद्यालयातून दुग्ध व्यवसायासंदर्भात संपूर्ण माहितीनिशी म्हशीपालन करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी शेपटी-शेवटी पध्दतीचा हवेशीर व सुर्य प्रकाशित शास्त्रशुध्द असा गोठा बांधला. म्हशी घेतांना त्यांची वंशावळ, दुधाची क्षमता, पशुवैद्यक तज्ञांकडुन शारिरीक तपासणी यात आपली फसगत तर होणार नाही ना याची संपूर्ण शहनिशा करूनच मुऱ्हा जातीच्या १५ म्हशी खरेदी केल्या. त्यांच्या चाऱ्यासाठी धारवाड, नेपियर, मारवेल, यशवंत, गजराज, लसूणघास या सारखी उच्च प्रतिची अन्न द्रव्ये असलेल्या चारापिकांची लागवड केली. कडबाकुट्टी यंत्राच्या सहाय्याने हिरवा व वाळलेला चारा बारीक करूनच टाकल्यास चाऱ्यांची मोठ्या प्रमाणात बचत होते असे कणकुरे यांचे ठाम मत आहे.

उपरोक्त पध्दतीचा गोठा बांधल्यामुळे म्हशीचा माज ओळखणे, शेण मुत्राची स्वच्छता, तोंडावाटे पसरणाऱ्या आजारांना रोखणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे दुध काढणे सोपे झाले. त्याच प्रमाणे वांझ असलेल्या म्हशीवर उपचार करणे सुलभ झाले. सोबतच गोठयाला भेट देण्यास कोणी आले असता म्हशी विचलित होत नाहीत, हेही कणकुरे यांच्या लक्षात आले. उपरोक्त म्हशी व्यतिरिक्त त्यांच्याकडे २ लाल कंधारी गाई, २ दोन बैल व एक रेडा आहे.

दररोज ६० लिटर इतके दूध उत्पादन होते व ते ५०/- रू प्रति लिटर दराने विकल्या जाते. दुधाच्या विक्रीतून खर्च वजा जाता त्यांना दररोज २०००/- रू नफा मिळतो. तसेच वार्षिक ३० ते ३५ ट्रॅक्टर शेणखताच्या विक्रीतून रू. ३००० प्रति ट्रॅक्टर याप्रमाणे ९०,०००/- ते १,०५,०००/-रू पर्यंत उत्पन्न मिळते. जशी वाढ दुग्धव्यवसायात भरघोस प्रमाणात झाली तशीच वाढ शेती उत्पन्नातूनही झाली. दोन्ही व्यवसायातून झालेला नफा त्यातून सोनं, मालगाडी तसेच मुलांचे उच्चशिक्षण देखील केले.

श्री. प्रकाश यांनी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय संबंधीचे तीन दिवसाचे प्रशिक्षण घेतले आहे. हा व्यवसाय ते ८ वर्षापासुन सातत्याने करीत आहेत. दुध पॅकिंगसाठी हॅन्ड मशिन घेतली, त्यासाठी १०,०००/- रू. महिना एका कामगाराला दिला जातो.

श्री. प्रकाश व्यंकटराव कणकुरे
रा. सुकणी, ता. उदगीर जि. लातूर

मार्गदर्शक :
प्रा. डॉ. अनिल भिकाने व डॉ. शरद आव्हाड
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर





पशुपालनाने अर्थाजनात भर पाडला


श्री. प्रकाश पाटील यांच्या आईवडीलांचा शेतीचा व्यवसाय होता. सेनेतुन १९९८ ला सेवानिवृत्त झाल्यानंतर घरच्या परिस्थितीमुळे २ वर्षे त्यांनी किर्लोस्कर कंपनीमध्ये पहारेकऱ्याची नोकरी केली. काहीतरी व्यवसाय करायचा हया विचाराने ते अस्वस्थ व्हायचे, म्हणुन त्यांनी पहारेकऱ्याची नोकरी सोडून पत्नीकडे असलेलं सोनं विकुन द्राक्ष बाग सुरू केली. त्यांच्या कडे उपलब्ध एक एकरमध्ये विहीर व दोन खोल्यांच घर होतं. द्राक्षबागेसोबतच २-३ म्हशी घेतल्या. परंतू द्राक्षबागेमुळे वाढणारा खर्च, रोग, अवकाळी पाऊस त्यामुळे होणारे नुकसान असहय झाल्यामुळे २००६ मध्ये त्यांनी २ एच. एफ. गायी, २ मुऱ्हा म्हशी (हरियाणा) घेवुन तसेच एक चाराकुट्टी यंत्र घेऊन २० x १० फूट जागेत पशुपालन व्यवसाय सुरू केला. एक एकरमध्ये केवळ चारा पिकांची लागवड केली. परंतु सुरवातीला या व्यवसायात दुधाला फॅट, एस.एन.एफ कमी लागणे, पशुखाद्यावरील खर्च वाढणे ईत्यादि अडचणी आल्या. तेव्हा नवीन पोषक चारा उत्पादन व आहार व्यवस्थापनाद्वारे होणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी त्यांना डॉ. प्रफुल्लकुमार वसंतराव पाटील यांचा सल्ला फायदेशीर ठरला.

वासरांची वाढ करून गायी-म्हशी विकत न घेता घरच्या घरीच तयार केल्या. ४० x ३० फूट जागेत सध्या १० एच. एफ. गायी, ३ कालवडी, १ म्हैस, १ रेडा, १ खिल्लार गाय असे मिळुन एकंदर १६ पशुधन आहेत. दररोज १०० लिटर दुधाचे वर्षभर उत्पादन होते. त्यातील ५५ टक्के खर्च वजा जाता ४५ टक्के नफा होतो, असेही प्रकाश यांनी सांगीतले. एक एकर मध्ये केवळ चारा उत्पादन करून त्यावरच १६ पशुधनाचे संगोपन होत असते. कुठलेही प्रशिक्षण न घेता केवळ डॉ प्रफुल्लकुमार वसंतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाने माहिती घेत राहिले. जनावरांना लसीकरण, जंतनिर्मूलन व क्षार मिश्रण वेळोवेळी व नियमितपणे दिले जाते. महिन्याकाठी रू. २०,०००/- ते २५,०००/- इतका नफा त्यांना मिळतो. दुध संकलन केंद्र सुरू केले त्यात दररोज ३०० लिटर दुध संकलन होते. या व्यवसायात पत्नीचा मोठा सहभाग असल्यामुळे कामासाठी कामगारांची गरज भासली नाही. दुधव्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नातून बंगला बांधला, मुलाला शिक्षित केलं, मुलीचे लग्न केले. त्यामुळे आज समाजात सुखी कुटुंब म्हणून प्रतिष्ठा मिळते आहे. ही सर्व प्रतिष्ठा पशुधन व दुग्धव्यवसायाने मिळवून दिल्याचा त्यांना सार्थ अभिमान आहे.

भविष्यात दुग्धव्यवसायासमवेत शेळीपालन करण्याचा मानस आहे. त्यासाठी जिद्द, मेहनत, चिकाटी, व नियोजन असल्यामुळे तसेच पत्नी व डॉ पाटील यांच्या सहकार्यामुळेच उपरोक्त यश संपादन करता आले, असेही प्रकाशराव म्हणाले.

श्री. प्रकाश रामचंद्र पाटील
मु.पो. बांबवडे, ता. पलुस, जि. सांगली

मार्गदर्शक :
डॉ. प्रफुल्लकुमार वसंतराव पाटील
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय,उदगीर जि. लातुर






पशुधन व दुग्धव्यवसायाने प्रतिष्ठा मिळविली

श्री. श्रीकांत हणमंत पाटील यांच्या आई-वडीलांचा व्यवसाय शेती होता. कुटुंबात ६ जण होते, शिक्षण फारसे नसल्यामुळे नोकरीसाठी पाटील यांनी प्रयत्न केले नाहीत. त्यांच्याकडे ३ एकर जमीन असल्यामुळे त्यांनी द्राक्षबाग सुरू केली. तसा बराच काळ त्यांनी द्राक्षबागायत केली, परंतु नुकसानीमुळे त्रस्त झाले आणि मोर्चा त्यांनी दुग्धव्यवसायाकडे वळविला. २००६ मध्ये दुग्धव्यवसाय हा मुख्य व्यवसाय म्हणून सुरू केला. सुरूवातीला एच.एफ. गाय व मुऱ्हा म्हशी सांभाळण्याची भिती वाटायची. परंतु डॉ. प्रफुल्ल पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे २० x ३० फूट जागेत पत्र्याच्या शेडमध्ये कुट्टी यंत्र विकत घेवुन उपरोक्त जनावरांची व्यवस्था केली. प्रथमत: व्यवसायात दुधाला फॅट, एस.एन.एफ कमी लागणे, पशुखाद्यावरील खर्च वाढणे, निकृष्ठ चारा अशा अनेक अडचणींना सामोरं जावं लागले. तेव्हा डॉ. पाटील यांच्याकडून सल्ला घेवून आहारातील योग्य बदल व नवीन पोषक चारा उत्पादन करून त्यांनी अडचणीवर मात केली. स्वत: जवळ असलेली रक्कम व बॅकेकडून घेतलेले दोन लाख कर्ज असं एकंदरीत भांडवल उभं करून व्यवसायाची उभारणी केली.

५० x २५ फूट जागेत ११ एच.एफ. गायी, ४ मुऱ्हा म्हशी, ७ कालवडी असे एकुण २२ पशुधन असुन आज व्यवसायात त्यांनी आपला जम बसविला आहे. कडबा कुट्टी यंत्र व मुक्त संचार गोठा पध्दतीचा वापर करून आधुनिक व्यवस्थापनाचा आदर्श निर्माण केला. गोठा पद्धतीमुळे गायींच्या पायाच्या समस्या कमी होवुन कासदाहाचे प्रमाण अत्यल्प, दुधाच्या उत्पादनात वाढ व जनावरांच्या आरोग्यातही सुधारणा झाल्याचे पाटील आनंदाने सांगतात. जयवंत गवत, कडबा, ऊस आदि चाऱ्याचा व संतुलीत खाद्याचा वापर पाटील यांच्याकडे सुरू आहे. हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाद्वारे चारा उत्पादनाचा येत्या ४ महिन्यात इरादा आहे. मुक्त संचार गोठयासाठी रू. तिस हजार ही गुंतवणुक उत्पादनातूनच पाटील यांनी केली आहे. सध्या पशुखाद्याचे वाढते दर, गायींच्या दुधाला मिळणारा कमी भाव या अडचणी आल्यात, पण ते खचले नाहीत.

श्री. पाटील व त्यांच्या पत्नी खूप काळजीपुर्वक, नेटाने पशुधनाचे व्यवस्थापन यशस्वीपणे करीत आहेत. त्यामुळे १०० ते १२० लिटर दूधाचे उत्पादन दररोज होत असल्यामुळे रू. ४५००० ते ५०००० इतका नफा महिन्याकाठी त्यांना होत आहे व शेतीसाठी मुबलक शेणखत असल्याने रासायनिक खतावरील खर्चात फार मोठी बचत होत असल्याचे पाटील यांनी आवर्जुन सांगीतले. मुक्तसंचार गोठयामध्ये पिण्याच्या पाण्याची सोय २४ तासाकरीता केली आहे. दिवसातुन दोन वेळा कुट्टी केलेला चारा विभागुन जनावरांना दिला जातो. वेळोवेळी लसीकरण, जंतनिर्मुलन व दररोज क्षार मिश्रणाचा आहारात वापर केला जातो. त्यामुळे जनावरांच्या औषधोपचारावरील खर्च नगण्य आहे. परिश्रम, चिकाटी, चिकित्सक वृत्ती बरोबर आहार नियोजन, घरच्या घरी चारा निर्मिती हे सर्व मुक्त संचार गोठा पद्धतीच्या यशाचं सूत्र आहे. या यशाचे श्रेय ते सौ. पाटील आणि डॉ. पी. व्हि. पाटील यांना देतात.

व्यवसाय सुरू करण्यापूर्वी मिळणाऱ्या अल्प उत्पन्नातुन संसार कसातरी सुरू होता. तो आज मिळणाऱ्या उत्पन्नातुन सर्व खर्च वजा जाता कुटुंब समाधानाने, समाजात प्रतिष्ठेने राहताहेत. हा मान व प्रतिष्ठा मला पशुधन व दुग्धव्यवसायाने मिळवून दिला असे ही ते म्हणतात. कोणताही व्यवसाय करा परंतु आत्मविश्वास, परिश्रम, जिद्द आणि तज्ञांव्दारे मार्गदर्शन घेवुनच करा, असा सल्ला त्यांनी बेरोजगार युवकांना दिला आहे.

श्री श्रीकांत हणमंत पाटील
मु.पो. बांबवडे, ता. पलूस, जि. सांगली

मार्गदर्शक :
डॉ. प्रफुल्लकुमार वसंतराव पाटील
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय,उदगीर जि. लातुर







दुग्धव्यवसायासोबत शेळीपालनाचा बेत

सहा सदस्य असलेले लालबांडगे यांचे कुटुंब. आई-वडील शेती करायचे. शिक्षणात मन लागत नसल्यामुळे शिक्षण सोडुन श्री. विवेकानंद यांनी २ वर्षे किराणा व्यवसाय केला. तो ही फारसा जमत नसल्यामुळे २०११ ला २५ x १० फूट जागेत पत्र्याचं शेड उभारून ४ मुऱ्हा म्हशी घेवून दुग्धव्यवसाय सुरू केला. परंतु उत्पादित दुधाला योग्य तो भाव न मिळणे व गिऱ्हाईकांचा तुटवडा, चाराटंचाई अशा अडचणी निर्माण झाल्या. तरी देखील जास्त दूध उत्पादनांच्या वेळी खवा व पेढा तयार करून विक्री केला. जनावरांच्या आहारात बदल, नवीन पोषक चारा, उत्पादन करून चारा टंचाईवर मात केली. अझोला उत्पादनाव्दारेही चाराटंचाई वर काही प्रमाणात मात केली. हे सर्व डॉ प्रफुलकुमार वसंतराव पाटील यांच्या सल्ल्याने शक्य झाले.

स्वत: जमा केलेल्या रक्कमेतून काही भांडवल उभे करून ७०x३० फूट शेडची उभारणी केली. त्यात असलेल्या ४ मुऱ्हा म्हशींपासून २५ लीटर दूध रोज उत्पादन होते. ते दूध रू.४० प्रतिलिटर प्रमाणे गावातंच विकल्या जाते. त्यामुळे प्रत्येक महिन्याकाठी खर्च भागवून रू. १५०००/- इतका नफा मिळतो. या व्यवसायात खांद्याला खांदा लावून पत्नी सुध्दा साथ देत असते. त्यामुळे कामगारांची गरज भासत नाही. श्री. विवेकानंद हालबांडगे यांना पशुपालनाबद्दल एवढी आवड होती की, त्यांनी दुग्धव्यवसायासंबंधी प्रशिक्षण, दुग्धजन्यपदार्थ निर्मिती प्रशिक्षण, शेळीपालन प्रशिक्षण, निकृष्ट चाऱ्यावर प्रक्रिया करून सकस आहार निर्मिती, अझोला संवर्धन या विविध प्रशिक्षणांमध्ये हिरीरीने भाग घेवून त्याचा दुग्धव्यवसायामध्ये वापर केला. प्रशिक्षणामधुन आहार, नियोजन, उत्पादन खर्च कमी करणे, लसीकरण, जंतनिर्मूलन, चारा उत्पादन इत्यादिचे त्यांनी ज्ञान संपादन केले. चाराटंचाई काळात जनावरांना अझोला उत्पादन घेवून सकस आहार पुरवठा केला, त्यामुळे दूध उत्पादन टिकविण्यास मदत झाली असेही विवेकानंद सांगतात. त्यांचेकडे २.५ एकर शेती आहे. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत व चारा टंचाईतही चारा व पशुखाद्य याचा समतोल ठेवून प्रतिदिन २५ लि. दुध उत्पादन घेतले जाते. दुग्धव्यवसायाबरोबर लहान नर करडं खरेदी करून त्यांना उत्तम आहार देवून जलद वाढ करून विकण्यासाठी एकुण १६ नर करडं खरेदी करून त्यांचे संगोपन जोमाने सुरू आहे. बोकडपालनातुन आणखी नफा वाढविण्यास मदत होईल अशी विवेकानंद यांची खात्री आहे. पशुखाद्याचे वाढते दर ही मुख्य समस्या आहे. दुग्धव्यवसायाबरोबरच शेळीपालन मोठ्या प्रमाणात करणे ही भविष्यातील तरतुद आहे. मेहनत, चिकाटी, नवीन ज्ञान घेण्याची लालसा, त्याचबरोबर आहार नियोजन, घरच्या घरी चारा निर्मिती, दुग्धजन्यपदार्थ निर्मिती हे त्यांच्या यशाचे सूत्र आहे.

पत्र्याचं घर होतं ज्यावेळी उपरोक्त व्यवसाय सुरू केला. त्यावेळी पैशाची उणीव भासत होती. मिळणाऱ्या मिळकतीतून कसातरी संसार सुरू होता. सध्या मिळणाऱ्या उत्पन्नातुन नवीन घर बांधून कुटुंब समाधानाने, समाजात सन्मानाने राहत आहे. गरजे एवढा पैसा सध्या हातात आहे. याचे श्रेय ते पत्नी आणि डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांना देतात. व्यवसाय करताना कष्ट, चिकाटी व तज्ञांव्दारे मार्गदर्शन व प्रशिक्षण घेवुन करा असा सल्ला ते बेरोजगार युवकांना देतात.

श्री. विवेकानंद विठठल हालबांडगे
मु.पो कुरूळा, ता. कंधार, जि. नांदेड

मार्गदर्शक :
डॉ. प्रफुल्लकुमार वसंतराव पाटील
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय,उदगीर जि. लातुर






शेळीपालनातून अडचणींवर मात

श्री. दिनेश कोनमारे यांचे वडील सैन्यात होते, त्यांच्या कुटुंबात आई-वडील, दोन मुलं व पत्नी यांचा समावेश आहे. संगणक शास्त्रातील पदवी घेवून सुध्दा त्यांनी नोकरीसाठी प्रयत्न केला नाही.

५ एकर जमीन त्यांच्याकडे स्वत:च्या मालकीची असुन खडकाळ असल्यामुळे शेतामधील उत्पन्न बेताचेच. त्यामुळे या सुशिक्षीत बेरोजगार पदवीधराने शेळीपालन करण्याचा इरादा केला. त्यासाठी त्यांनी १० x १० फूट जागेत पत्र्याच्या शेडमध्ये ३ उस्मानाबादी शेळ्या व बोकड विकत घेवून व्यवसायाला सुरूवात केली.

काही कालावधीनंतर पुन्हा पाच शेळ्या विकत घेतल्या व जन्मलेली पिल्ले मिळुन सध्या लहान-मोठ्या अशा एकंदर ३५ शेळ्या आहेत त्यात एक बोकड सुध्दा आहे. शेळ्याकरीता अल्पखर्चात स्थानिक पातळीवर उपलब्ध साहित्याचा वापर करून गोठा तयार केला आहे. शेळ्यांना दररोज माळरानात चरायला सोडायचे. शेळ्यांना गोठ्यात हिरवा चारा, अझोला, पशुखाद्य गरजेप्रमाणे देणे सुरू केले. व्यवसायात करडांची वजनवाढ कमी होणे, शेळ्या माजावर वेळेवर न येणे, चाराटंचाई ईत्यादि अडचणी आल्या. परंतू डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांच्या कडून सल्ला घेवून आहारात बदल व नवीन पोषक चारा करून आलेल्या अडचणींवर मात केली.

त्यांनी शेतामध्ये शेळ्यांच्या चाऱ्यासाठी मका, सुबाभूळ, तुती, शेवरी, अझोला यांचे संवर्धन केले. गोठ्यातील उदभवणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कोनमारे नेहमी तज्ञांशी संपर्क साधत असतात. पशुपैदास प्रक्षेत्र, उदगीर तसेच पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर येथे आयोजित प्रशिक्षणात त्यांनी हिरीरीने भाग घेवून बरीच माहिती गोळा केली.

गोठ्यात तयार झालेली बोकडे ते स्वत: बाजारात विकतात. सहा महिने वयाच्या बोकडांचे रू.५००० ते ७००० या भावात ते विक्री करतात. त्यामुळे त्यांना वर्षाकाठी ६०,०००/- रू. उत्पन्न मिळाले. या व्यवसायात हळूहळू वाढ करून मुख्य व्यवसाय म्हणून या वरच लक्ष केंद्रीत करायचे असा त्यांचा निर्धार आहे. २०१६ मध्ये उन्हाळ्याच्या मोसमात चाऱ्याची तीव्र टंचाई त्यांना जाणवली. तेव्हा त्यांनी चाऱ्यासोबत अझोला खाऊ घातल्यामुळे शेळ्यांची प्रकृती चांगली राहीली तसेच गाभण शेळ्यांना अझोला दिल्यामुळे सशक्त करडं जन्मली असे ते अभिमानाने सांगतात. या शेळ्यांसोबत त्यांच्याकडे आज ४०-५० गावरान कोंबडया आहेत. ते प्रत्येक कोंबडी ४५०/- रू. भावाने विक्री करतात. गेल्या वर्षभरात या कोंबडयांपासून रू. १५०००/- उत्पन्न मिळाले. स्वत: जमा केलेल्या रकमेतून त्यांनी भांडवल उभारणी केली. कडकनाथ जातीच्या कोंबडयांचे संगोपन करणे नियोजित आहे. मेहनत, चिकाटी, नवीन ज्ञान घेण्याचा ध्यास, त्याचबरोबर घरच्या घरी चारा निर्मिती हे त्यांच्या यशाचे सूत्र आहे. या यशाचे श्रेय ते वडील आणि डॉ. पाटील यांना देतात.

श्री. दिनेश पांडूरंग कोनमारे
रा. यशवंत सोसायटी ता. उदगीर जि. लातूर

मार्गदर्शक :
डॉ. प्रफुल्लकुमार वसंतराव पाटील
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय,उदगीर जि. लातुर





शेळीपालनातून कत्तलखाना उभा करण्याचा मानस

श्री धनाजी नाळे यांचे आई-वडील पारंपारिक व्यवसाय म्हणुन शेती करतात. परंतु धनाजी पदवीधर असुन त्यांनी मात्र शेळीपालनाचा व्यवसाय हा आवडीतून व वेगळं काहीतरी करायचं या उद्देशाने सुरू केला. त्यासाठी त्यांनी ५५०० चौ. फुट शेड उभे करतांना शेळयांची गरज लक्षात घेऊन उभारणी केली. त्यात पिल्ले देणाऱ्या ७० शेळया व एक बोकड मिळून लहान मोठे असे एकंदर १५० नग आहेत. यापासून त्यांना वार्षिक उत्पन्न रू. ५ ते ७ लक्ष मिळतात. १५० नग शेळयांचे पूर्ण बंदिस्त स्वरूपात मागील २ वर्षापासून संगोपन केले जाते. ५० गूंठे जागेवर शेळयांसाठी चाऱ्यांची लागवड केली आहे.

वैज्ञानिक पध्दतीने व्यवसाय करण्याच्या उद्येशाने पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय उदगीर येथे शेळीपालन व्यवसायाचे प्रशिक्षण घेवून त्यांनी २/८/२०१४ ला 'कृषी वैभव शेळीफार्म' या नावाने कतडवळे ता. उस्मानाबाद येथे व्यवसाय सुरू केला. फार्म सुरू करतांना त्यांनी २० शेळया व २५ पिलं खरेदी केली, त्यासाठी साधारणत: २ लाख खर्च व शेडसाठी ४५ हजार रूपये खर्च आला.

ठिबक सिंचन चारा लागवडीसाठी खरेदी केले मुरघास (२५ टन) युनिट बांधकाम, कुट्टी यंत्र, गावरान पोल्ट्री (५० पक्षी) तसेच देशी गायी (देवणी) इत्यादीची धनाजी यांनी खरेदी केली. मटन दुकान ही सुरू केले. जिवंत पक्षांची वजनाप्रमाणे विक्री सुध्दा केली जाते. शेळीपालनासाठी लागणाऱ्या जातीवंत शेळयांचा देखील पुरवठा केला जातो. या व्यवसायातून खर्च वजा जाता निव्वळ नफा म्हणुन रू.७ ते ७.५ लाख रूपये होतो. व्यवसाय करतांना भांडवल त्यांचे स्वत:चे होते. त्यानंतर त्यांनी २०१६ मध्ये बॅक ऑफ महाराष्ट्र बॅकेकडून रू. ५ लक्ष कर्ज घेतले. पंचायत समिती उस्मानाबाद तर्फे ५०: अनुदान मिळाले.

'गोट ट्रस्ट ऑफ इंडिया/लखनौ/पश्चिम बंगाल' येथील बऱ्याच मंडळींनी शेळी फार्मला भेटी दिल्यात. तसेच मा. मुख्यमंत्री व राज्यपाल यांना या व्यवसायामुळे भेटण्याची संधी मिळाली, असेही धनाजी गौरवाने सांगतात.

यशाचे श्रेय ते पत्नीला तसेच डॉ. मुकणे सर, बोरकर सर, डॉ. अनिल भिकाने सर व जिल्हाधिकारी डॉ. नारनवरे साहेब यांना देतात.

श्री. धनाजी अर्जून नाळे
मु.पो.कसबे तडवळे, ता. जि.उस्मानाबाद
(कृशी वैभव शेळी फार्म)

मार्गदर्शक :
प्रा. डॉ. अनिल भिकाने व डॉ. शरद आव्हाड
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर







पशुसंवर्धन व्यवसाय उत्कर्षाची गुरूकिल्ली

श्री. प्रविण बावणे हे स्नातक असुन संगणक हार्डवेअर आणि साफ्टवेअर मध्ये जेटकिंग चा पदवीका अभ्यासक्रम पूर्ण करून व्यवसायाच्या शोधात सर्वत्र फिरत असतांना नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयातील पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभागामार्फत शेळीपालन प्रशिक्षण राबविल्या जात असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यांनी दि. १९/०६/२०१७ च्या शेळीपालन प्रशिक्षण तुकडीत नोंदणी करून ०५ दिवसाचे शास्त्रोक्त शेळीपालन प्रशिक्षण पूर्ण केले. प्रशिक्षणादरम्यान विविध विषयतज्ञांमार्फत प्रशिक्षण पूर्ण केल्यावर ते डॉ. वैशाली बांठीया व डॉ. सारीपूत लांडगे यांच्या संपर्कात राहिले तसेच जवळपास ३० ते ३५ शेळीपालन प्रक्षेत्रांना भेटी सुध्दा दिल्या व सोबतच त्यांनी व्यावसायिक शेळीपालनाविषयी माहिती सुध्दा गोळा केली.

व्यवसाय सुरू करण्यास गोठा बांधणी शेळयांची खरेदी याबाबत डॉ. लांडगे यांनी बावणेंना मोलाचे मार्गदर्शन केले ते शेळयांचे अनेक बाजार फिरले. उस्मानाबाद येथून ३० उस्मानाबादी शेळया विकत घेऊन एक एकर जमिनीवर व्यवसाय सुरू केला. हा व्यवसाय सुरू केल्यावर प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर शेळयांचे आजार प्रजनन, माज ओळखणे, लसीकरण, प्रथमोपचार, विविध नोंदी याबाबत डॉ. बांठीया व डॉ. लांडगे यांनी वेळोवेळी त्यांना मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाचा त्यांना अधिक फायदा होऊन अंदाजे ८ ते ९ महिन्याने शेळीचे प्रजनन, शेळीचे विणे, पिल्लांची जोपासना, पोषणआहार इत्यादीकरिता मदत मिळाली. आज बावणे यांचा व्यवसाय भरभराटीकडे जाऊ लागला.

स्वत: प्रक्षेत्रावरिल शेळयांना फक्त बाहेरच्या चाऱ्यावर निर्भर न ठेवता त्यांनी शेतात चारा लावायला सुरूवात केली त्यांचे बियाणे पण उपलब्ध करून विकण्यास सुरूवात केली. याचसोबत मेथी घास, हातगा,शेवरी आणि दशरथ घास हे बियाने व कांडया देखील विक्रीस ठेवल्या. ज्यामुळे त्यांना अधिकचा नफा मिळण्यास सुरूवात झाली.

डॉ. लांडगे यांनी माहिती तंत्रज्ञानाच्या वापर मार्केटींग करीता कसा करावा याबाबत सविस्तर माहिती दिली. शेळीविक्रीबाबत योजना बनविण्यास त्यांनी मार्गदर्शन केले. त्यातून फेसबुक, वॉटसअप या सोशल मीडीयाचा त्यांनी शेळी विक्रीकरीता वापर केला. त्यामुळे त्यांना जागेवरच ग्राहक मिळू लागले. त्यापुढे त्यांना विक्रीसाठी कुठेच जाता आले नाही. सोबतच डॉ. जुमळे व डॉ. गलगाटे सर यांनी सुध्दा शेळी रोगमुक्त कशी ठेवावी याबाबत मार्गदर्शन करून वेळोवेळी प्रक्षेत्रावर भेटी दिल्या.

वरील सर्व मार्गदर्शक मंडळीच्या वेळोवेळी सहकार्याने बावणेच्या व्यवसायात फायदा होऊन मागील एका वर्षात निवळ २ लाख ६० हजार त्यांना नफा झाला आहे आणि आज तो वाढत्या क्रमाकडे कुच करीत आहे. त्यांनी एक वर्ष शेळीपालन व्यवसाय राबविल्यानंतर या व्यवसायासोबत डॉ. बांठिया मॅडम व हजारे बंधू यांच्या मार्गदर्शनातून बटेर (लाव्हा) पालन पण सुरू केले. ५० नग बटेर घेऊन त्यावर अनुभव घेणे सुरू केले. या व्यवसायातून सुध्दा त्यांना पहिल्या वेळेस रू. ६०००/- चा नफा झाला. शेळीपालनासोबतच १००० नग बटेरचे प्रक्षेत्र उभारण्याचा त्यांचा मानस आहे. तसेच सोबतच गावरानी कोंबडया सुध्दा पाळल्या आहेत. त्यांच्या सोबत प्रशिक्षणातील मित्रांना सुध्दा चारा व शेळया विक्री करून त्यांच्या व्यवसायाकरिता पण अग्रेसर झाले आहेत.

मार्गदर्शक :
डॉ. वैशाली बांठीया व डॉ. सारीपुत लांडगे,
सहाय्यक प्राध्यापक,
नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर

श्री. प्रविण बावणे,
रा. पी.जी. गोट फॉर्म, हिंगणा, नागपूर,





शास्त्रोक्त कुक्कुट पालनातून कुटुंबाची प्रगति शास्त्रोक्त

श्री. बळवंतराव यांच्या वडीलांचा व्यवसाय तसा शेती. त्यांचा एक भाऊ शेती व्यवसायाबरोबरच कुक्कुटपालनाच्या कामात बळवंतरावांना मदत देखील करतो. शेती सोबतच कुक्कुटपालन व्यवसाय करत असतांना कुठेतरी या व्यवसायाला तांत्रीक ज्ञानाची जोड मिळावी म्हणुन बळवंत यांनी राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत कुक्कुटपालन शास्त्र विभाग, स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला येथे पाच दिवसांचे 'व्यावसायिक कुक्कुटपालन प्रशिक्षण' घेतले. त्यासाठी त्यांनी बॅकेकडून २,२५,००० रूपये कर्ज घेऊन १००० मांसल पक्षांसाठी त्यांनी २२ ग ५२ फूट शेडचे बांधकाम करून व्यवसायासाला सुरूवात केली.

प्रशिक्षणादरम्यान पक्षांच्या रोग नियंत्रणासाठी शेडचे निर्जंतुकीकरण कशा पध्दतीने करावे याचे ज्ञान त्यांना मिळाले. पूर्वी त्यांच्याकडे मांसल पक्ष्यांच्या वेगवेगळया बॅच मध्ये ७ ते ८ टक्के मरतूकीचे प्रमाण आढळत होते. परंतु शेडच्या निर्जंतुकीकरणासाठी धुरीकरणाचा वापर केल्यामुळे मरतुकीचे प्रमाण ३-४ टक्क्यांनी कमी झाले.

पारंपारिक पध्दतीने केलेल्या व्यवसायापेक्षा निश्चितच तांत्रिक ज्ञानामुळे भर पडली आणि व्यवसायात सुधारणा झाली. त्यामुळे व्यवसाय अधिक जोमाने करावा असे त्यांना वाटू लागले. प्रत्येक बॅच मधून ३०,००० रूपये प्रमाणे वर्षाकाठी ६ बॅच मधून १,८०,००० रूपये एवढे उत्पन्न त्यांना मिळू लागले. कुक्कुटपालनातून मिळणाऱ्या सेंद्रिय खताचा वापर ते शेतीसाठी करत असतात. त्यामुळे रासायनिक खतावर होणारा खर्च कमी होऊन शेतीच्या उत्पन्नात वाढ होत आहे. त्यांनी बॅकेकडून घेतलेल्या कर्जाची ५० टक्के परतफेड ही केली आणि ५० टक्के सबसीडी सुध्दा मिळाली. परिश्रम, जिद्द व इच्छाशक्ति असते त्याठिकाणी मनुष्य यशस्वीच होतो, असे कांबे यांना वाटते. परिसरात शेतकरी व इतर या व्यवसायासंबंधात त्यांच्या कडून हवी असलेली माहिती करून घेतात. भविष्यात ३००० पक्षांपर्यंत कुक्कुटपालन करण्याचा त्यांचा निर्धार आहे. त्यासाठी बॅकेकडून अधिक अर्थसहाय्य मिळावे अशी अपेक्षा आहे.

श्री. बळवंत साहेबराव कांबे
रा. मंगरूळ कांबे ता. मूर्तिजापूर जि. अकोला

मार्गदर्शक :
डॉ. एस. जे. मनवर, डॉ. के. के. खोसे,
डॉ. एम. आर. वडे, डॉ. मयुरा गोळे
व डॉ. एच. एस. बिराडे
कुक्कुटपालनशास्त्र विभाग,
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला





जोडधंद्यातून आय.टी.आय. धारक बंधूंनी साधला आर्थिक विकास

सचिन व सुबोध कडू या दोघा भावडांना औद्योगिक प्रशिक्षण केंद्राची परिक्षा पास करून नोकरीच्या शोधात असतांना मनासारखी नोकरी मिळेनासी झाली आणि ज्यांच्याकडे नोकरी केली ते तुटपुंजा पगार देत असत. शेवटी हताश होवून वडीलोपार्जित शेती करायची असे ठरविले. यासंदर्भात मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय येथील सहाय्यक प्राध्यापक डॉ. रविंद्र चौधरी यांच्याशी उपरोक्त व्यवसायासंबंधी चर्चा केली. चर्चेत शेतीसोबत जोडव्यवसाय म्हणुन काहीतरी करावे असा सल्ला दिला. त्यावेळी त्यांच्याकडे ६ गावठी म्हशी होत्या. त्यातील काही म्हशी विकून त्याऐवजी मेहसाणा किंवा मुऱ्हा जातीच्या म्हशी घेण्याचा सल्ला डॉ. चौधरी यांनी दिला. त्याच्या म्हणण्यानुसार म्हशी खरेदी केल्या. परंतु म्हशींच्या खाद्याचा व खर्चाचा मेळ बसेना तेव्हा घरच्या घरी सकस आहार तयार करण्याचे परळ महाविद्यालयातील पशुपोषण शास्त्रातील तज्ञ डॉ चौधरी यांनी मार्गदर्शन केले आणि कडु यांनी तशी अंमलबजावणी सुध्दा केली.

सुरूवातीला दुधाचे उत्पादन २० ते २५ लिटर पर्यंत होते. परंतु तज्ञांनी सांगीतल्या प्रमाणे घरी सकस आहार तयार केल्यामुळे दुधाचे उत्पादन ६० ते ८० लिटर पर्यंत वाढले. या दुधाची विक्री कासा गावातील नोकरदार वर्गांना घरपोच सेवा म्हणुन ते करतात. आजच्या घडीला त्यांना दुधाचा भाव ६० रूपये प्रति लिटर मिळतो आहे. दुग्धव्यवसायात स्थिर झाल्यावर कुक्कुटपालन करावयाचे ठरविले. तेव्हा प्रायोगिक तत्वावर ५०० पक्षांची पेाल्ट्री डॉ. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली शेतात टाकली. सुरवातीला पक्षांना चांगला भाव मिळाला आणि मरतुकही कमी झाली. त्यामुळे पक्षांची संख्या २००० पर्यंत त्यांनी वाढविली. परंतु एकाएकी पक्षांचे वजन कमी, घाऊक विक्रीतून पक्षांची किंमत कमी मिळणे या समस्या आ वासुन उभ्या राहिल्या. तेव्हा डॉ. चौधरी यांनी चिकन शॉप टाकण्याचा सल्ला दिला, त्यानुसार चिकन शॉप टाकले.

प्रथम चिकन विक्री दिवसाला १०-१५ कोंबडयाच विकल्या जात. परंतु सुबोधच्या बोलक्या स्वभावामुळे व दुकानातील स्वच्छतेमुळे दर दिवशी १०० ते १२० किलो चिकन विक्री दुकानातून होवू लागली. मालाची विक्री स्वत: करीत असल्यामुळे दलालांकडून होणारी फसगत थांबली. सुरवातीला घाऊक बाजारात ७०-८० रूपयांचा पक्षी १६० रू. प्रति किलो विकल्या जावू लागला. झालेल्या न□यातुन चारचाकी मालवाहक गाडी खरेदी केली. जी शेतातील भाजीपाला व पक्षांची वाहतूक करण्यासाठी उपयोगात येवू लागली. पशुवैद्यक महाविद्यालयातील तज्ञांचा सल्ला व मार्गदर्शन घेवून नोकरीच्या मागे न लागता स्वत:चा व्यवसाय वृध्दींगत करा, असा संदेश कडू बंधूंनी दिला

सचिन गणपत कडू व सुबोध गणपत कडू
रा. कासा केंद्र, ता. डहाणू, जि. पालघर

मार्गदर्शक :
डॉ. आर. जे. चौधरी
सहाय्यक प्राध्यापक,
मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, मुंबई






यशोगाथा मांस उद्योगाची

मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयातील सामुहिक स्वास्थ्य विभागाअंतर्गत कार्यरत असणाऱ्या भारतीय कृषी अनुसंधान परिषद आणि पशु व दुग्धविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने पुरस्कृत अखिल भारतीय समन्वयक संशोधन प्रकल्पांतर्गत कापणी पश्चात अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान या योजनेमध्ये आंबविलेल्या वराह मांसापासून सॉसेजेस यासारखे विविध पदार्थ बनविण्याचे तंत्रज्ञान विकसीत करण्यात आले आहे. अशाप्रकारे वराह मांस नासवून तयार करण्यात आलेल्या सॉसेजेसचे तंत्रज्ञान भारतामध्ये प्रथमत: विकसीत करण्यात आले असून त्याचा लाभ वराह मांस विक्रेत्यांना होण्याकरिता विभागातर्फे विविध प्रशिक्षण व कार्यशाळा आयोजीत करण्यात आल्या. या प्रशिक्षणार्थीपैकी श्री. अनुप हुकूमचंद, हायजीनीक मीट प्रॉडक्शनचे भागीदार जे २० वर्षापासून वराह व कोंबडीच्या मांसावर प्रक्रिया करून विविध मांस पदार्थ उदा. हॅम, बेकन, सॉसेजेस भारतातील अनेक शहरात विकल्या जात आहेत. तसेच भारतातील पंचतारांकित हॉटेल्समध्ये त्या पदार्थांचे ग्राहक आहेत. अशाप्रकारे श्री. अनुप हुकुमचंद यांनी वरील तंत्रज्ञानाचा उपयोग करून व्यवसायामध्ये आर्थिक वृध्दी झाल्याचे मनोगत त्यांनी आपल्याच शब्दात मांडले आहे.

मी अनुप हुकूमचंद स्वच्छ मांस उत्पादनात भागीदार असून मागील २० वर्षांपासून वराह मांसावर प्रक्रिया करून विविध पदार्थ बनवून भारतातील अनेक शहरात विकत आहे. आमचे ग्राहक आमच्याकडे युरोपमधील उपलब्ध असणाऱ्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून नासवून तयार करण्यात आलेल्या सॉसेजची मागणी करत होते. भारतात कोणीही नासवून तयार केलेले सॉसेज तयार करीत नसल्यामुळे आम्ही पारंपारिक पध्दतीचा वापर करून ते बनविण्याचा प्रयत्न केला पण तो असफल झाला. आमचा हा प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयामधील पशुवैद्यकीय सामुहिक स्वास्थ्य विभागाचे प्रमुख डॉ. आर.जे. झेंडे यांची भेट घेऊन त्यांच्यासमोर आमच्या अडचणी मांडल्या. त्यांनी आमच्याकडून ६ महिन्याची मुदत घेऊन, या सहा महिन्यात त्यांनी त्यांच्या प्रयोगशाळेमध्ये सदर प्रक्रियेवर काम करून किफायतशीर पध्दतीने नासवलेले सॉसेज तयार करण्याचे तंत्र विकसित केले व त्यानंतर आम्हाला तंत्रज्ञान शिकवले.

बाजारपेठेत नासविलेल्या सॉसेजमध्ये पिझ्झावर वापरण्याच्या पेपरोनी या पदार्थाची मागणी जास्त होती म्हणून आम्ही डॉ. आर. जे. झेंडे सरांच्या मार्गदर्शनाखाली नासविण्याच्या प्रक्रियेत जुजबी बदल करून पेपरोनी बनवली व ग्राहकांना नमुना म्हणून कसलाही मोबदला न घेता वापरण्याची विनंती केली. सर्व ग्राहक पेपरोनीवर खुश झाले कारण चवीमध्ये युरोपमधून आयात केलेल्या पेपरोनी पेक्षा आमची पेपरोनी स्वस्त असल्यामुळे ग्राहकांना त्याचा फायदा झाला. आज आम्ही पेपरोनी तयार करून बाजारात विकत आहोत. सध्या आम्ही आम्हाला शिकवलेल्या आंबविण्याच्या प्रक्रियेवर आधारित कोंबडी व मटणाची लोणची तयार करण्याच्या प्रयत्नात आहोत. आम्हाला विश्वास आहे की, अजून सहा महिन्यात आम्ही ही लोणची बाजारात विकण्यास सुरूवात करू.

वराह मांस व कोंबडीच्या मांसावर प्रक्रिया करून विविध मांस पदार्थ तयार करण्याचे तंत्रज्ञान व त्यावर आधारित व्यवसायाची तपशीलवार माहिती डॉ. आर. जे. झेंडे, विभागप्रमुख आणि डॉ. व्ही. एम. वैद्य, सहाय्यक प्राध्यापक व त्यांच्या वैज्ञानिक चमुने दिली. त्यांच्या या बहुमुल्य मार्गदर्शनामुळेच आम्हाला या जोडधंद्याची साथ मिळाली व आर्थिक वृध्दी साधता आली.

मार्गदर्शक :
डॉ. आर. जे. झेंडे, प्राध्यापक (प्रभारी),
मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, मुंबई

अनुप हुकूमचंद
मुंबई







छोटया जलाशयातील शास्त्रोक्त पध्दतीने मत्स्य संवर्धनामुळे मत्स्योत्पादनात वाढ

श्री. महेश्वरनाथ गुप्ता यांनी मत्स्यविज्ञान महाविद्यालय, नागपूरचे सहाय्यक प्राध्यापक श्री राजीव राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रोक्त पध्दतीने मत्स्यसंवर्धन केले. पेंढरी जलाशयात नैसर्गिक खाद्याची (वनस्पती प्लवंग व प्राणी प्लवंग) तपासणी केली. त्यामुळे त्यांना नैसर्गिक खाद्य आढळले. तेव्हा जलाशयात ३००० नग बोटुकली प्रमाणे त्यांनी १,०५,००० कटला, रोहु आणि मृगल प्रजातींच्या बोटुकलींची २:२:१ प्रमाणात साठवणूक केली. त्यानुसार संपुर्ण क्षेत्रफळात आवश्यकतेप्रमाणे ऑगष्ट २०१५ मध्ये साठवणुक करण्यात आल्यावर पुरक खाद्याचे प्रमाण १:०.३ प्रमाणे ठरविण्यात आले. मत्स्य बिजाची चांगली गुणवत्ता आणि मुबलक नैसर्गिक खाद्य यांच्या जोडीमुळे सुरवातीला ७०:३० प्रमाणात शेंगदाणा ढेप व कुक्कुम हे खाद्य ऑगष्ट व सप्टेंबर २०१५ मध्ये देण्यात आले. नंतर ५०:५० प्रमाणात एप्रिल २०१६ पर्यंत खाद्य खाद्य देण्यात आले. मे व जुन २०१६ मध्ये माश्यांची काढणी केली असता, ४२ टन मत्स्योत्पादन मिळाले. २००९ पूर्वी श्री गुप्ता यांना हेक्टरी २००-२५० किलो मत्स्योत्पादन मिळायचे. पेंढरी जलाशयाचे २०१६ या वर्षीचे मत्स्योत्पादन हे १.२ प्रति हेक्टर टन एवढे आहे. मत्स्योत्पादनात वर्षानुवर्षे वाढ होत असल्याने श्री गुप्ता आनंदीत आहेत.

यशाचे सर्व श्रेय ते मत्स्यविज्ञान महाविद्यालय, नागपूर चे सहाय्यक प्राध्यापक श्री राजीव राठोड यांना देतात. बेरोजगार युवकांनी सुध्दा उपरोक्त व्यवसायाकडे वळावे असे आवाहन गुप्तांनी केले.

श्री महेश्वरनाथ गुप्ता
रा. पेंढरी जलाशय, ता. मारेगांव,
जि. यवतमाळ

मार्गदर्शक :
श्री राजीव ह. राठोड,
सहाय्यक प्राध्यापक,
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर





मत्स्य संचयनातुन केली आर्थिक उन्नती

मत्स्यविज्ञान महाविद्यालय, नागपूर अंतर्गत मत्स्यबिज उत्पादन केंद्र, तेलंखेडी येथे कार्यरत श्री. अरविंद कुलकर्णी मत्स्य क्षेत्रीय सहाय्यक यांचेशी श्री. दत्ता पड्याळ यांची २००९ ला भेट झाली. दरम्यान श्री कुळकर्णी यांनी पड्याळ यांच्याकडुन मत्स्य संचयन, नियोजन आणि इतर निगडीत बाबींचा पूर्ण इतिहास जाणून घेतला. त्यानुसार असे आढळून आले की, श्री. पड्याळ व त्यांच्या संस्थेचे सदस्य हे मत्स्य जीरे सरळ तलावात सोडून द्यायचे तसेच तलावाची संचयन क्षमता लक्षात न घेता कमी प्रमाणात बिज संचयन करत होते. त्यामुळे तलावाचे वार्षिक उत्पादन जेमतेम निघायचे.

श्री कुळकर्णी यांनी उपरोक्त विषयी पड्याळ यांना आवश्यक शास्त्रीय पध्दतीची माहिती सांगून पुढील नियोजन संदर्भात मार्गदर्शन केले. मत्स्य जीरे तलावात किंवा जलाशयात न सोडता त्यांचे संगोपन छोट्या तलावात संचयन करून बोटुकली आकाराचे बीज तयार करण्यास श्री कुळकर्णी यांनी सांगीतले. सोबतच तलावाच्या पाण्याचे परिक्षण करून विरघळलेला प्राणवायू, पाण्याचा सामू, आम्लता, जडपणा इत्यादी तपासून उपाययोजना करण्यास सांगीतले. तसेच पाण्याची उत्पादन क्षमता म्हणजेच प्लवंगाची मात्रा, जैव प्लवंग व वनस्पती प्लवंगाचा अभ्यास करून तलावामध्ये खतांची मात्रा देण्याचे प्रमाण निश्चित केले.

उपरोक्त मार्गदर्शनानुसार पड्याळ यांनी सन् २०१० पासून छोट्या तलावात मत्स्य जीरे संचयन करून बोटुकलीपर्यंत बीज वाढविले. त्यादरम्यान श्री. कुलकर्णी यांच्या सूचनेनुसार तलावाच्या संगोपन व्यवस्थापनेची कामे उदा. पानकिटकांचा नायनाट, खाद्य व्यवस्थापन, पाण्याचे व्यवस्थापन पड्याळ यांनी केले. पड्याळ यांनी मागील पाच वर्षांमध्ये महाविद्यालयाच्या तेलंखेडी स्थित मत्स्यबीज उत्पादन केंद्रातून ६५ लाख मत्स्य जीरे खरेदी केलेत.

श्री पडयाळ यांनी ६५ लाख मत्स्य जीरे संचयन करून मागील पाच वर्षांपासून बोटुकली व त्यापेक्षा मोठ्या आकाराचे मत्स्य बीज तयार करून वेणासारख्या मोठ्या जलाशयात त्यांचे संचयन करून ते भरघोस उत्पादन घेत आहेत.

महाविद्यालयाने पुरविलेल्या शास्त्रीय माहितीमुळे त्रिवेणी मच्छिमार सहकारी संस्था, व्याहाडपेठ मधील सदस्यांचाही आर्थिक स्तर उंचावलेला आहे. तसेच परिसरातील इतर मच्छिमार कुटुंबांनाही याचा फायदा झालेला आहे, असे मत श्री. दत्ता पड्याळ यांनी व्यक्त केले.

उपरोक्त सहकारी संस्थेचे अध्यक्ष म्हणुन त्यांची नागपूर जिल्हयातील प्रगत मत्स्य शेतकरी तसेच उन्नत मच्छिमार संस्थेच अध्यक्ष म्हणुन नावलौकीक आहे.

श्री. दत्ता पड्याळ
अध्यक्ष, त्रिवेणी मच्छिमार सहकारी संस्था मर्या.,
व्याहाड पेठ, वेणा, नागपूर

मार्गदर्शक :
श्री. अरविंद कुलकर्णी,
मत्स्य क्षेत्रीय सहायक,
मत्स्यविज्ञान महाविद्यालय, नागपूर



मत्स्य बीजाची प्रगत बोटुकलीपर्यंत पिंजरा पद्धतीत वाढ मत्स्य संस्थेने साधला उत्पन्नाचा मार्ग

महाराष्ट्र शासनाच्या मुनिजन या योजने अंतर्गत मत्स्यविज्ञान महाविद्यालय, नागपूर यांनी जागतिक मत्स्य दिनानिमित्त दि. २१.११.२०१५ रोजी पेठकाळडोंगरी हे गाव दत्तक घेतले. दत्तक घेण्याचे मुख्य कारण की या परिसरात उपलब्ध असलेली जलसंपदा. येथील ३० टक्के लोकसंख्या ही मत्स्य व्यवसायावर अवलंबुन आहे. गावामध्ये मच्छिंद्र मच्छिमार सहकारी संस्था, पेठकाळडोंगरी-धामणा येथे कार्यान्वित आहे. मुनिजन दत्तक योजनेअंतर्गत मत्स्यविज्ञान महाविद्यालयाने गावामध्ये विविध मत्स्य व्यवसायाचे कार्यक्रम राबविले. त्यामध्ये मुख्य करून जलाशयातील मत्स्यसंवर्धन, जलाशयातील पिंजरा मत्स्यसंवर्धन, मुल्यवर्धित मत्स्य पदार्थ निर्मिती, मागुर मत्स्य संवर्धन इत्यादी कार्यक्रमांचा समावेश आहे.

उपरोक्त व्यवसायाविषयीचे कार्यक्रम राबवित असतांना मच्छिंद्र मच्छिमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष श्री. मारूती बावणे यांनी पुढाकार घेवून जलाशयातील पिंजरा मत्स्यसंवर्धन कसे करायचे हे जाणून घेण्याबद्दल रूची दाखवली. त्यावेळी राष्ट्रीय सेवा योजना, मत्स्यविज्ञान महाविद्यालय, नागपुरचे कार्यक्रम अधिकारी श्री. एस.एस. रेळेकर यांनी बावणे यांना मार्गदर्शन केले. संघटनेच्या अधिपत्याखाली असलेल्या नांदेरा जलाशयामध्ये पिंजरा मत्स्यसंवर्धन होऊ शकते असे बावणे यांना सांगण्यात आले. श्री. एस.एस. रेळेकर यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांनी पिंजऱ्यांची बांधणी केली. एका पिंजऱ्याचा संच तयार करण्यासाठी रू ३५,०००/- एवढा खर्च आला. अशाप्रकारे एकुण ६ संच तयार करण्यात आले.

मत्स्यविज्ञान महाविद्यालयाच्या बीज उत्पादन केंद्रातून संस्थेने १.२५ लक्ष कटला, रोहू आणि मृगल यांचे अर्धबोटूकली आकाराचे बीज रू. ३००/१००० नग प्रमाणे विकत घेतले. त्याचप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजना, मत्स्यविज्ञान महाविद्यालय, नागपूर यांच्याकडून २५,००० अर्धबोटूकली आकाराचे मत्स्यबीज संस्थेला देण्यात आले. प्रत्येकी २५,००० याप्रमाणे सहा पिंजऱ्यांमध्ये १.५० लक्ष बीज संचयन करण्यात आले. पिंजऱ्यात संचयन केलेल्या बीजांसाठी भातांचा कोंडा व शेंगदाण्याची ढेप याचा खाद्य म्हणून वापर करण्यात आला. खाद्यासाठी एकुण रू. २७,०००/- एवढा खर्च आला. अर्धबोटूकली ते प्रगत बोटूकली आकाराचे मत्स्यबिज होण्यासाठी साठ ते सत्तर दिवसांचा कालावधी लागला. सत्तर दिवसांनंतर संचयन केलेल्या एकुण १.५० लक्ष अर्धबोटुकली मत्स्यबीजांपैकी ९०,००० प्रगत बोटूकली मत्स्यबीज प्राप्त झाले. हे मत्स्यबीज १.५० पैसे प्रति नग याप्रमाणे विकण्यात आले. त्यातून संस्थेस १.३५ लक्ष रूपये मिळाले. विकत घेतलेले मत्स्यबीज आणि खाद्याचा व इतर खर्च वगळता अडीच महिन्यांमध्ये संस्थेला ६०,०००/- रूपये इतका नफा झाला.

श्री. मारूती बावणे
पेठकाळडोंगरी, ता. जि. नागपुर

मार्गदर्शक :
श्री एस. एस. रेडेकर
राष्ट्रीय सेवा योजना, कार्यक्रम अधिकारी,
मत्स्यविज्ञान महाविद्यालय, नागपूर






शेततळयातील मत्स्यशेतीचा व्यवसाय

श्री. महादेव मुसळे हे शेतकरी असुन त्यांच्याकडे चार एकर शेती असुन त्यात ते टमाटर, मिरची, वांगे, काकडी यासारख्या फळभाज्यांचे उत्पादन घेतात. त्यांच्या शेतामध्ये कृषी विभागाकडून २०१४ मध्ये १४ मी. ग ४ मी. आकाराचे शेततळे बांधण्यात आले. मत्स्यविज्ञान महाविद्यालयातील डॉ. ए.एस. कुलकर्णी, सहाय्यक प्राध्यापक यांच्याशी संपर्क साधुन त्यांनी त्यांच्याकडे शेततळयामध्ये मत्स्यशेती करण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हा त्यांच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र शासनाच्या करडखेड जि. नांदेड येथील मत्स्यबीज केंद्रातुन मत्स्यबीज खरेदी करून त्यांनी त्याच्या शेततळयात संचयन करण्यात आले. संवर्धन काळामध्ये खत व खाद्य व्यवस्थापनाचे मार्गदर्शन त्यांना सतत करण्यात आले. शेततळयात पाण्याची साठवणुक केल्यामुळे मागील वर्षी दुष्काळी परिस्थितीवर मात करता आली.

शेततळयातील पाण्याचे योग्यपध्दतीने व्यवस्थापन केल्यामुळे लहान आकाराच्या शेततळयामधुन ५०० किलो मत्स्योत्पादनाद्वारे रू. ३०,०००/- इतके आर्थिक उत्पन्न मिळाले. मत्स्यपालन करतांना शेततळयामधील खतयुक्त पाण्याचा वापर फळबागाकरीता केल्यामुळे फळभाज्यांच्या उत्पादकतेवर चांगला परिणाम झाल्याचे त्यांना दिसून आले. मत्स्यशेतीचे योग्य व शास्त्रीय पध्दतीने व्यवस्थापन करून मत्स्योत्पादन वाढवण्यावर यावर्षीही भर देणार आहेत.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत शेतकरी जागरूकता अभियान २०१६ मध्ये श्री मुसळे यांच्या शेतात राबविण्यात आले होते. या अभियाना अंतर्गत जवळपासच्या गावातुन आलेल्या अनेक शेतकऱ्यांना शेतीपुरक व्यवसायाचे मार्गदर्शन करण्यात आले. सोबत शेततळयातील मत्स्यपालनाचे प्रात्यक्षिकही दाखविण्यात आले. बॅकेकडून आर्थिक सहाय्य मिळाल्यास मत्स्य शेतीसोबत कुक्कुटपालनाचा व्यवसायही 'एकात्मिक शेती' पध्दतीने करण्याचा श्री. मुसळे यांचा निर्धार आहे.

श्री. महादेव लिंबाजी मुसळे
मु. कोष्टगाव जि. लातूर ता. रेणापूर

मार्गदर्शक :
डॉ. ए. एस. कुलकर्णी, श्री. एस. एन. कुंजीर,
श्री. एम. एम. गिरकर,
सहाय्यक प्राध्यापक,
मत्स्यविज्ञान महाविद्यालय, नागपूर








महिला उद्योजिकेचा 'शोभीवंत माश्यांचा व्यवसाय'

श्रीमती प्रीती गायकवाड या उच्चशिक्षित असुन त्यांना एक मुलगा व एक मुलगी आहे. त्यांनी उदगीर येथे 'फिश क्लब ऍक्वेरिअम' या नावाने शोभीवंत माश्यांचा व्यवसाय सुरू केला. त्यामागील पार्श्वभुमी अशी की, त्यांचा मुलगा श्री. प्रताप हा उदगीर येथील मत्स्यविज्ञान महाविद्यालयात शिक्षण घेत असतांनाच शोभीवंत माश्यांबद्दलचे त्याला आकर्षण वाटले आणि त्यातून व्यवसाय करण्याची जिज्ञासा निर्माण झाली. या व्यवसायामुळे मिळणाऱ्या उत्पन्नातुन शिक्षणाचा खर्च निघेल या उदात्त हेतुने उपरोक्त व्यवसाय सुरू केला.

महाविद्यालयातील प्राध्यापकांचे प्रोत्साहनपर मार्गदर्शन त्यांना सतत मिळत होते. तरी देखील श्री प्रताप यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे व परिश्रमाने हा व्यवसाय उदगीर व परिसरातील भागामध्ये नावरूपास येऊ लागला. तो महाविद्यालयातील पदवी प्राप्त करून गुजरात येथे खाजगी कंपनीमध्ये टेक्नॉलॉजीस्ट या पदावर रूजु झाला. तेव्हा व्यवसायाची जबाबदारी श्रीमती प्रीती गायकवाड यांच्याकडे आली आणि आजतागायत त्या हा व्यवसाय चांगल्या प्रकारे हाताळत आहेत. १५००/- रू. एवढया कमी भांडवलावर त्यांनी व्यवसायाची सुरूवात केली. परंतु आज त्या हळुहळु कां होईना दर ३ महीन्याला ५००००/- रू. गुंतवणूक या व्यवसायात करीत आहेत. विविध आकाराचे ॲक्वेरिअम व अनेक जातीचे शोभिवंत मासे तसेच त्यांना लागणारे खाद्य व इतर साहित्याची विक्री केली जाते. या व्यवसायातून खर्च वजा जाता प्रती महीना रू. १२००० ते १५००० इतका निव्वळ नफा त्यांना मिळतो. श्रीमती गायकवाड या शिक्षकीपेशा सांभाळून उर्वरीत वेळेमध्ये हा जोड व्यवसाय म्हणून करतात. या व्यवसायांतर्गत शोभीवंत मासे व इतर साहित्याची विक्री लातूर जिल्हयातील देवणी, निलंगा, अहमदपुर तालुके तसेच नांदेड जिल्हयात देगलूर व बिदर जिल्हयात कमालनगर, भालकी येथे केली जाते. श्रीमती गायकवाड हा व्यवसाय मोठया जिद्दीने करत असून इतर महिलांना सुध्दा या व्यवसायात मदतीला घेवून त्यांनाही रोजगार उपलब्ध करून दिला आहे. बॅकेतील अधिकाऱ्यांनी त्यांच्या कामाची कसब बघुन त्यांना महिला बचतगट स्थापना करण्यासाठी मार्गदर्शन केले आहे. त्यांची कन्या बी. एस्सी. मायक्रोबायलॉजी झाली असुन तिही मुंबई येथे सीफुड प्रोसेसिंग इंडस्ट्रीमध्ये टेक्नॉलॉजीस्ट म्हणून कार्यरत आहे. हा व्यवसाय आता महिला बचत गटाच्या माध्यमातुन तसेच मत्स्यविज्ञान महाविद्यालयातील तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वृध्दीगत करण्याचा त्याचा मानस आहे. मत्स्यविज्ञान महाविद्यालयाने केलेल्या सहकार्यामूळे त्यांच्या कुटुंबाला नवीन दिशा मिळाली, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

श्रीमती प्रीती भुषण गायकवाड
रा. उदगीर जि. लातुर

मार्गदर्शक :
डॉ. ए. एस. कुलकर्णी, श्री. व्ही. बी. सुतार,
सहाय्यक प्राध्यापक
मत्स्यविज्ञान महाविद्यालय, नागपूर






शेततळयातील मत्स्यशेती – शेतीस पुरक व्यवसाय

श्री. ओंकार मसकल्ले हे शेतकरी असुन त्यांचा वडीलोपार्जित शेती हा व्यवसाय असुन त्यामध्ये कुटुंबातील सर्वचजण सहकार्य करतात. सोयाबीन, तुर, मुग, उडीद, गहु व हरभरा इत्यादींचे ते पीक घेतात. ३० मी. x ३० मी. x ४ मी. आकाराचे शेततळे असून २०१५-१६ मध्ये त्यांनी मत्स्यशेतीचा व्यवसाय सुरू केला. २०१६ मध्ये दुष्काळी परिस्थितीतही मत्स्यसंवर्धन त्यांनी कमी पाण्यामध्ये केले. कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ किंवा बॅकेचे कर्ज न घेता त्यांनी शेततळयात कटला, रोहू या जातीचे मत्स्यबीज संचयन केले. त्यापासुन त्यांनी २००००/- एवढा आर्थिक नफा मिळविला. जोडव्यवसाय म्हणुन त्यांनी पशु व दुग्धव्यवसाय ही सुरू केला. त्यामधुनही त्यांना रू २२०००/- एवढा नफा मिळाला.

शासकीय मत्स्यबीज केंद्रातून मत्स्यबीज घेवून त्यांनी शेततळयात संचयन केले. मत्स्यपालनासाठी आवश्यक असलेली सामुग्री जसे खत व खाद्य यांचे व्यवस्थापन शास्त्रीय पध्दतीने करण्याचे ठरविले. हे सर्व उपयुक्त मार्गदर्शन उदगीर येथील मत्स्यविज्ञान महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापक वृंदाकडुन मिळत आहे. केंद्र शासनाच्या 'मिशन फिंगरलींग' या मत्स्यव्यवसाय विभाग, लातूर यांच्याकडे नांव नोंदणी केले आहे.

दुग्धव्यवसाय व मत्स्यशेती हा पुरक जोडव्यवसाय आहे. त्यासाठी मनुष्यबळ व साधनसामुग्री शेतामध्येच उपलब्ध असते. त्यामुळे दोन्ही व्यवसाय एकात्मीक पध्दतीने केल्यास हमखास उत्पन्नात वाढ होतेच असे ठाम मत ओंकार मसकल्ले यांनी व्यक्त केले.

मोठया आकाराचे शेततळे व मत्स्य तलाव तयार करून त्यामध्ये मत्स्यबीज संचयन व मत्स्यसंवर्धन करण्याचा भविष्यात त्यांचा इरादा आहे. मत्स्यविज्ञान महाविद्यालयामधील कार्यशाळेत देखील ते सहभागी झाले. या कार्यक्रमातून मत्स्यसंवर्धन आधुनिक पध्दतीने करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली असल्याचेही श्री मसकल्ले सांगतात.

श्री. ओंकार माणिकराव मसकल्ले
रा. महादेववाडी पो. दावणहिप्परगा
ता. देवणी जि. लातूर

मार्गदर्शक :
डॉ. ए. एस. कुलकर्णी, श्री. व्ही. बी. सुतार,
श्री. ए.टी. मरकड,
सहाय्यक प्राध्यापक,
मत्स्यविज्ञान महाविद्यालय, उदगीर



दुध संकलन व दुग्धजन्य पदार्थ निर्मितीद्वारे अर्थाजन

श्री. रविंद्र कान्हेड या पदवीधर सुशिक्षित तरूण युवकाला मनाजोगी नोकरी मिळेनासी झाल्यामुळे त्यांनी २०१३ रोजी 'अरिहंत डेली निड्स' दैनंदिन गरजेच्या वस्तुचे दुकान सुरू केले. विविध कंपनीकडील दुध थैली, दुग्धजन्य पदार्थ दुकानामधुन विकत घेवून ते विक्री करायचे. परंतू उत्पन्न फारसे होत नव्हते. चार पैसे गाठीला पाहिजेत या उद्देशाने दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, वरूड (पुसद) यांच्या कडुन दुध संकलन व दुग्धपदार्थ निर्मिती बद्दलची माहिती घेण्यासाठी विद्यार्थी प्रशिक्षण दुग्धशाळेला कान्हेड यांनी भेट दिली. दुग्धशाळेतील कर्मचाऱ्यांकडुन सखोल अशी माहिती घेतल्यानंतर उपरोक्त व्यवसायाला लागणाऱ्या उपकरणांची जसे मिल्कोटेस्टर, लॅक्टोमीटर इत्यादी दुध गुणवत्ता तपासणी साधनाची खरेदी करून दररोज सकाळ-संध्याकाळ दुध संकलन थेट शेतकऱ्यांकडुन करण्यास सुरवात केली. त्यामुळे कान्हेड यांच्या दुकानावर संकलीत ताज्या दुधाच्या उपलब्धतेमुळे खुले ताजे दुध खरेदी करण्यासाठी ग्राहकांची रीघ लागू लागली.

शिल्लक दुधाचे मुल्यवर्धन करून दही, खवा, पेढा, पनीर इत्यादी दुग्धजन्य पदार्थ कुटीर स्तरावर स्वत: बनवुन विक्री करण्यास कान्हेड यांनी सुरूवात केली. त्यामुळे भरपुर प्रमाणात नफा होत असल्यामुळे यात घरच्या मंडळीचाही सहभाग असल्याचे कान्हेड यांनी मान्य केले. सध्या त्यांच्याकडे दररोज २०० लिटर दुध संकलीत होते. पैकी १२५-१५० खुल्या स्वरूपात विक्री तर शिल्लक ५०-७५ लिटर दुध उपरोक्त पदार्थ निर्मिती साठी वापरले जाते.

श्री. रविंद्र मानिकसा कान्हेड,
शकंरनगर, पुसद

मार्गदर्शक :
श्री. नितीन वा. शिंदे, सहा. व्यवस्थापक (गु.नि),
डॉ. प्रशांत वासनिक, सहयोगी प्राध्यापक,
डॉ. सुधाकर चांगाडे, सहयोगी अधिष्ठाता,
दुग्धतंत्रज्ञान महाविद्यालय, वरूड (पुसद)





यशस्वी व्यवसायाची यशोगाथा : एस कुमार डेअरी

श्री. सुधाकर ठाकरे यांनी हॉटेल आणि कॅन्टीन चा व्यवसाय घरीच सुरू केला आहे. त्यांच्याकडे १५ एकर जमीन असुन २० पशुधन सुध्दा आहे. काहीतरी नवीन करू पाहण्याची इच्छा होती, परंतु काहीच सुचेना. तेव्हा दुग्धतंत्रज्ञान महाविद्यालय, वरूड (पुसद) यांच्या वतीने गरजु शेतकऱ्यांना प्रशिक्षण देवून शेतकऱ्यांना दुग्धव्यवसाय करण्यास प्रवृत्त करण्यासाठी प्रशिक्षणांची जाहिरात प्रधानमंत्री पॅकेज अंर्तगत त्यांना दिसली. तीन दिवसीय निवासी प्रशिक्षणाकरीता उपरोक्त महाविद्यालयाकडे अर्ज केला व लगेच प्रशिक्षणासाठी त्यांची निवड ही झाली. 'पशुसंर्वधन, दुग्धव्यवसाय व दुग्धपदार्थ निर्मिती' या विषयावर त्यांनी तीन दिवसीय प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

प्रशिक्षणाचा उपयोग म्हणुन त्यांनी प्रथम त्यांच्याकडे असलेल्या जनावरांचे दुध विकण्यास सुरूवात केली. सोबत आसपासच्या भागातून दुध संकलन करण्यास सुरूवात केली. दुधउत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त केले. त्यामुळे ३००० लि. दुधाची दररोज खरेदी करणे शक्य झाले. दुधाचा भाव शेतकऱ्यांना (म्हशीच्या दुधाची किंमत कमीत कमी ३० रू. प्रति लिटर जास्तीत जास्त ५२/- प्रति लिटर) व गायीच्या दुधासाठी २०-२५ रू. प्रति लिटर शेतकऱ्यांना मिळतात. सचोटी, मेहनत व प्रेरणादायी स्वभावामुळे शेतकरी सुध्दा त्यांना सहकार्य करीत आहेत. व्यवसायाशी संबंधीत असलेली उपकरणे त्यांनी महाविद्यालयाच्या दुग्धशाळेतील कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने खरेदी केली आहेत. संकलीत केलेल्या दुधापासुन दररोज १० प्रकारचे दुग्धपदार्थ तयार करून सुधाकरराव यवतमाळ, कळंब, आर्वी, राळेगाव, देवगाव, अमरावती इत्यादी ठिकाणी होलसेलमध्ये विकतात. बाभुळगाव परिसरात स्वत:चे दुग्धपदार्थ विक्री केंद्र चिल्लर विक्रीसाठी उभारलेले आहे.

दुग्धपदार्थ तयार करण्यासाठी दररोज ७०० लिटर दुध उपयोगात आणल्या जाते व उर्वरीत १२०० ते १५०० लिटर दुध पॉलीथीन पिशवीत पॅक करून विकण्यात येते. शिल्लक दुध रानडे डेअरी व शासकीय दुध योजनेला देण्यात येते. दुधापासुन वेगळया केलेल्या क्रिमचा उपयोग लोणी व तूप तयार करण्यासाठी होतो.

दुग्धव्यवसायाची वार्षिक उलाढाल चार वर्षात रू. ३-४ कोटी च्या नजीक झाली असल्याचे त्यांनी मुलाखती दरम्यान सांगितले. उपरोक्त व्यवसायाच्या भरवशावर आज त्यांच्याकडे ७० जनावरे आहेत. ४५०० चौ. फुटाचा प्लॉट हा भविष्यात व्यवसाय वाढविण्याच्या दृष्टीकोणातून तजवीज करून ठेवला आहे. अशा या प्रामाणिक व होतकरू तरूणाने बाभुळगावातील १५-२० बेरोजगार तरूणांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. परिसरातील शेतकरी, बेरोजगार त्यांच्याकडुन व्यवसाय संबंधात मार्गदर्शन घेत असतात.

श्री. सुधाकर महादेवराव ठाकरे,
रा. बाभुळगाव जि. यवतमाळ

मार्गदर्शक :
श्री. अनिल भा. वाकडे, दुग्धशाळा व्यवस्थापक,
डॉ. प्रशांत गो. वासनिक,
सहयोगी प्राध्यापक व दुग्धशाळा प्रमुख,
श्री नितीन वा. शिंदे,
सहाय्यक दुग्धशाळा व्यवस्थापक (गु.नि.),
दुग्धतंत्रज्ञान महाविद्यालय, वरूड (पुसद)





दुग्ध व्यवसाय : शेतीसाठी पुरक जोडधंदा

चार एकर शेती असलेला अल्पभुधारक श्री. दुधाने हे शेतकरी शेतातील उत्पन्नावर आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करतात. परंतु या भागातील शेतकरी गेल्या काही वर्षापासुन अनियंत्रित व अनियमीत हवामानामुळे हवालदिल झालेत. दुधाने यांची आर्थिक बाजु कुमकुवत असल्यामुळे आणि ढासळत्या कृषी व्यवस्थेत पर्यायी उत्पन्न आवश्यक असल्याशिवाय तरणोपाय नाही, म्हणुन दुधाने यांनी दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, वरूड येथून पशुसंवर्धनासोबत स्वच्छ दुध उत्पादनाची माहिती प्राप्त करून दुग्धव्यवसाय सुरू करण्याचा विचार केला.

सध्याच्या परिस्थितीचा मागोवा घेतल्यास ग्रामीण आणि शहरी भागात दुधाची चांगली मागणी आहे, परंतु पुरवठा अल्पप्रमाणात होतो. २००-३०० कि.मी. अंतरावरून पुसद शहरात दुध विकल्या जाते तेव्हा वस्तुस्थिती लक्षात घेवून दुधाने यांनी स्वच्छ दुध उत्पादन करून पुसद शहरात दुध विक्री सुरू केली. कारण त्यांच्याकडे ४ म्हशी असुन त्यापासुन १५ ते २० लिटर दुधाची विक्री ते खाजगी डेअरीत सुध्दा करतात. या व्यवसायापासुन रू. १८०००-२२०००/- दरमहा उत्पन्न सहजच प्राप्त होते.

आर्थिक मिळकतीशिवाय जनावरांपासुन शेणखत व मलमुत्र शेतीसाठी वापरतात. त्यामुळे रासायनिक खतावर होणारा खर्च सुध्दा कमी झाला आहे, असेही दुधाने म्हणतात. दुग्ध व्यवसायातुन जी मिळकत मिळते, त्यामुळे माझ्या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले. माझ्या वतीने जो निर्भिड दुधाचा पुरवठा होता त्यामूळे निश्चितच भेसळयुक्त दुधापासुन नागरिकांचे रक्षण होते यात मी समाधानी आहे, असेही त्यांनी नमुद केले.

श्री. विष्णु दुधाने,
मु. भाटंबा ता. पुसद
जि. यवतमाळ

मार्गदर्शक :
श्री. सचिन स. शिंदे, दुग्धशाळा सहाय्यक
श्री. अनंत वि. धोत्रे,
सहाय्यक प्राध्यापक (दुग्ध अभियांत्रिकी)
दुग्धतंत्रज्ञान महाविद्यालय, वरूड (पुसद)





दुष्काळात कोंबडयाची साथ

श्री प्रकाश भोयर यांनी ब्रॉयलर कोंबडीपालन करण्याचा चंग बांधला. त्यांच्या जवळ कोरडवाहू १२ एकर शेती आहे. त्यात ते तांदुळ व हरभरा ही पिके घेतात. पण तेही पावसाच्या भरवशावर, उत्पादन होईलच याची खात्री नाही. शेतीला पुरक असा उत्पन्न देणारा कोणता व्यवसाय करायचा या विवंचनेत असतांना नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या कुक्कुटपालनशास्त्र विभागाच्या मांसल कोंबडीपालन प्रशिक्षण संबंधी मित्रांकडुन माहिती गोळा केली. प्रशिक्षणादरम्यान पक्ष्यांचे व्यवस्थापन, खाद्य, लसीकरण, आजारावर औषधोपचार, बॅंक व सरकारी योजनांची अतिशय उपयुक्त अशी माहिती मिळाली. या व्यवसायातील शेतकऱ्यांशी चर्चा करून फायदे-तोटे त्यातील विविध पैलुंचे बारकावे घेत अडचणी समजल्या. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, कुक्कुटपालन व्यवसायात बाजारपेठ ही महत्वाची बाब आहे. त्यासाठी त्यांना ठोक व चिल्लर कोंबडी विक्रेता यांच्या प्रत्यक्ष भेटी घेवून या व्यवसायातील फायदे समजुन घेतले.

साडेतीन हजार चौ. फुटात तज्ञांच्या सल्ल्याने ब्रॉयलर शेडची उभारणी केली. भोयर यांनी निराश्रीत कुटुंबाला शेड शेजारी झोपडी बांधुन त्यांना कायमस्वरूपी राहण्याची व्यवस्था करून दिली.

बाजारात विविध खाजगी कंपन्याकडे एक दिवसीय ब्रॉयलर पिल्ले उपलब्ध असतात. अशा पिल्लांमधुन तज्ञांच्या सहाय्याने चांगल्या जातीची पिल्ले ते व्यवसायासाठी घेतात. साधारणत: पक्ष्यांची किंमत २०-२५ रू. असते. बाजारात उपलब्ध असलेल्या कंपन्यांकडुन ते खाद्य खरेदी करतात. दोन किलोचा पक्षी तयार करण्याकरीता त्याला ३.७ किलो खाद्य लागते, तसेच प्रतिकिलो १.६ ते १.७ असा एफ.सी.आर मिळतो. सद्य:स्थितीत ५५-६० रू. प्रतिकिलो उत्पादन खर्च येतो. वर्षाकाठी पाच ते सहा बॅचेस घेतल्या तर नफा तोटा यांची बेरीज करता वर्षाकाठी ३५०० पक्षामागे साधारणत: ३.५ लाख नफा मिळतो. प्रक्षेत्रावरून कधी-कधी वेळ पाहुन सुध्दा चिल्लर विक्री चालु असते.

नजीकच्या काळात ५००० ते ६००० पक्ष्यांची क्षमता वाढवून नवीन शेड तयार करण्याचा भोयर यांचा मनसुबा आहे. स्वत: खाद्य तयार करून खाद्यावर होणारा खर्च आवरता येईल, चिल्लर विक्रीचे दुकान उघडण्यासाठी जागेचा शोध घेणे सुरू आहे.

योग्य नियोजन आणि बाजारातील होत असलेल्या उलाढालीचा व्यवस्थितपणे आकलन केल्यास हमखास दुष्काळी परिस्थितीत कोंबडीपालन हा व्यवसाय शेतीला पुरक असा व्यवसाय होऊ शकतो, असे श्री प्रकाश भोयर यांनी दाखवून दिले आहे.

प्रकाश काशिराम भोयर
रा. रामपुरचक ता. आरमोरी जि. गडचिरोली

मार्गदर्शक :
डॉ मुकुंद कदम, डॉ मयुरा गोळे,
सहायक प्राध्यापक,
नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर





कुक्कुटपालनातून सापडला आर्थिक प्रगतीचा मार्ग

श्री सहेजादखान पठाण यांनी बारावी झाल्यानंतर आयटीआय मधुन डिप्लोमा कोर्स केला. बराच अवधी नोकरीच्या शोधात गेला. परंतु मनाजोगी नोकरी मिळेनाशी झाल्यावर काही तरी व्यवसाय करावा, याबाबत त्यांनी मित्रांशी चर्चा केली. दरम्यान नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयातील कुक्कुटपालन विभागातर्फे मांसल कोंबडीपालन प्रशिक्षण राबविण्यात येत असल्याची माहिती मिळाली. तेव्हा उपरोक्त महाविद्यालयातील तज्ञांशी चर्चा करून अल्प मुदतीचे मांसल कोंबडीपालन प्रशिक्षण २०११ मध्ये पूर्ण केले. या प्रशिक्षणातून पक्ष्यांच्या जाती, पक्ष्यांचे आरोग्य, व्यवस्थापन, लसीकरण, खाद्य व्यवस्थापनाची तांत्रिक माहिती मिळाली. तसेच कुक्कुटपालनासाठी बँक व सरकारी योजना मदत करत असल्याची ही माहिती मिळाली. जेव्हा पठाण यांच्या मनात पोल्ट्री फॉर्म सुरू करण्याची मानसिक तयारी झाली तेव्हा त्यांनी नागपूर शहर व नजीकच्या परिसरातील कोंबडी फार्म्सची पाहणी केली. तेथील लोकांशी आर्थिक उलाढालीबाबत चर्चा केली. त्यानंतरच त्यांनी पोल्ट्री फॉर्म सुरू करण्याचा मनसुबा केला.

श्री पठाण यांच्या कडे स्वत:ची जमीन नसल्यामुळे फार्म सुरू करण्याची अडचण होती. तेव्हा त्यांनी कोंबडी विक्रीचा व्यवसाय सुरू करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी नातवाईकांच्या जागेवर कोंबडी विक्रीचे लहानसे दुकान सुरू केले.

नजीकपासच्या पोल्ट्री फॉर्ममधुन सुरूवातीच्या ६ महिन्यात कोंबड्या विकत घेवून दुकानात विक्री सुरू केली. त्याचवेळी नागपूर पासुन १२ कि.मी. अंतरावरील गुमथळा या ठिकाणी पोल्ट्री फॉर्म रिकामा असल्याचे मित्रांकडुन कळले. तेव्हा त्या फॉर्म मालकाशी चर्चा करून आठ हजार रूपये महिना या भाडे तत्वावर पोल्ट्री फॉर्म सुरू करण्याचा ठाम इरादा केला. त्यात पठाण यांना कोंबड्याच्या व्यवस्थापनासाठी दोन्ही भावांचे व वडिलांचे चांगलेच सहकार्य मिळाले. प्रशिक्षणातून प्राप्त ज्ञानाद्वारे त्यांनी शास्त्रोक्त पदधतीने कुक्कुटपालन सुरू केले.

एका बॅचमध्ये तीन हजार कोंबड्यांचे व्यवस्थापन होते. एक दिवसाची पिले सर्वप्रथम छोटया शेडमध्ये सोडली जातात. त्यांचे खाद्य व्यवस्थापन, लसीकरण शिफारसीनुसार केले जाते. चार आठवडयांनतर कोंबडीचे वजन १ किलो २०० ग्रॅम होते. या कोंबड्यांना बाजारात मागणी असल्याने साधारण १००० कोंबड्यांची विक्री केली जाते. त्यातून मिळालेला नफा पुढील काळातील व्यवस्थापनाला उपयोगी ठरतो. उरलेल्या २००० कोंबड्यांना मोठया शेडमध्ये सोडल्या जातात. त्या ६ आठवडयापर्यंत सांभाळल्या जातात. त्यांचे वजन सरासरी दोन किलोपर्यंत होते. या दरम्यान पहिल्या शेडमध्ये साफसफाई करून पुढील बॅच मागविली जाते. वर्षातून एका पाठोपाठ आठ बॅचेस घेतल्या जातात. साधारणपणे डिसेंबरपासुन जुन पर्यंत कोबड्यांचे दर चांगले राहतात. बाजारपेठेची मागणी लक्षात घेवून कोंबड्यांच्या बॅचेसचे नियोजन केले जाते. सर्वसाधारण छोटया कोंबड्यांना जास्त भाव मिळतो. सहेजादखान शक्यतो जास्तीत जास्त कोंबड्या स्वत:च्या दुकानातून विकतात. उरलेल्या कोंबड्या परिसरातील व्यापाऱ्यांना बाजारपेठेच्या दरानुसार विकल्या जातात. बुधवार, शुक्रवार व रविवार या दिवशी कोंबड्यांची चांगली मागणी असते. किरकोळ विक्री करून एका बॅच मागे (४२ दिवसांची एक बॅच) सर्व व्यवस्थापन व मजुरी खर्च वजा जाता साधारण २५ हजार रूपये नफा सहेजादखान यांना मिळतो.

श्री सहेजादखान पठाण,
रा. जाफरनगर, नागपूर

मार्गदर्शक : डॉ मुकुंद कदम,
सहायक प्राध्यापक,
नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर





शेळीपालन व्यवसायाने दिला शेती व कुटुंबाला आर्थिक आधार

श्री. सुरेश पाटील हे लहानपणापासूनच शेतीशी निगडीत कामे करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावत असत. अशातच त्यांचं लग्न झाल्यावर कुटुंबाची जबाबदारी त्यांच्याकडे आली. आता शेतमजुरी करून भागणार नाही असे त्यांच्या मनाला वाटले. कोणतातरी व्यवसाय करावा म्हणुन, त्यांनी शेळीपालनास सुरूवात केली. पश्चिम महाराष्ट्रातील फलटण येथील निमकर गोटफार्म ला २०१२ ला भेट दिली. त्याठिकाणी जातीवंत शेळया, कृषी विज्ञान केंद्र, बारामती येथील शेळीपालन, त्यांचे शेड व खाद्यव्यवस्थापन पाहुन तेथील शेळीपालकांशी चर्चा केली.


नागपूरला आल्यानंतर नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाचे तज्ञ डॉ. विजय बसुनाथे व डॉ. भुषण रामटेके यांच्या कडुन त्यांनी शेळीपालन व्यवसाय व त्यातुन होणारे आर्थिक उत्पन्न या संबंधीचे मार्गदर्शन मिळाल्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला. नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाने दत्तकग्राम योजने अतंर्गत आयोजित केलेल्या अभ्यास दौऱ्यामुळे शास्त्रोक्त पध्दतीने व्यवयाय अधिक जोमाने करण्याची प्रेरणा मिळाली. सुरूवातीला त्यांच्याकडे ३ ते ४ शेळया होत्याच व दर सहा महिन्याला २ ते ३ शेळया/बोकड विकून ५ ते ६ हजार रूपये त्यांना मिळायचे. त्यातून आज त्यांच्याकडे १५ शेळया असून त्यापासून दरवर्षी १२ ते १५ बोकड/पाठ बाजारमध्ये विकत असतात. वर्षातुन एकदा बोकड विकण्याचा क्रम असल्यामुळे साधारणपणे २० ते २५ कि. वजनाच्या शेळीला ५ हजार रूपये पर्यंत किंमत मिळत असून दरवर्षी त्यांना ७० ते ७५ हजार रूपयाची मिळकत मिळत असते. खर्च फक्त आजारी शेळयांवरील औषधांचा थोडा फार असतो. त्यानंतर कुठलाही खर्च होत नसल्याचे पाटील यांनी सांगीतले. झुडपी जंगलात व मोकळया रानात शेळयांना ५ ते ६ तास चराईसाठी नेत असल्यामुळे खाद्यावरील खर्चाची सुध्दा बचत होते. गावातील शेळयांना एका शेळी मागे २००/- रू. प्रमाणे १० शेळया चराईसाठी नेत असल्याने त्यातुन त्यांना २०००/-रूपये महिन्याकाठी मिळतात. चराईसाठी एकाच व्यक्तिची गरज असते, घरातील लोक शेतमजुरी करून त्यातून मिळणारा पैसा घर खर्चासाठी केला जातो. त्यातुन उदरनिर्वाह सुध्दा होतो.

श्री पाटील यांच्याकडे तीन एकर शेती असुन भाऊ-बहीण मिळुन १० लोकांची सात बारावर नावे आहेत. पाटील यांना सुरूवातीपासुन शेतीविषयी आवड असल्यामुळे आणि शेळी व्यवसायामधून मिळणाऱ्या पैशातून शेतीकरीता बी-बियाणे, मशागत करण्याकरीता उपयोग केला जातो. शेळयांच्या लेंडीखताचा वापर शेतीकरीता केल्यामुळे वर्षाला तुर व कापूस यामधुन खर्च वजाकरून ५० हजार ते १ लाख रूपये पर्यंतचे उत्पन्न त्यांना मिळत असते. बैलजोडी व एक गाय शेतीच्या कामाकरीता विकत ही घेतली आहे. शेळीपालन व्यवसायामधुन मिळणारा पैसा मुलांचे शिक्षण, लग्नप्रसंग, शेतीकरीता बी-बियाणे व खत आणि इतर कामासाठी खर्च केला जातो. एकंदरीत शेळीपालन व्यवसायावर पाटील यांचा जम बसला असल्याचे लक्षात येते.

शेळीपालनातून २४ तास पैसा हातात असल्यामुळे कसल्याही प्रकारची भिती व काळजी राहत नाही. समोर येणाऱ्या संकटांशी सामना करण्याची त्यांना या मिळकतीमुळे बळ मिळाले.

मार्गदर्शक :
डॉ विजय बसुनाथे, सहायक प्राध्यापक,
नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर

श्री. सुरेश दुर्गा पाटील,
रा. बोरगांव (खुर्द) ता. जि. नागपूर






दत्तकग्राम योजनेअंतर्गत दुग्ध व्यावसायिकाने साधली आर्थिक प्रगती

नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय २०११ पासून दत्तकग्राम योजना बोरगाव (खुर्द) ता. जि. नागपूर या ठिकाणी राबवित आहे. त्यामध्ये गावातील शेतकरी पशुपालकांना पशुसंबंधी उपयुक्त माहिती देवून त्यांना आर्थिक दृष्टया सक्षम करण्याचे कार्य करण्यात येत आहे.

सन २०१२ मध्ये महाविद्यालयाव्दारे दत्तकग्राम योजनेअतंर्गत पशुपालकांसाठी पाच दिवसांचा राज्यस्तरीय अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला. त्यासाठी सरपंचासह, दुध, शेळी व कुक्कुटपालन करणाऱ्या दारिद्रय रेषेखालील पशुपालकांची निवड करण्यात आली. त्यात श्री. नामदेवराव राऊत यांचा सुध्दा समावेश होता. पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्हयातील गोविंद डेअरी व निमकर गोट फार्म व संशोधन संस्था या ठिकाणी भेटी देऊन तेथील गाईंच्या जाती, त्यांचे मुक्त संचार व्यवस्थापन, दुध काढण्याच्या (यंत्राव्दारे) पध्दती, संकलन, शीतकरण व बाजारपेठ या विषयी माहिती व मार्गदर्शन करण्यात आले. क्रांतीसिंह नाना पाटील पशुवैद्यक महाविद्यालय, शिरवळ येथील गायी, म्हशींच्या फार्मवर नेऊन जातीवंत खिल्लार व पंढरपूरी म्हशींचे महत्व सांगितले. त्यानंतर कृषी विज्ञान केंद्र, बारामती या ठिकाणी भेट दिल्यांनतर त्यांना तिथे विदेशी जातीच्या जर्सी, एच.एफ या गायींची विस्तृत माहिती देण्यात आली. त्यानंतर त्यांना मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय तर्फे गोरेगाव येथील फार्मवर नेऊन तेथील चाऱ्यांच्या निरनिराळ्या जाती दाखविण्यात आल्या. यामध्ये सर्वात आकर्षक व महत्वाची डी.एच.एन-६ नावाची चाऱ्याची जात त्यांना पटली व आवडली सुध्दा. त्याच्या लागवडी विषयी माहीती घेवून चाऱ्याचे ठोंब सुध्दा यांनी लागवडीसाठी घेतले.

नामदेवराव गावात परत आल्यावर त्यांनी घेतलेल्या अद्यावत ज्ञानाद्वारे एक-एक तत्रज्ञांनाचा वापर करण्यास सुरूवात केली. सर्वप्रथम सोबत आणलेल्या हिरव्या चाऱ्याचे ठोंबे डी.एच.एन-६ याची लागवड करण्यास सुरूवात केली. त्यांच्याकडे असलेल्या ६ गायींकरीता अर्ध्या एकरामध्ये १०० ठोंबे लावले. गाईंकरीता यांचा वापर करतांना प्रत्येक गाईमागे १/२ ते १ लिटर दूध वाढल्याचे त्यांच्या लक्षात आले, ही प्रक्रिया आज सुध्दा सुरू असुन त्यापासून त्यांच्याकडील दुधाचे उत्पादन वाढले. आज त्यांच्याकडे ९ गाई असुन दुध ६० लिटर होत आहे.

त्यांनी स्वत:चे व गावातील दुध २०१४ पासुन संकलन करण्याचे ठरविले. त्यावेळी केवळ २० लिटर दुध व्हायचे आज त्यांच्याकडे २५ दुध उत्पादक जोडल्या गेले असून ३०० लिटर दुधाचे संकलन होत आहे. सुरूवातीला गाईच्या दुधाला रू १८/- प्रति लिटर भाव होता आज तो रू. २७/- प्रति लिटर झाला आहे. या यशाचे श्रेय त्यांनी महाविद्यालयातील डॉ. बसुनाथे, डॉ. रामटेके, डॉ. गांवडे यांना दिले आहे.

या दुग्धव्यवसायामुळे खर्च वजा जाता महिन्याला ४०,०००/- रू. तर त्यांच्या शेतीकरीता गांडुळखत व परसबागेतील भाजीपाला उत्पादनाकरीता त्याचा उपयोग होत असून वर्षातील एक हंगामाला रू. ४० ते ५० हजार, तर, गोबरगॅस स्वंयपाकासाठी वापरत असल्यामुळे वर्षाला रू. ७०००/- पर्यंत सिलेंडर वरील खर्चाची बचत होते. दुधाचे संकलन केल्यानंतर खाजगी संस्थेव्दारे गावातुनच दुध शहरामध्ये विक्रीसाठी नेत असल्यामुळे दुधाच्या विक्रीचा फार मोठा प्रश्न मार्गी लागला.

श्री. नामदेवराव राऊत
बोरगाव (खुर्द) ता. जि. नागपूर

मार्गदर्शक :
डॉ विजय बसुनाथे,
सहायक प्राध्यापक,
नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर





शेतकऱ्याने दुग्धव्यवसायातून साधली आर्थिक प्रगती

श्री वासेकर यांच्याकडे ६ एकर कोरडवाहू शेती असुन देखील काहीच उत्पन्नाला मार्ग दिसत नसल्यामुळे त्यात वातावरणाचा प्रकोप त्यामुळे आर्थिक नुकसान देखील त्यांना सोसावे लागत होते. जनावरे असुन त्यांच्या चाऱ्याचाही प्रश्न होताच. तेव्हा नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयात दुग्धोत्पादनाचे ७ दिवसीय शास्त्रोक्त प्रशिक्षण घेऊन शास्त्रोक्त माहिती संग्राहय केली. प्रशिक्षण घेतल्यानंतर शासनाच्या योजनेतंर्गत त्यांनी सहा दुधाळ गाईंचा गट, कुटटी यंत्र, अझोला लागवड, मुरघासासाठी व्यवस्था करून घेतली. प्रक्षेत्र भेट व प्रात्यक्षिकांमधून आपल्या व्यवसायात सुधारणा करायला सुरूवात केली.

त्यांच्याकडे आज १५ दुधाळ गायी, ४ म्हशी देखील आहेत. त्यांच्याकडे असलेल्या ६ एकर पैकी ४ एकर शेतीमध्ये चारा उत्पादन करतात. ते आपल्या कुटुंबासोबत स्वत: कामे करतात. दोन कामगार दुध काढण्यासाठी ठेवलेत. भद्रावती येथील हॉटेलसाठी ४० रू. प्रति लिटर दराने ते दुध विक्री करतात. १०० लिटर दुध दररोज विकल्या जाते. या विक्रीतून वर्षाकाठी खर्च वजा जाता ५ लक्ष इतके उत्पन्न त्यांना मिळते. उत्तम आहार दिला तर उत्तम उत्पादन मिळते, हे लक्षात ठेवूनच त्यांनी जनावरांसाठी ढेप, चुनी, कुटार या चाऱ्यावर अधिक भर दिल्यामुळे उत्पन्नात वाढ होते, असे त्यांचे मत आहे आणि मुख्यत: त्यांना दुग्धव्यवसायाचे गमक कळले आहे. स्वत:च्या प्रयत्नातून व्यवसायात आलेल्या मंदीवर कधीही हताश न होता त्यांनी यशाचा डोलारा उभा केला आहे.

श्री वासेकर यांना डॉ. बावणे यांचेही नेहमीच मार्गदर्शन लाभले.

श्री चंदु नानाजी वासेकर
चिरोदवी, ता. भद्रावती
जि. चंद्रपूर

मार्गदर्शक :
डॉ. वैशाली बांठीया, डॉ सारीपुत लांडगे,
सहायक प्राध्यापक,
नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर







दुग्ध उत्पादन व दुग्ध प्रक्रिया करून धरली विकासाची कास

श्री. पांडुरंग टोंगे माजी सरपंच आणि वाणिज्य शाखेत पदवीधर असून भद्रावती येथील हे प्रसिध्द व्यक्तिमत्व दुग्धव्यवसायामुळे अजुन प्रसिध्दीच्या झोतात आलेत.

एका म्हशीपासुन त्यांनी व्यवसाय सुरू केला. दुध विक्रीतुन पैशांची बचत करून सोबतच शिक्षणही सुरू होतं आणि त्यातून त्यांनी एम.कॉम पर्यंत शिक्षण पुर्ण केले. त्यावेळी ते जैन मंदीर येथील उपहारगृहात दुध विकत देत असंत. परंतु दर त्यांना परवडत नव्हता व पैसे वसुलीसाठी सुध्दा त्यांना वाट पाहावी लागत असे. एकदा काही कामासाठी ते नागपूरला आले असता घाटे दुग्धमंदीरात ज्या पध्दतीने दुध विक्री केली जाते तीच पध्दत म्हणजे तव्याचे सुगंधी दुध तयार करून विकायचे हा विचार त्यांच्या मनात आला आणि त्यांनी तेव्हापासुनच दुग्धजन्य पदार्थ बनवून विक्री करण्याचा व्यवसाय सुरू केला. तव्याचे मसाला दुध २०० मि.ली २०/- रू. व साधे दुध ४०/- रू. लि. या दराने भद्रावती येथील गांधी चौकात ते विक्री करतात. सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत विक्री सुरू असते. दही, श्रीखंड, खवा, पनीर, चक्का, तुप, लोणी हे दुग्धजन्य पदार्थ रात्री ठरलेल्या दुधापासुन बनवितात. घरी उत्पादन होणारे ८० लिटर दुध स्वत: विक्री करून त्यातून त्यांना रू. ४५,००० ते ५०,००० नफा मिळत असतो. पशुंची योग्य निगा राखण्यासाठी त्यांनी ९१ ग २४ फुट आकाराचा गोठा बांधुन त्यात खेळती हवा राहण्यासाठी पंखे लावले आहेत, देखरेखीसाठी दोन व्यक्ती कामाला आहेत.

व्यवस्थापनामध्ये शेतातुन ते हिरवाचारा जनावरांना पुरवितात. कोरडा चारा म्हणजेच कुटार संग्रही ठेवतात. जनावरांना मुक्त विहार करण्यासाठी सोय केली आहे, परंतु २४ तास नाही. या व्यवसायामध्ये पत्नी व मुलगा यांचे नेहमीच सहकार्य असते. मुलगी अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहे, मुलाला काहीतरी नवीन उपयुक्त माहिती व्हावी, या हेतूने टोंगे यांनी नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयात पाच दिवसीय प्रशिक्षणासाठी पाठविले व व्यवसायात सुधारणा केल्या. पशुपालनाची आवड त्यांना लहानपणापासुनच होती, अनुभव दांडगा असल्यामुळे उपरोक्त व्यवसाय करणे सहज शक्य झाले. सध्या त्यांच्याकडे २६ जनावरांचा कळप आहे.

व्यवसायात वाढ होण्यामागे दुधाची चव अस्सल असणे गरजेचे आहे, असे ते आवर्जुन सांगतात. भद्रावती येथील राहणारे पण सध्या मुंबई व दुबईला वास्तव्य करणारे लोक जातांना आठवणीने दुग्धजन्य पदार्थ सोबत नेतात. व्यवसायाला अजुन भरभरून दाद मिळावी, म्हणुन व्यवसाय अजून मोठा करण्याचा त्यांचा संकल्प आहे. त्यासाठी ते नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय व कृषी विभाग तसेच पशुधन विकास अधिकारी डॉ. बावणे यांच्या नेहमी सानिध्यात असतात. कामाचे नियोजन, आखीवरेखीव सुत्रबध्दता, एखादा निर्णय कमालीच्या वेगानं घेण्याची क्षमता असल्यामुळे स्वत:ला व्यावसायीक सिध्द करायला त्यांना फारसा वेळ लागला नाही.

श्री. पांडुरंग श्रीकृष्णजी टोंगे
रा. भद्रावती, जि. चंद्रपुर

मार्गदर्शक :
डॉ. वैशाली बांठीया, डॉ सारीपुत लांडगे,
सहायक प्राध्यापक,
नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर







भविष्याच्या काळजीने सुचविले शेळीपालन

चुल आणि मुल सांभाळुन काही नवीन करू पाहणाऱ्या धाडसी गृहिणी वैशालीताईंनी त्यांच्या धामना या किरनापूर गावानजीकच्या ४ कि.मी. अंतरावर असणाऱ्या भुखंडावर शेळीपालन करण्याचे ठरविले. ५००० वर्ग फुट असणाऱ्या भुखंडाला भिंत बांधुन सुरक्षित व आतमध्ये मुरूम टाकुन आणि समतळ करून घेतले. त्यासाठी त्यांनी भाऊ रमेश मांगे व पती यांची मदत घेतली व शेळीपालन व्यवसाय आत्मनिर्भरतेने सुरू केला.

पतीचा व्यवसाय रद्दी पेपर व भंगार चिल्लर खरेदी करून मोठ्या व्यापाऱ्यांना विकणे एवढाच असुन वैशालीने घरच्या दुकानातुन तसेच इतर भंगार व्यवसायिकांकडून वापरलेले लोखंड आणुन २०*५० फुटाचे शेड बांधुन वर पत्रे टाकुन घेतले. त्यांनंतर ३७,०००/- रूपयामध्ये काटोल मधुन १७ शेळयांचा कळप विकत घेतला, त्यासाठी विहीर व टाके तयार केले. वीज नसल्यामुळे जनरेटर घेतले. दरम्यानच्या काळात ५ शेळया व ६ करडे आजाराने मरण पावले. परंतु हतबल न होता, व्यवसायात काही चुकत आहे काय, याचा त्यांनी शोध घेण्यास सुरूवात केली. त्यासाठी त्यांनी नागूपर पशुवैद्यक महाविद्यालयात येऊन पाच दिवसीय 'शास्त्रोक्त शेळीपालन प्रशिक्षण' घेतले व प्रक्षेत्र भेट आणि प्रात्यक्षिकांमधुन शेळीपालनातल्या महत्वाच्या बाबी समजुन घेतल्या. प्रशिक्षणात सांगितल्या प्रमाणे त्यांनी उस्मानाबादी जातीच्या ५ शेळया व १ बोकड २५० रूपये प्रति किलो दराने विकत आणला.

व्यवस्थापनामध्ये अर्धबंदिस्त शेळीपालन त्यांनी निवडले. सकाळी दोन तास व संध्याकाळी दोन तास चराईसाठी शेळया नेल्या जातात. त्यासाठी देखरेख व सर्व कामे करण्यासाठी त्यांनी २ कामगारांना ठेवले. कोरडया चाऱ्यामध्ये चना, भुसा तुरीचे कुटार हे देतात. खनिज मिश्रण दररोज २० ग्रॅम दिले जाते. लसीकरण व जंतनाशक औषध दिल्यामुळे शेळया सुदृढ असतात. नागपूर विक्रीसाठी नजीक आहे. ईद व होळी या सणांमध्ये बकऱ्यांना जास्त मागणी असते. त्यामुळे नफा देखील चांगला होतो. सध्या त्यांच्याकडे १२० शेळयांचा कळप आहे. अधुन-मधुन एक-दोन बोकडांची विक्रीही सुरूच असते. १७ शेळयांपासून सुरू केलेला व्यवसाय आज १२० वर गेला आहे, हे त्यांच्या यशाचे गमक आहे.

मुलगा ९ वर्ष व मुलगी ११ वर्षाची असुन चांगल्या शाळेत शिक्षण घेत आहेत. त्यांच्या व्यवसायामुळे इतर महिलांना सुध्दा प्रेरणा मिळत आहे. त्यांच्या व्यवसायाला भेट देण्यासाठी नेहमीच लोक येत असतात. व्यवसाय मोठा करण्यासाठी शेत विकत घेण्याचा त्यांचा मानस आहे. नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाशी त्या सतत संपर्कात असतात. हा व्यवसाय खरोखरच फायदेशीर आहे, हे त्यांनी आपल्या कर्तबगारीने सिध्द करून दाखविले आहे.

सौ. वैशाली सुरेशजी पात्रे
नागपूर

मार्गदर्शक :
डॉ. वैशाली बांठीया, डॉ सारीपुत लांडगे,
डॉ. जी. आर भोजने,
सहायक प्राध्यापक,
नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर





केमीकल इंजिनिअर करतोय शास्त्रोक्त पध्दतीने दुग्धव्यवसाय

श्री. अजय खंडेलवाल खाण मालक म्हणुन त्यांची कन्हान परिसरात ख्याती आहे. कारण त्यांच्या बसॉल्ट या खनिजांच्या खाणी विदर्भात सर्वत्र पसरलेल्या आहेत. व्यवसायाने रासायनिक अभियंते असुन सुध्दा त्यांनी दुग्धव्यवसाय सुरू करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी शेतात गाई व म्हशींचा गोठा शास्त्रोक्त पध्दतीने अरोली येथे बांधला. त्यात ५० गाई व ५० म्हशींचा कळप तयार करून व्यवसायाला सुरूवात केली. दुधाची विक्री त्यांनी अरोली परिसरात सुरू केली परंतु फारसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे त्यांनी कन्हान येथे दुधाचे वितरण केंद्र उघडले. व्यवसाय संबंधी माहिती नसल्यामुळे धंदयामध्ये तोटा सहन करावा लागला. तेव्हा महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे तज्ञ डॉ. सुनील सहातपूरे यांनी प्रजननाबाबत असलेल्या समस्या व त्यावरील उपचार वेळीच करून व्यवसाय कसा फायदेशीर करता येईल यासंबधीचे पध्दतशीरपणे मार्गदर्शन केल्यामुळे सध्या व्यवसाय फायदेशीर होत आहे.

दुधाच्या मागणीपेक्षा पुरवठा कमी असल्याचे विदर्भातील अनेक गावांमध्ये त्यांना आढळुन आले. तेव्हा त्यांनी कन्हान येथे दुधविक्री केंद्र सुरू केले. तसेच कन्हान परिसरातील दुग्धोत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांपासुन त्यांना योग्य भाव देवून त्यांच्यापासुन दुध संकलन सुरू केले. त्यापासुन दुध, तूप, पनीर, दही, चक्का या दुग्धजन्य पदार्थांची विक्री सुरू केली. तेव्हा पासुन व्यवसायाला चांगलाच प्रतिसाद मिळतो आहे.

जनावरांवर शास्त्रोक्त पध्दतीने नियमीत दुध मिळविण्यासाठी ऋतुचक्रांचे नियमन करून दर महिन्याला काही गाई व म्हशींना गाभण करण्यात येते. दर महिन्याला ऋतुचक्रांचे नियमन दहा गाई व म्हशींमध्ये त्या व्याल्यानंतर लगेच दोन महिन्यात त्यांना पुन्हा गाभण करण्यात येते. त्यामुळे त्यांना एका वेतात ८ ते ९ महीने निश्चित दुध मिळत असते व भाकड भार कमी होऊन आर्थिक नुकसान देखील होत नसते. त्यामुळे वर्षभर त्यांच्याकडे ७०० ते ८०० लिटर दुधाचे उत्पादन दररोज होते. भाकडभार कमी केल्यामुळे खाद्यावरचा खर्चही कमी होतो. पर्यायाने हा व्यवसाय भरभराटीसाठी हमखास आहे. नागपुर पशुवैद्यक महाविद्यालयातील तज्ञांची उपरोक्त शास्त्रोक्त पध्दतीने दुग्धव्यवसाय करण्यासाठी नेहमीच मदत मिळत असते.

वर उल्लेख केलेल्या पध्दतीचा अवलंब करून आजच्या घडीला रोज साधारणत: १५०० ते १६०० लि. दुधाची व दुग्धजन्य पदार्थांची विक्री करतात. त्यासाठी त्यांनी दुध विक्री केंद्रात कोल्ड स्टोरेजची सुध्दा व्यवस्था केली. त्यामुळे दुग्धजन्य पदार्थ अधिक काळापर्यंत साठवून ठेवता येतात, त्यामुळे त्यांची विक्री केव्हाही करता येते.

९० एकरात त्यांनी दुग्धव्यवसायासोबतच अरोली येथे उत्कृष्ट शेती करणे सुरू केले. त्यात धानाची, तुरीची व गव्हाची लागवड दरवर्षी करण्यात येते. शेतीला लागणारे शेणखत त्यांना गोबर गॅस प्लॉन्टच्या माध्यमातून नेहमी तयार मिळते. याच प्लॉन्टवर त्यांनी पॉवर जनरेटर लावून वीज निर्माण केली. लोड शेडींग झाली तरी त्यांच्या बोअरवेल्स हया जनरेटरवर सुरू असतात. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मुबलक शेणखतामुळे पीक सुध्दा भरघोस होत आहे.

श्री. अजय खंडेलवाल
कन्हान, जि. नागपूर

मार्गदर्शक :
डॉ. एस. के. सहातपूरे
प्राध्यापक (प्रभारी),
नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर







विधानपरिषदेचे माजी सदस्य करतात यशस्वी दुग्धव्यवसाय

विधान परिषदेचे माजी सदस्य श्री. अशोक मानकर हे २०१५ मध्ये इस्त्रायल अभ्यास दौऱ्यात गेले असता, त्यांनी तेथील शेती व शेतीपूरक व्यावसायाची इत्यंभूत माहिती घेवून भारतात परत आल्यावर दुधव्यवसाय करण्याचा इरादा पक्का केला. त्यांना असलेल्या अनुभवातून परिसराला (वलनी) ता.जि. नागपूर कसं समृध्द व विकसीत करता येईल त्या दृष्टिने त्यांनी डेअरी प्रकल्पाची उभारणी करण्याचा विचार केला कारण येथे त्यांची शेती देखील आहे.

त्या संदर्भात त्यांनी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे तज्ञ डॉ. सुनील सहातपूरे यांच्याशी उपरोक्त विषयावर प्रदीर्घ चर्चा करून मुऱ्हा जातीच्या ५ म्हशी सोबतच एच.एफ. गाईंची खरेदी केली. आज त्यांच्याकडे ११ जनावरे आहेत. त्यांच्याकडील दुधाळ जनावरांपासुन त्यांना दोन्ही वेळेस १५० लिटर इतके दुध होते. परिसरातील व नजीकच्या गावातील शेतकऱ्यांपासुन दुध खरेदी करून त्यांना चांगला मोबदला देण्याचा मनसुबा केला. त्यामुळे ४५० लिटर दुधाचे संकलन होते. एकंदरीत संकलन झालेल्या ६०० लिटर दुधाची विक्री ते नागपूरला करतात. दुधाची खरेदी करतेवेळी गाईचे दूध ३० रूपये तर म्हशीचे ४० रूपये प्रति लिटर दराने खरेदी करतात. फॅटमुळे खरेदी दरात चढउतार होत असतात, असे मानकर यांनी सांगीतले. शेतीपूरक व्यवसायाच्या संधी या भागातील दुध उत्पादकांना उपलब्ध करून देण्याचा या माध्यमातून ते प्रयत्न करताहेत.

श्री मानकर यांनी जयवंत, मल्टी कटींग ज्वारी तसेच मका इत्यादिंची प्रक्षेत्रावर लागवड केली आहे. हिरव्या चाऱ्याची उपलब्धता बारा महिने व्हावी यासाठी ते प्रयत्न करताहेत. जनावरांसाठी ढेप खरेदी करावी लागते.

संकलीत झालेले दुध नागपूरातील केंद्रावरून विकण्याची सोय आहे. वाचलेल्या दुधापासुन दही, पनीर, खवा असे पदार्थ तयार केले जातात. श्रीखंड, बासुंदी हे दुग्धजन्य पदार्थ मागणी असल्यास तयार करून दिले जातात. गाईचे दुध ४० तर तर म्हशीचे दुध ५० रूपये लिटर प्रमाणे विकल्या जाते. प्रक्रियाजन्य पदार्थांमध्ये दही ८० रूपये किलो, श्रीखंड २०० रूपये, तूप ५५० रू किलो दराने विक्री केली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

वलनी येथे ४० x ६० फुट आकाराचा गोठा बांधण्यात आला. त्यावर ७ लाख रूपये खर्च आला. अर्धमुक्त पध्दतीचा वापर या ठिकाणी केला आहे. दुध काढण्यासाठी यंत्राचा वापर केला जातो, माफसुच्या पशुवैद्यकांची सेवा घेतली जाते. माफसुचे डॉ. सुनील सहातपूरे यांचे तांत्रिक मार्गदर्शन त्यांना मिळत असते. तोंडखुरी, पायखुरी व इतर लसीकरण तसेच आधुनिक व विदेशी तंत्रज्ञानाचा वापर करीत कृत्रीम रेतनाचे काम ते करतात. पुढील वाटचालीस शेतकऱ्यांचे व स्वत:चे मिळून ५००० हजार लिटर दूध संकलनाच लक्ष्य साध्य करायचं, असा मनोदय त्यांनी व्यक्त केला, हे त्यांच्या कार्यतत्परतेची चुणुक आहे, असे म्हणणे वागवे होणार नाही.

अशोक मानकर
विधान परिषदचे माजी सदस्य,
नागपूर

मार्गदर्शक :
डॉ. एस. के. सहातपूरे
प्राध्यापक (प्रभारी),
नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर







श्वानपालन छंद ठरला आर्थिक उन्नतीचा मार्ग

श्री. मारोतराव आहेर सुशिक्षित शेतकरी असुन त्यांचेकडे २० एकर शेती असुन ती सांभाळणे व माणुस ठेवणे सुध्दा अशक्यप्राय बाब होती. तेव्हा विश्वासु पहारेकरी जो शेती व असलेल्या जमिनीवरील नगदी पिकांचे संरक्षण करू शकतो त्यांची त्यांना गरज होती. श्वानपालनाची आवड त्यांना लहानपणापासुनच असल्याने शेती रक्षणासाठी श्वानपालन करावे आणि त्यातून आपला छंद सुध्दा जोपासावा ही आंतरिक इच्छा त्यांच्या मनात आली. श्वानांच्या अनेक जाती असल्यामुळे त्यापैकी नेमकी कोणती जात पाळावी जेणेकरून आपल्या शेतीचे रक्षण होईल हा अवघड प्रश्न येताच श्वानांच्या विविध जाती, त्यांचे व्यवस्थापन (जंतनाशन आणि लसीकरण) संबंधीची माहिती मिळविण्यासाठी पशुवैद्यक महाविद्यालय, परभणी येथील डॉ विलास आहेर यांच्याशी संपर्क साधला असता डॉ आहेर यांनी कारवान या श्वानाच्या जातीबद्दल जी मराठवाडयाची शान आहे, त्याची माहिती देवून उदगीर जि. लातूर येथे श्वान प्रदर्शन पाहण्यास आमंत्रीत केले. त्या प्रदर्शनात कारवान श्वान मारोतरावांना दाखविण्यात आला. तेव्हा त्यांनी श्री नंदु कासले यांचे उदगीर तालुक्यातील वडवळ हे गाव गाठुन त्यांचेकडे असलेली जातीवंत कारवान पिल्लाची जोडी ५००० रूपयांत विकत आणली. डॉ आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पिल्लांचे संगोपन आणि व्यवस्थापन सुरू केले. तंत्रशुध्द पण अत्यंत साध्या पध्दतीचा वापर करून पिल्ले कमी अवधीत अंग धरू लागताच वयात आली, डॉ आहेर यांच्या सल्ल्यानेच ती पैदासीस योग्य ठरली. कारण एका मादीपासुन पहिल्याच वेतात त्यांना ७ पिल्ले मिळाली.

कारवानची अंग काठी सडपातळ, उंच पण लांबट पायाचे पंजे मजबुत, पसरट, लवचिक तोंड, अगदी निमुळते आणि बारीक दिसणाऱ्या या जातीच्या काटकपणाबद्दल श्री मारोतरावांना शंका होती. पण जेव्हा कारवान पोसण्यास सुरूवात केली तेव्हा त्यांचा भ्रमनिराश झाला. वास्तविक सडपातळ व लांबट असणारी ती जात अत्यंत काटक, चपळ व इमानदार असुन शेती व घराच्या रक्षणासाठी दमदार व अत्यंत उपयुक्त आहे, असा ठाम विश्वास खातर जमा झाला. जातीवंत कारवान श्वानांची उपयोगीता परिसरात चर्चेचा विषय ठरली. तेव्हा स्थानिक शेतकऱ्यांना त्याची गरज भासु लागली. यासाठी त्यांनी पिल्लांची विक्री करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी दैनिक वर्तमानपत्रातुन पिल्ले विक्रीची जाहिरात दिली. बातमी प्रसिध्द झाल्यामुळे ॲडव्हांस बुकींग सुरू केले. त्यामुळे पिल्ले जन्मल्यानंतर डोळे उघडण्या आधीच पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी पिल्ले खरेदी करण्यास सुरूवात केली. यामुळे पिल्लांच्या व्यवस्थापनावरील खर्चात बचत झाली. लोकांची मागणी वाढली.

श्री मारोतराव कडे असलेली जातीवंत १ नर व १ मादी यांच्या पैदासातून वर्षाकाठी खर्च (जंतनाशन, लसीकरण, आहार ई.) यावरील खर्च वजाजाता ६० ते ७० हजार रूपये मिळतात. डॉ विलास आहेर यांचा तांत्रिक सल्ला व पशुवैद्यकीय सेवा मोफत मिळत असल्याने पशुवैद्यकाला द्यावी लागणारी फी ची बचत झाली. कारवान श्वानांना दैनंदिन आहार (भात, ज्वारीची भाकरी, पोळी ई) द्यावी लागते. शेतात कोंबडया असल्यास त्यांची अंडी श्वानांची प्रकृती चांगली राहावी म्हणुन दिली जातात. उपरोक्त बाबींसाठी वर्षाकाठी लागणारा खर्च जास्तीत जास्त १० ते १५ हजार इतका होतो. परंतु पिल्ले विक्रीतून वर्षाकाठी ५० ते ६० हजार रूपये निव्वळ नफा होतो हे त्यांच्या परिश्रमाचं फलीत आहे, जे आत त्यांना मिळत आहे.

मार्गदर्शक : डॉ. विलास आहेर
प्रभारी अधिकारी, शैक्षणिक पशुचिकित्सा संकुल,
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी

श्री. मारोतराव नारायणराव आहेर
रा. आवस्पोंडा ता. औंध जि. हिंगोली





रायपुर गावातील पशुपालकाची यशोगाथा

श्री तानाजी मस्के मु. रायपुर जि. परभणी येथील शेतकरी आहेत. मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी मधुन त्यांनी बी.टेक पर्यंत शिक्षण केले. त्यांच्याकडे सुपीक २० एकर जमीन असुन मराठवाडयात पडलेल्या दुष्काळामुळे शेतीला पुरक व्यवसाय म्हणुन दुग्धव्यवसाय सुरू करण्याचा त्यांनी बेत केला.

लाल कंधारी संशोधन व प्रशिक्षण प्रक्षेत्र, पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी या ठिकाणी दुग्धव्यावसायाची तांत्रिक माहिती मिळविण्यासाठी त्यांनी संपर्क साधला. त्यावेळी प्रक्षेत्रावरील उपलब्ध संसाधने जसे जमीनीचा प्रकार, ओलीताची सोय, शेतीची भौगोलिक परिस्थिती, मजुरांची उपलब्धता इत्यादींची मस्के यांच्या शेतीला भेट देवून तज्ञांनी अवलोकनासोबत माहिती घेतली. दुग्धव्यवसायात गुंतवणुक करण्याची मस्के यांची मानसिक तयारी बघुन आणि परभणी शहराला म्हशीच्या दुधाची जास्त मागणी असुन ८ गाभण जाफराबादी म्हशी विकत घेवून दुग्धव्यवसाय सुरू करण्याचा सल्ला तज्ञांनी दिला. मस्के यांनी म्हशीचे शास्त्रोक्त पध्दतीने संगोपन कसे करायचे या संबंधीचे प्रशिक्षण लाल कंधारी संशोधन व प्रशिक्षण प्रक्षेत्र या ठिकाणी घेतले.

प्रथम त्यांनी आपल्या शेतामध्ये दोन एकर जमीनीवर डी.एच.एन-६ (संपूर्णा) जातीच्या बहुवार्षिक गवताची लागवड केली. त्यासाठी लागणाऱ्या ठोंबाचा पुरवठा लाल कंधारी प्रक्षेत्रावरून करण्यात आला. डी.एच.एन-६ बहुवार्षिक ठोंबाची लावणी कशी करावी, खताची मात्रा किती द्यावी तसेच इतर आंतर मशागतीच्या कामाबद्दल मार्गदर्शन ही करण्यात आले. वर्षभर म्हशींसाठी वाळलेला चारा उपलब्ध राहावा म्हणुन ज्वारी (कळवळ) चे उत्पादन त्यांनी घेतले. सोबतच तुरीचे, हरबऱ्याचे कुटार/गुळी साठवून ठेवले, जेणेकरून दुष्काळ परिस्थितीत वैरणीवरील खर्च कमी होतो.

उपरोक्त म्हशी ४ महिन्याच्या आत व्याल्या. त्यामुळे साधारणत: ६० ते ७० लिटर दुध दररोज स्थानिक बाजारात स्टॉल लावून चिल्लर विक्री मस्के करीत असत. तज्ञ मंडळी त्यांच्या फार्मला नियमित भेट देवून म्हशीची काळजी कशी घ्यावी, आहार काय द्यावा, स्वच्छ दुध उत्पादन इत्यादींचे वारंवार मार्गदर्शन करीत असतात.

आज मस्के यांचेकडे १६ म्हशी आहेत. वर्षभर कमीत कमी ८ म्हशी दुध दुभत्या राहतील या प्रमाणे त्यांचे नियोजन करण्यात येते उन्हाळयात जास्त तापमानापासुन म्हशींचे संरक्षण करण्यासाठी गोठयामध्ये फॉगरची व्यवस्था करण्यात आली आहे. सोबतच आहारात गुळ, मिठ, ताक, खनिज मिश्रण इत्यादिंचा समावेश केल्या जातो. प्रत्येक वेळी तज्ञांद्वारे मिळणाऱ्या सल्ल्यामुळे व मस्के यांच्या परिश्रमामुळे त्यांचा हा व्यवसाय भरभराटीस येत आहे. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाचा गावात सामाजिक व आर्थिक दर्जा वाढत असल्यामुळे सुख व समाधानाने जीवन व्यतीत करीत आहे.

श्री तानाजी सोपानराव मस्के
रा. रायपुर जि. परभणी

मार्गदर्शक :
डॉ. एम.एफ. सिध्दीकी
पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी





दुधसंकलनातुन साधला शाश्वत रोजगार

श्री अविनाश पाटील यांची वडीलोपार्जित ५ एकर शेती असुन आई-वडील शेती करतात. त्यात डाळींब व उसाचे पिक घेतल्या जाते. अविनाशचे बी.एस्सी पर्यंत शिक्षण झाले असुन नोकरीच्या मागे न लागता शेती करण्यास सुरूवात केली. तेव्हा शेतीमधुन डाळींबाच्या पिकाने लाखो रूपयांचे उत्पन्न मिळवून दिले. पण त्यानंतर दुष्काळ आणि डाळींबांना लागलेला तेल्या रोग त्यामुळे फार मोठया नुकसानीला सामोरे जावं लागलं. त्यातुन स्वत:ला सावरत २०११ मध्ये दुधसंकलन केंद्र सुरू केले. सुरवातीला ५०-६० लि. दुध संकलन करून ते सहकारी दुधसंघास देणे सुरू केले. हळु-हळु दुधसंकलन वाढले, परंतु या व्यवसायामध्ये त्यांना फारसा फायदा दिसत नव्हता. त्यात दुध खराब होणे, दुध चांगल्या प्रतिचे नसल्यामुळे दर कमी मिळणे अशा घटना होवू लागल्या. त्यामुळे त्रस्त होवून व्यवसाय बंद करण्याचा विचार मनात येवू लागला. दरम्यान क्रांतीसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ यांची दुधप्रक्रिया प्रशिक्षणाची जाहिरात, वर्तमानपत्रात वाचली आणि त्यांनी प्रशिक्षण घेण्याचे ठरविले. पाच दिवसीय उपरोक्त प्रशिक्षण घेतांना त्यांना व्यवसायात तोटा होण्याची कारणे कळली. त्यात दुध संकलनासाठी दुधाची प्रत तपासणी व साठवणुक हे अत्यंत महत्वाचे मुद्दे त्यांनी समजुन घेतले. दुधावरील विविध प्रक्रिया, विविध प्रकारचे दुग्धपदार्थ तयार करणे, दुध व दुधाची गुणवत्ता नियंत्रण व शासनाच्या योजना इत्यादी विषयाचे त्यांना सविस्तर मार्गदर्शन मिळाले, म्हणुनच उदंड आत्मविश्वासाने हा उपक्रम साकार केला.

सर्वप्रथम त्यांनी दुधसंकलनात आवश्यक ते बदल करून प्रामुख्याने गुणवत्ता नियंत्रण प्रभावीपणे राबविले. त्यामुळे दुधाची गुणवत्ता टिकवून ठेवल्यामुळे फायदा वाढला आहे. दैनंदिन १०० लि. दुधसंकलनापासुन आज त्यांच्याकडे रोज ४७०० लि दुधसंकलन होत आहे. ४०० शेतकऱ्यांकडुन एकुण ५ गावातील दोन पीक अप गाडयांच्या सहाय्याने रोज सकाळ व संध्याकाळ दुधसंकलन केले जाते. या कामाकरीता घरातील तीन व्यक्ति व इतर ६ कामगार काम करताहेत. संकलीत केलेलं दुध थंड करण्यासाठी २००० लि. प्रति तास क्षमतेचा शीतकरण प्रकल्प उभारला आहे. त्यासाठी बॅंक ऑफ इंडिया कडुन रू १६.०० लाखांचे कर्ज घेवून २०१४ साली प्रकल्प सुरू केला. प्रकल्पात थंड केलेले दुध सुरूवातीस बारामती व सध्या हैद्राबाद येथील दुध प्रकल्पास पुरवले जाते. संबंधीत प्रकल्पातील दुधाचे टॅंकर अविनाश यांच्या संकलन केंद्रावरून दुध घेवून जातात. प्रकल्पासाठी स्वत:च्या जागेत त्यांनी २० x ३२ फुटाचे शेड उभारले आहे. सन २०११ मध्ये स्वत:चे फक्त ५०,००० रू गुंतवणूक करून सुरू केलेला दुध संकलन व्यवसाय लाखो रूपयांच्या गुंतवणुकीपर्यंत वाढला आहे. याचे संपुर्ण श्रेय क्रां.ना.पा, पवैम, शिरवळ येथील प्रशिक्षणास जाते. त्यांनी जर प्रशिक्षण केले नसते तर दुध संकलन व्यवसाय बंद करायचा विचार पक्का झाला होता. प्रशिक्षणात प्रात्यक्षिकांद्वारे जे शिकण्यास मिळाले, त्यामूळे ते व्यवसायात पुन्हा भरारी घेवू शकले. कुटुंबीयांचा पाठींबा, परिश्रम, चिकाटी, कार्यतत्परतेमुळे यशस्वी झालो, असे प्रांजळपणे ते कबुल करतात. भविष्यात स्वत:च्या ब्रॅंडचे दुध व दुग्धजन्य पदार्थ तयार करण्याचे नियोजन आहे. त्यांना ज्यांनी प्रशिक्षण दिले ते डॉ. बी. आर. कदम व त्यांचे सहकारी प्राध्यापक व कर्मचारी यांचा तसेच क्रां.ना.पा, शिरवळ व मपमविवि, नागपूर यांचे त्यांनी आभार मानले.

श्री अविनाश रावण पाटील
मु.पो. अरण, ता. माठा जि. सोलापूर

मार्गदर्शक :
डॉ बी. आर. कदम,
सहाय्यक प्राध्यापक,
क्रां.ना.पा. पशुवैद्यक महाविद्यालय, शिरवळ





शेळीपालन ठरले बँक एटीएम

श्री. विरकर यांची वडीलोपार्जित ८ ते १० एकर जमीन विरकरवाडीत असुन हा प्रदेश दुष्काळी व पर्जन्य छायेखाली असल्यामुळे जमीन नापिकी आहे. सतत दुष्काळ पडत असुन शेतीला पुरक व्यवसाय करावा असा विचार त्यांच्या मनात आला. नजीकच्या गावातील शेळीपालन मार्गदर्शक डॉ. तेजस शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बंदिस्त पध्दतीने शेळीपालन व्यवसाय करण्याचे ठरविले. बोकडयांच्या मटणाची चव, चढता बाजारभाव आणि वाढती मागणी याचा सारासार विचार करूनच उपरोक्त व्यवसाय सुरू केला, असे म्हटले तरी वावगे होणार नाही. त्यासाठी शेळीची ५० पिल्ले (३० माद्या व २० नर) एका लाखात खरेदी करून मार्च २०१४ ला उपरोक्त व्यवसायाची सुरूवात केली.

मका, सुबाभुळ, शेवरी, दशरथ, डी.एच.एन-६, काडी घास या विविध चारापिकांची त्यांनी लागवड केली. सुका व ओला चाऱ्याचे व आंबवणाचे नियोजनही केले. डॉ. शेंडे यांच्या मार्गदर्शनामुळे शेळीपालनातील नोंदीविषयक २४ तासांचे वेळापत्रक आणि दैनंदिन कामकाज हे निश्चित केल्यामुळे जंतनिर्मुलन, लसीकरण यांचे देखील नियोजन करता आले. आठ लाख ६० हजाराला २० मादी व १८ बोकडांची विक्री २०१५ डिसेंबर मध्ये केली. या व्यवसायातील व्यवस्थापनावर रू ३ लाख खर्च वगळता विरकरांना चार लाख ६० हजार नफा दोन वर्षानंतर झाला. १६ बोकड, ९ माद्या व ६ गाभण शेळया अशा एकुण ३१ शेळयांचा कळप आज त्यांच्याकडे आहे. कुटुंबातील लोकांची जीवापाड साथ असल्यामुळे या व्यवसायाची निवड करायचे धाडस केले. त्यामुळे आज मी सुखी व समाधानी असल्याचे त्यांनी सांगीतले.

श्री. भगतसिंग उर्फ तुशार पांडुरंग विरकर
रा. विरकरवाडी. ता. माण,
जि. सातारा

मार्गदर्शक :
डॉ. तेजस चंद्रकांत शेंडे,
सहाय्यक प्राध्यापक,
क्रां.ना.पा. पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ





करार पध्दतीच्या कुक्कुट व्यवसायातुन साधला शाश्वत रोजगार

श्री. संभाजी भोसले हे पदवीधर असुन सुध्दा त्यांना शेतीची आवड असल्यामुळे ते शेतीकडे वळले. त्यांच्याकडे ४ एकर शेती असुन दुष्काळी परिस्थितीमुळे फारसे उत्पन्न मिळत नव्हते. तेव्हा शेतीला पुरक व्यवसाय करायचा या शोधात असतांना त्यांनी ॲग्रोवन दैनिकात कुक्कूटपालन प्रशिक्षण असल्याची जाहिरात वाचली. त्यानुसार क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ या ठिकाणी उपरोक्त व्यवसायात प्रशिक्षण घेतले. सदर प्रशिक्षणाच्या माध्यमातुन छपराच्या शेडमध्ये २०० देशी पक्षांचे तीन महिने पर्यंत संगोपन करून त्यांची विक्री स्थानिक स्तरावर व कोल्हापूर येथे २००/- रू. प्रति किलो जिवंत पक्षी प्रमाणे केली. नर पक्षांचे वजन साधारणत: १२०० ते १३०० ग्रॅम व मादी पक्षांचे वजन १००० ते १०५० ग्रॅम भरते. त्या पक्षांच्या विक्रीपासून त्यांना रुपये ४०,०००/- उत्पन्न मिळाले. तेव्हापासुन त्यांनी प्रत्येक वर्षी दोन बॅचेस काढण्यास सुरूवात केली. पक्षांची सरसकट विक्री होत नसल्यामुळे प्रति बॅच २०० पक्षांपेक्षा जास्त पक्ष्यांचे पालन करीत नाहीत. प्रशिक्षणामुळे देशी पक्षी पालनाविषयी त्यांना बरेच ज्ञान अवगत झाले. वरील व्यवसायापासून जो आर्थिक लाभ झाला त्यातून त्यांनी ब्रॉयलर पक्षांसाठी शेड बांधण्याचे ठरविले. तेव्हा त्यांनी २००० चौ.फु. शेडची उभारणी करण्याकरीता ४,००,००० रू खर्च केलेत. हे सर्व त्यांनी कुक्कुटपालन शास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. व्ही. डी. लोणकर यांच्या मार्गदर्शनाखाली केले. त्या शेडमध्ये त्यांनी १५०० पक्ष्यांची व्यवस्था केली. त्यातून त्यांना १६०००/- रू नफा मिळाला. तुषार पोल्ट्री, आत्तेगिरी, कोल्हापूर यांच्या बरोबर २०१५ मध्ये करार करून त्यापद्धतीने व्यवसाय करण्याचे ठरविले. दुर्दम्य आत्मविश्वास, प्रचंड इच्छाशक्तीच्या भरवशावर हे शक्य झाले.

त्यांनी एकूण ८४०० पक्षांचे ५ बॅचेसमध्ये संगोपन व व्यवस्थापन केले. त्यावर त्यांना १०,२३,९६०/- रू खर्च आला आणि विक्रीतून ११,८६,९८०/- रू मिळाले. विक्रीतून खर्च वजा करता श्री भोसले यांना १,६३,०००/- रू एवढा निव्वळ नफा मिळाला. करार पद्धतीमुळे व्यवसाय केल्याने एकदिवसीय पिल्लांना लागणारे खाद्य, लसी, औषधी व पशुवैद्यकीय सुविधा सहजरित्या उपलब्ध झाल्याचे त्यांनी सांगितले. श्री. भोसले यांना प्रति किलो पक्षी तयार करण्यासाठी सरासरी ५३/- रू उत्पादन खर्च येतो. त्यात मरतुकीचे प्रमाण सरासरी ३.७ टक्के असते. पक्षांच्या विक्रीचे वजन साधारणत: २३०० ते २४०० ग्रॅम असते. खाद्याचे मांसात रूपांतर करण्याचे प्रमाण सरासरी १.६९ ते १.७० व विक्रीचा दर सरासरी ६३.८/- रू एवढा मिळाला.

पोल्ट्री व्यवसायातून मिळत असलेल्या उत्पन्नामुळे साधारणत: ३००० पक्षी क्षमतेचे शेड बांधण्याचा मनोदय असल्याचे त्यांनी सांगितले. पोल्ट्री हा व्यवसाय शेतीला जोडधंदा म्हणून योग्य असा पर्याय असल्याचे देखील त्यांनी सांगीतले. शास्त्रोक्त पध्दतीने व्यवसाय केल्यास अधिक उत्पन्न मिळण्यास मदत होते, याचा अनुभव त्यांनी घेतला. ब्रॉयलर पक्षी पालनाबरोबर ५००-१००० देशी पक्षीपालन पुर्ववत सुरू करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

श्री. संभाजी विलास भोसले,
मु. पो. कांचनवाडी. ता. करवीर. जि. कोल्हापूर

मार्गदर्शक :
डॉ. व्ही. डी. लोणकर,सहाय्यक प्राध्यापक,
क्रां.ना.पा. पशुवैद्यक महाविद्यालय, शिरवळ



बंदिस्त शेळीपालन व्यवस्थापनाने साधली उत्तम प्रगती

श्री. अजित सोरटे यांनी प्रथम १० गावठी शेळयांपासुन पारंपारिक पध्दतीने शेळीपालन व्यवसायास सुरूवात केली. परंतु शेळीपालनाची माहिती नसल्यामुळे त्यांना बऱ्याच अडचणींशी सामना करावा लागला. त्यात पिल्लांची मरतुकीमुळे मिळणारा नफा देखील नाही सारखा होतो. तेव्हा त्यांनी क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालयातील डॉ. अ. वि. खानविलकर व डॉ. सा. म. भोकरे जे पशुउत्पादन व व्यवस्थापन विभागातील असल्यामुळे आधुनिक शेळीपालनाची माहिती घेवून त्यांच्याकडे असलेला पारंपारिक पध्दतीचा शेळीपालनाचा अनुभव आणि वातावरणाशी समरस व तग धरणाऱ्या सिरोही जातीच्या शेळयांची त्यांनी निवड करून खरेदी केली आणि शेतीपुरक व्यावसाय म्हणुन त्यांनी सुरूवात केली. शेळयांसाठी बंदिस्त गोठा बांधुन त्यांना लागणारा हिरवा चारा त्यात लसुन गवत, शेवरी, सुबाभुळ, दशरथ गवत तसेच वाळलेले गवत त्यांनी आपल्याच शेतात तयार केल्यामुळे लागणारा पूरक आहार घरच्या घरी बनवून खाद्यावरील खर्चाला आळा घालता आला. शेळयांच्या आरोग्याच्या दृष्टीने दैनंदिन नोंदी ठेवून त्याप्रमाणे जंतनाशक औषध पाजणे, नियमित लसीकरण करून त्यांची काळजी घेणे हे व्यवस्थापन नीट सांभाळले. २५० जातीवंत सिरोही जातीच्या शेळयांमध्ये नरांचाही समावेश आहे. बकरी ईदच्या दिवशी ईदीचा बोकड म्हणुन विक्री करतात.

३७ शेळया, ५२ बोकड प्रती किलो ३५० रू. या जिवंत वजनानुसार ते स्थानिक व्यापाऱ्यांना व शेतकऱ्यांना वर्षाकाठी विकुन त्यापासुन रू. ९,३४,५०० एवढे उत्पन्न मिळते. त्यांच्यावर होणारा खाद्य आणि व्यवस्थापनाचा खर्च साधारण ४,००,००० वजा जाता त्यांना रू. ५,३४,५०० एवढा नफा त्यांना मिळतो.

आज सोरटे यांचेकडे २५० सिरोही जातीच्या चांगल्या प्रतिच्या शेळया आधुनिक शास्त्रीय पध्दतीने बांधलेल्या गोठयात ठेवण्यात आल्या आहेत. त्यांची योग्य निगा राखून उत्पन्नात कशी वाढ करता येईल त्याची काळजी घेवून उत्पादन वाढत असल्याचे त्यांनी सांगीतले. उपरोक्त व्यवसायातून त्यांना रू. ७०,००० ते ७५,००० उत्पन्न मिळते. घरातील थोरामोठयांचं पाठबळ असल्यामुळे मजुरावरील खर्च कमी करता आला. त्यामुळे उपरोक्त व्यवसायात दिवसेंदिवस प्रगतीची वाटचाल होत आहे.

श्री. अजित जालिंदर सोरटे,
रा.मु. पो. करंजे
ता. बारामती जि. पुणे

मार्गदर्शक :
डॉ. अ. वि.खानविलकर व डॉ. सा. म. भोकरे,
पशुउत्पादन व व्यवस्थापन विभाग,
क्रां.ना.पा. पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ





मांसल कोंबडी पालन होत आहे शेतकऱ्यांचा मुख्य व्यवसाय

श्री. जहीर मणेर उच्चशिक्षित असुन ते शेतीव्यवसायात रमले. त्यांच्याकडे असलेली शेती कमी, त्यात वरूणदेवाची कृपादृष्टी नसल्यामुळे पूरक अशा व्यवसायाच्या शोधात असताना, कमी जागा, कमी पाणी, कच्च्या मालाची उपलब्धता, कमी शारीरिक कष्ट आणि कमी वेळेत आर्थिक बळ देणाऱ्या पोल्ट्री व्यवसायाकडे त्यांनी चित्त एकाग्र केले. तेव्हा क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथे कुक्कुटपालनशास्त्र विभागामार्फत मांसल कोंबडीपालन या विषयावर प्रशिक्षण मिळत असल्याचे त्यांना कळले. मे २०१६ दरम्यान उपरोक्त व्यावसायाचे प्रशिक्षणच पूर्ण करून २०१६ जून मध्ये रू. ३,८०,०००/- खर्च करून १२५ ग २६ फूट आकाराचे शेड उभे करून त्यांनी ३२५० पक्षांसाठी व्यवस्था केली. त्यासाठी लागणारी पिल्ले, खाद्य, औषधी, लसी इ. कंपनीकडून सहज उपलब्ध होत असल्यामुळे त्यांनी बारामती ॲग्रो प्रा. लि. या कंपनीबरोबर करार करून व्यवसायाला सुरूवात केली. खेळत्या भांडवलासाठी स्वत:चे पैसे गुंतून पडत नसल्याचेही त्यांनी नमूद केले. त्यामुळे कंपनी त्या मोबदल्यात ग्रोईंग चार्जेस देत असल्याचे सांगितले. श्री. मणेर यांनी केलेल्या करारानुसार दोन महिन्यांच्या अवधीत २४८० मांसल पक्षांच्या पहिल्या बॅचचे संगोपन डॉ. व्ही. डी. लोणकर यांच्या मार्गदर्शनाखाली केले. त्या वेळेत त्यांनी घेतलेल्या शास्त्रीय प्रशिक्षणानुसार काटेकोरपणे संगोपन केल्याचे सांगितले. पक्षांचे संगोपन करण्यासाठी शेडवरती एकूण रू ३,३७,०६६/- एवढा खर्च आला तो करारानुसार कंपनीकडून करण्यात आला. शेडचे काम स्वत: मणेर यांनी केले. रू ५९.६३ एवढा खर्च एक किलो पक्षी तयार करण्यासाठी आल्याचे त्यांनी सांगितले. प्रतिपक्षी ३.७८ किलो खाद्य ४० दिवसात लागले. तेव्हा सरासरी पक्षांचे वजन २.४४ किलो भरले. खाद्याचे मांसात रूपांतर करण्याचे प्रमाण १.६६ आले. तेव्हा श्री. मणेर यांना कंपनीकडून रू ४.७१ प्रति किलो प्रमाणे नफा मिळाला. अशाप्रकारे करार पध्दतीच्या व्यवसायामध्ये वर दर्शविल्याप्रमाणे २४८० पक्षांत २४,६००/- रू नफा ४० दिवसात मणेर यांना मिळाला. तेव्हा प्रति किलो खाद्यावरील खर्च कमी, मरतुक कमी, खाद्याचे मांसात रूपांतर करण्याचे प्रमाण चांगले असेल, तेवढयाच चांगल्या प्रमाणात शेतकऱ्यांना नफा मिळत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आणि हे यशस्वी करण्यासाठी शास्त्रीय पध्दतीचे मांसल कोंबडीपालन प्रशिक्षणाची साथ असणे अत्यंत आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

श्री. मणेर यांनी पक्षांची दुसरी बॅच संगोपन करावयास १४ ऑक्टोबर २०१६ ला सुरूवात केली. या व्यवसायामध्ये अशाच प्रकारे बिन दिक्कत नफा मिळत गेला. तेव्हा त्यांनी निश्चय केला की, व्यवसाय करू तर हाच ब्रॉयलर पक्षीपालन हा त्यांचा मुख्य व्यवसाय करण्याचा मनोदय जाहीर केला. सेंन्ट्रल बॅक ऑफ इंडिया येथे ५,००,०००/- रू. कर्ज मंजूरीसाठी अर्ज दाखल केला आहे. कारण त्यांनी ५००० पक्ष्यांसाठी शेड उभारायचे ठरविले. अशावेळी काळोखच दिवा होऊन मार्ग दाखवतो. झुंज मात्र शर्थीची हवी, सच्ची हवी. स्वप्न साकार होतातच, यात तिळमात्र शंका नाही.

श्री. जहीर अजीज मणेर
रा. गिरवी, ता.फलटण, जि. सातारा

मार्गदर्शक :डॉ. व्ही. डी. लोणकर,
सहाय्यक प्राध्यापक,
क्रां.ना.पा. पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ





महिला बचत गटाने केले दुग्धजन्य पदार्थांची उद्योजिका

सौ शैलजा घोरपडे यांचे पती पशुधन पर्यवेक्षक म्हणुन पुण्यातील बी.ए.आय.एफ. संस्थेमार्फत नोकरी करत होते. ते कामानिमित्त नेहमी दौऱ्यावर राहत असत. तेव्हा आपणही घर बसल्या काही तरी काम सुरू करावे असा विचार त्यांच्या मनात येत होता. तेव्हा त्यांनी महिला बचत गटात आपले नांव नोंदवून दर महिन्यात होणाऱ्या बचत गटाच्या बैठकीस जाऊ लागल्या. गटाच्या विविध उपक्रमात त्या भाग घेऊ लागल्या. अशाच एका बैठकीत त्यांनी स्वत: तयार केलेली बासुंदी सर्व महिलांना पिण्यासाठी दिल्यावर सर्वच महिलांनी त्यांचे भरभरून कौतुक केले. तेव्हा पासुन शैलजाताईंना दुग्धजन्य पदार्थ तयार करण्याचा व्यवसाय करण्यास प्रेरणा मिळाली.

सुरूवातीस त्यांनी तयार केलेले पदार्थ विक्री करण्यासाठी खुप प्रयत्न केलेत परंतु पाहिजे तेवढा प्रतिसाद त्यांना मिळाला नाही. तरी देखील हतबल न होता पदार्थ बनविणे सुरूच ठेवले. त्यांना अनेक वेळा तोटा ही सहन करावा लागला. परंतु उच्च प्रतीचे दुग्धजन्य पदार्थ बनविण्याचा नाद त्यांनी सोडला नाही. त्यामुळे हळु-हळु कां होईना मागणी वाढत गेली आणि व्यवसाय कायम स्वरूपी स्थिर झाला. आजपावेतो पारंपारिक ज्ञानावर आधारीत हा व्यवसाय सुरू होता. क्रांतीसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथे २०१३ साली दुग्धजन्य पदार्थ तयार करण्यासंबंधीचे प्रशिक्षण व्यवसायात वाढ करण्याच्या दृष्टीकोणातून घेतले. सदर प्रशिक्षणात व्यवसायासाठी अत्यंत महत्वाच्या बाबी त्यांनी समजुन घेतल्यात. त्यापुढे दुध व दुग्धजन्य पदार्थ तयार करावयाच्या प्रमाणित पध्दती, उद्योजकीय दृष्टिकोण इत्यादी बाबींची व्यवसायात भर वाढविण्यास मदत झाली, असेही त्यांनी प्रांजळपणे कबुल केले.

सध्या व्यवसाय सात्विक मिल्क प्रॉडक्टस या नावाने सुरू असुन दररोज ६०० लि. दुधापासुन खवा, पनीर, बासुंदी, दही, श्रीखंड, तुप ई. पदार्थ तयार केले जातात. एका गाळयामध्ये उपरोक्त पदार्थांची विक्रीची व्यवस्था त्यांनी केली. दुध संकलन केंद्राकडुन व २० ते २५ लि. शेतकऱ्यांकडुन आवश्यक तेवढेच दुध घेवून त्यांचे पदार्थ तयार केले जातात. त्यात दररोज ४० कि. पनीर, ३० कि. खवा, २० कि. बासुंदी व १० ते २० कि. श्रीखंड/आम्रखंड तयार केले जाते. मागणीनुसार तुप ही तयार केले जाते. स्वत:च्या जागेवर १०,००० चौ.फु. दुग्धप्रक्रिया प्रकल्पाची उभारणी करून व्यवसायाचा विस्तार त्यांनी केला आहे. महाराष्ट्र बॅंकेकडुन त्यासाठी त्यांनी ७ लाखाची सी.सी. घेतली आहे. पिशवी बंद दुध व इतर दुग्धजन्य पदार्थ निर्मिती मोठया प्रमाणात उपरोक्त पदार्थ तयार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगीतले.

कोणताही व्यवसाय असो बरेचदा कुशल कामगाराची उणीव भासत असते. परंतु सौ घोरपडे यांच्या कुटुंबातील बहुतेकांना या व्यवसायातील माहिती असल्यामुळे सर्व जणांनी कामे करून त्यावर मात केली. घरातील ३ आणि सध्या काम करीत असलेले ८ कामगार या व्यवसायात राबतात. रू. १० लाखापर्यंत दुग्धजन्य पदार्थांची मासिक विक्री वाढली असुन त्यांना निव्वळ १.५ लाखापर्यंत नफा झाला आहे.

शैलजाताईंनी आपल्या यशाचे श्रेय महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ बी. आर. कदम, डॉ विद्या निंबाळकर, डॉ दिपाली सकुंडे यांना दिले आहे. घरगुती स्तरावर छंद म्हणुन सुरू करून घरकाम करणारी स्त्री इतकी उत्तुंग झेप घेऊ शकते, अक्षरक्ष: थक्क करणारा हा प्रवास आहे.

मार्गदर्शक :

डॉ बी.आर. कदम, सहाय्यक प्राध्यापक,
क्रां.ना.पा. पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ

सौ शैलजा बाबासो घोरपडे,
मु. साखरवडी ता. फलटण जि. सातारा









रोमण लस्सी उद्योगाने दुग्धव्यवसायाचा केला विस्तार

रोमण कुटुंबाने दुग्धव्यवसायातुन शहरात रतीब सुरू केले. शिल्लक दुधापासुन पारंपारिक पध्दतीने प्रक्रियायुक्त पदार्थाचे उत्पादन सुरू झाले. मिळणाऱ्या अधिक नफ्यातुन यशस्वी उद्योगाचे गमक सापडले.

भोर जि. पुणे येथील रामचंद्र आणि शांताराम या चुलतभावांचं एकत्र कुटुंब. शेती करीत असतांना पुरक दुग्धव्यवसायही सुरू होताच. ५-६ मुऱ्हा जातीच्या म्हशींचा गोठा होता. भोर शहरात दुधाचे रतीब सुरू असतानांच कुटुंबातील पुढील पिढीतील प्रमोद आणि त्यांच्या भावाचं शिक्षण सुरू होते. शिल्लक दुधातुन घरातील महिला सदस्य पारंपारिक पध्दतीने उपपदार्थांचे उत्पादन घेत होत्या, त्यातुन व्यवसाय वाढत होता. परिसरातील बाजारपेठेतून दुग्धोत्पादनांना मिळणारी मागणी लक्षात घेवून प्रमोद रोमण यांनी व्यवसायाची जबाबदारी स्वत: उचलली. बारावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर श्री. प्रमोद रोमण यांनी १९९९-२००० च्या सुमारास भोरपासुन सुमारे १८ किलोमिटरवरील शिरवळ (जि. सातारा) येथे रोमण बंधु लस्सी हाऊस सुरू केले. थोडीशी आर्थिक गुंतवणुक करून गॅसवर चालणारे खवा यंत्र त्याच बरोबर श्रीखंड निर्मिती आणि मलई विलगीकरणासाठी यंत्रे खरेदी केली. उत्पादनांचा दर्जा उत्तम ठेवल्याने ग्राहकांची पसंती आणि मागणी वाढली. सन् २००८ पर्यंत व्यवसायातील बारकावे, कल लक्षात येऊ लागला होता. त्यात वृध्दी करत चक्का, श्रीखंड, बासुंदी, आम्रखंड यांचे उत्पादन व विक्री सुरू केली. २०१५ पर्यंत या पदार्थांचे कोणतेही ब्रँडींग न करता विक्री सुरू होती. दरम्यान २०१२ मध्ये प्रमोद यांनी शिरवळ येथील क्रांतीसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालयात दुध प्रक्रियेतील प्रशिक्षण घेतले. येथील प्रा. डॉ. बी.आर. कदम व प्रा. डॉ दिपाली सकुंडे यांनी दिलेल्या मार्गदर्शनातुन व्यवसायाची पुढील दिशा मिळाली. २३ मे २०१५ रोजी 'रोमण बंधु दुध प्रक्रिया उद्योग' नावांने लघुउद्योगाची मुहुर्तमेढ रोवली.

पहिल्या टप्प्यात दुध संकलन केल्या जाते. प्रक्रियेसाठी दररोज १००० लिटर दुधाची गरज असते. सुमारे ८०० लिटर दुध बाहेरून खरेदी करावे लागते. त्यासाठी परिसरातील शेतकऱ्यांकडुन दुधाचे संकलन होते. उर्वरित दुध स्वत:च्या गोठ्यातून घेतले जाते. दुधाला प्रतवारीनुसार (६.५ ते ७ फॅट) प्रतिलिटर ४५ रूपये दर दिला जातो. अधिकचा दर देत रोमण यांनी भोर परिसरातील तब्बल ३० ते ३५ शेतकरी कुटुंबाना हक्काचे मार्केट उपलब्ध करून दिले आहे.

दुसरा टप्पा म्हणजे यांत्रीक पध्दतीने उत्पादन निर्मीती होय. सुमारे ८० लाख खर्चुन भोर येथे अद्यावत प्रकल्पाची उभारणी केली आहे. त्यासाठी बॅंक ऑफ महाराष्ट्र शाखेतुन ४० लाख रूपयांचे अर्थसहाय्य घेतले.

तिसरा टप्पा म्हणजे विक्री व्यवस्थापन होय. ६ विक्री केंद्र आहेत. भोर येथे तीन, शिरवळ येथे दोन, आंबेगांव (पुणे) येथे एक. भोर परिसरातील विविध दुकाने, आठवडी बाजारांमध्येही पदार्थ ठेवले जातात. दररोजचे सर्वसाधारण उत्पादन व विक्री - बासुंदी २०० लिटर, रबडी ४० किलो, श्रीखंड, आम्रखंड, पनीर प्रत्येकी ७० ते ८० किलो, दही, लस्सी १०० लिटर, गरजेनुसार लोणी, तुपाची निर्मीती. विविध धार्मीक कार्यक्रम, सण, लग्न समारंभ, विशेष दिनासाठी मागणी वाढते, प्रमोद यांचे बंधु विक्री केंद्राची तर काका शांताराम रोमण यंत्रे खरेदी-विक्रीची जबाबदारी सांभाळतात आणि येणाऱ्या लघुउद्योजकांना मार्गदर्शनही करतात.

गेल्या १६ वर्षाच्या अनुभवसिध्द काळात रोमण कुटुंबाने एकीच्या बळावर उत्पादन ते विक्री या सर्व टप्प्यावरील व्यवस्था सक्षम करीत लस्सी आणि अन्य पदार्थाचा दमदार ब्रॅंड तयार केला आहे.

श्री. प्रमोद रोमण,
ता. भोर जि. पुणे

मार्गदर्शक :
डॉ बी.आर. कदम व डॉ दिपाली सकुंडे,
सहाय्यक प्राध्यापक,
क्रां.ना.पा. पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ





दुध संकलन केंद्रामुळे इतर पशुपालकांची झाली विपणनाची सोय

श्री हनुमंत अभंग यांचा पारंपारिक व्यवसाय म्हणजे शेती व सोबतच पशुपालन करतात. चार भावांचे एकत्र कुटुंब, त्यात १७ सदस्यांचा समावेश. त्यातील तिघे नोकरी करतात, शेतीसोबत पशुपालनाचा छंद लहानपणापासुन अभंग यांना असुन ते गायींचा कळप सांभाळतात. पदवीधर असुन देखील पारंपारिक पध्दतीने पशुपालन करीत असतांना त्यांना अडचणींना सामोरं जावं लागत असे, त्यात कष्ट जास्त. तेव्हा हतबल न होता त्यांनी गोविंद डेअरीचे दुध संकलन केंद्र सुरू केले. ७ गाई दुधावर, ६ कालवडी, २ वासरे, १५ जनावरे संकरीत, तसेच एक देशी गाय व खिल्लार बैल इतकं पशुधन त्यांच्याकडे आहे. या पशुधनाला पारंपारिक गोठा पध्दतीत सांभाळतांना मनुष्यबळाची गरज जास्त प्रमाणात पडायची. तेव्हा मुंबई पशुवैद्यक महाविद्यालयातील तज्ञ व गोविंद डेअरीमधील पशुवैद्यकांच्या मार्गदर्शनाखाली पारंपारिक गोठा परावर्तीत करून जनावरांना मुक्त गोठा पध्दतीत ठेवण्यास सुरूवात केली. त्यापुढे जनावरांच्या संगोपनात मदत तर झालीच, त्याचा फायदा म्हणजे दुध उत्पादनात देखील वाढ झाली. ८० लिटर दुध उत्पादन दिवसाला होते, दुध काढतेवेळी व वातावरण खराब असेल तरच जनावरांना गोठयात ठेवण्यात येत. वेळेची भरपूर बचत होते. मुक्त गोठयात ठेवल्याने जनावरांची तब्येत बरी राहते. त्यामुळे त्यांच्यावर जो आरोग्यासाठी होणारा खर्च असतो त्याची बचत होते, असे अनुभवाअंती अभंग यांनी सांगीतले. यातूनच नफा जास्त मिळविता येतो, असेही ते म्हणाले.

गोठयात त्यांनी देशी कोंबडया ठेवल्यामुळे गोचिड निर्मुलनाचं काम त्या करतात. शेण भुसभुसीत करून कंपोस्ट होण्यात मदत होते त्यामुळे खताची प्रत वाढते. हनुमंत यांचे कुटुंब उच्च शिक्षित असुन देखील त्यांना पशुपालनाचा सार्थ अभिमान आहे. त्यांच्या दुध संकलनामुळे इतर पशुपालकांना विपणनाची सोय मिळाली आहे. मुक्त गोठयात जमिनीवर पक्का मुरूम टाकून त्यावर गव्हाण म्हणुन सिमेंटचे पाईप वापरले आहेत. चारा व्यवस्थापनात डी.एच.एन-६ एक एकर मध्ये लावले असुन खुराक बाहेरून विकत घ्यावी लागते. दुधाच्या विक्रीतुन व संकलन केंद्रातुन सर्व खर्च वजा होता वर्षाकाठी ४ लाख रूपये नफा होतो. इतर शेतकऱ्यांनी देखील नवीन पध्दतीने व्यवसाय केल्यास त्यांना फायदाच होईल. त्यासाठी ते इतरांना सुध्दा प्रवृत्त करतात आणि सर्वांच्या विकासात ते सहकार्य करतात.

श्री हनुमंत संतराम अभंग
गांव : वडणी, ता. फलटण जि. सातारा

मार्गदर्शक :
डॉ. सारीपुत लांडगे
सहाय्यक प्राध्यापक व तांत्रीक अधिकारी,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संकलन : डॉ. पवन पावडे





दुग्धव्यवसाय झाला मिळकतीचा शाश्वत स्त्रोत

सहसा कोणीही व्यवसायाकडे वळत नाही, कारण एकतर त्या विषयाची माहिती असावी लागते. सोबत पुंजी. परंतु या दोन्ही तरतुदी असतांना व्यवसायात देखील हताश व्हावे लागते, तेव्हा असे वाटते की, नोकरी भली किंवा रोजंदारी यात तो समाधानी आणि त्याची ती पसंती असते. विनाकारण मन:स्ताप नको, असे वाटायला लागते.

परंतु श्री. बाळासो नाळे यांच्या बाबतीत त्यांचा दुग्धउत्पादन व पशुपालन व्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टिकोण हा सकारात्मक आहे. त्यांच्या कडे शेती फक्त ३ एकर आणि परिवारात ९ लोकांचा समावेश आणि उपरोक्त व्यवसाय ते कसुन करायचे परंतू प्रगती खुंटल्या सारखीच होती. उपत्न्न देखील नगण्य होते. त्यांच्या चिकाटी व कार्यतत्परतेने काही तरी नवीन करायचे या उद्देशाने त्यांनी दुग्ध उत्पादकांना भेटी देणे सुरू केले. परराज्यात गोविंद डेअरीच्या माध्यमातून भेटी दिल्या. परंतु गुजरात मधील दुग्धव्यवसाय करण्याच्या पध्दतीने प्रभावित होवून नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून मुक्त गोठा पध्दतीचा वापर करण्याचे त्यांनी ठाम मत केले. मुंबई पशुवैद्यक महाविद्यालयातील तज्ञ व गोविंद डेअरीतील पशुवैद्यकांच्या मार्गदर्शनाखाली गोठयातील जनावरांच्या मुक्त पध्दतीने संगोपन करण्याची सुरूवात केली. जनावरे गोठयात बंदिस्त असल्यामुळे ती त्रास देत होती. परंतु नंतर सवय झाल्यामुळे गोठयाशी समरस झाली. दुध काढणी यंत्राच्या सहाय्याने दुध काढले जाते. अझोला, मुरघास यांचा उपयोग करून उत्पादनात बचत केली आहे. चारा निर्मितीसाठी त्यांनी हायड्रोपोनिकचे संयत्र सुध्दा घेतले आहे. त्यांच्याकडे सध्या सर्व संकरीत होलस्टीन फ्रिजियन प्रकारची २५ जनावरे आहेत. पैकी १४ गायी दुधावर, ७ कालवडी, ३ वासरे आणि १ खिल्लारी बैल आहे. त्यांच्या पासुन दिवसाला १०० लि. दुध उत्पादन होते त्याचे वितरण दुध डेअरीला केले जाते. स्निग्धांशावर दुधाचे दर आधारीत असतात. सर्व खर्च वजा जाता, वर्षाकाठी ४ लक्ष रूपये नफा दुग्धव्यवसायातुन होतो. मुक्त गोठयामुळे सकाळी दोन तास व संध्याकाळी दोन तास एवढाच वेळ द्यावा लागतो. त्यामुळे नाळे हे समाधान वृत्तीमुळे वाटचाल करताहेत.

श्री. बाळासो रामचंद्र नाळे
मु. विडणी, ता. फलटण, जि. सातारा

मार्गदर्शक :
डॉ. सारीपुत लांडगे
सहाय्यक प्राध्यापक व तांत्रीक अधिकारी,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संकलन : डॉ. पवन पावडे





पशुधन आधारीत अर्थव्यवस्था : एक फायद्याचा स्त्रोत

ग्रामीण भारतात शेती व रोजगार देणारा मुख्य घटक म्हणजे पशुधनावर आधारीत अर्थव्यवस्था होय. घरच्या पोषणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी दुध देणारे पशु पाळले जायचे आणि त्यापासुन दुध, दही, लोणी, तुप हे दुग्धजन्य पदार्थ घरीच वापरल्या जायचे. परंतु दिवसेंदिवस व्यवसायाने बदलत्या जीवनमानासोबत दुध व दुग्धजन्य पदार्थांनी व्यवसायसचे रूप घेतले. श्री गणपत धुमाळ हे २० वर्षापासुन पारंपारिक पध्दतीने दुग्धव्यवसाय करीत होते. परंतू त्यावेळी ते पशुव्यवस्थापनामध्ये पूर्ण वेळ व्यस्त रहायचे.

पाच वर्षाआधी मुक्त गोठा पध्दतीची माहिती मुंबई पशुवैद्यक महाविद्यालयाच्या तज्ञांद्वारे राबविल्या गेलेल्या मुक्त संचार गोठा पध्दतीचा प्रचार व प्रसार मोहिमेतुन धुमाळ यांना मिळाली. वापरीत गेलेल्या तेव्हा त्यांनी गोठयाची पुनर्बांधणी उपरोक्त महाविद्यालयाचे तज्ञ आणि गोविंद डेअरीच्या पशुवैद्यकांच्या मार्गदर्शनाखाली केली. त्यात जनावरांना ठेवण्यास सुरूवात केली. सध्या २० दुधाळ गायी, १५ कालवडी, १० वासरे आणि १ वळु सर्व संकरीत होलस्टीन फ्रिजियन जातीचे त्यांच्याकडे आहेत. त्यांच्यापासुन १५० लि. दुध दरदिवशी मिळते. या दुधविक्रीतुन ७,००,००० रूपये उत्पन्न होते. कालवडींच्या विक्रीतुन व शेण खतापासुन एक ते दिड लाखापर्यंत वर्षाकाठी उत्पन्न मिळते. दुधविक्रीसाठी कुठेही येर-झाऱ्या माराव्या लागत नसुन गोठया मधुनच खाजगी डेअरीला विकल्या जाते. जमिनीचा काही भाग हिरव्या चाऱ्यासाठी राखुन ठेवला त्यात मका व कडवळ ज्वारी यांचे देखील पीक धुमाळ घेतात. कडबाकुट्टी यंत्र, दुध काढणी यंत्र त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. फक्त जनावरांसाठी खुराक तेवढी बाहेरून विकत घ्यावी लागते.

कोंबडया गोठयात ठेवल्यामुळे गोचिड नियंत्रण, खत निर्मिती चांगली होते. मुक्त गोठा पध्दतीचे फायदे म्हणजे जनावरांचे आरोग्य चांगले राहते, जखमा कमी होतात, वेत हे सुरळीत होतात, माज ओळखणे सोपे होते, उत्पादन वाढते, काम कमी करावे लागते, रोज शेण उचलण्याची गरज नाही. बांधकाम चांगल्या प्रतीचे केल्यामूळे खर्च थोडा जास्त आला, परंतु सुरक्षेची हमी त्यांना मिळाली. पाण्यासाठी मोठे टाके बांधले त्यात २४ तास पाणी राहते. या उपक्रमातून जे समाधान मिळाले त्यात धुमाळ आनंदी आहेत, हे नक्की.

श्री गणपत धुमाळ
अदरकी बुदुक ता. फलटण जि. सातारा

मार्गदर्शक :
डॉ. सारीपुत लांडगे
सहाय्यक प्राध्यापक व तांत्रीक अधिकारी,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संकलन : डॉ. पवन पावडे





मुक्त गोठा अवलंबनामुळे वाढला दुग्धव्यवसाय

पशुपालन करीत असलेल्या पध्दतीत बदल करण्याची गरज आहे. कारण दिवसेंदिवस परिस्थिती बदलत आहे. नाही तर दुग्धव्यवसाय करणे कठीण जाईल असे ठाम मत श्री संदीप नाळे यांनी व्यक्त केले. गांव सोडुन शहरात नोकरी करणे परवडत नाही आणि त्यांना पसंतही नाही. तेव्हा गावातीलंच पशुपालकांना भेटी देवून दुग्धव्यवसाय कशा पध्दतीने करताहेत हे जाणुन घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

त्यांनी दुग्धव्यवसाय करण्याकरीता वेळेचे आणि त्यात कामाचे सुध्दा नियोजन योग्यरितीने केले नाही तर व्यवसाय करणे शक्य होणार नाही, हे त्यांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी मुक्तगोठा पध्दतीचा वापर करण्याचा मनसुबा केला. त्याकरीता मुंबई पशुवैद्यक महाविद्यालयातील तज्ञ व गोविंद डेअरीतील पशुवैद्यकांचे तांत्रिक मार्गदर्शन घेवून गोठ्यातील बांधकामात परिवर्तन करून जनावरे त्यात ठेवण्यास सुरूवात केली. त्यासाठी त्यांनी एक लाख रूपये खर्च करून गोठा बांधला. त्यामुळे त्यांना सकारात्मक बदल झाल्याचे लक्षात आले. सध्या ७ दुधाळ गायी, ५ भाकड गायी, १० कालवडी अशा एकुण २२ गायी संकरीत असुन दिवसाकाठी १०० लिटर दुध उत्पादन होते.

त्यांच्या परिवारात ५ लोकांचा समावेश असुन त्यांनी कामावर एकही मजुर न ठेवता ते पत्नीच्या पाठिंब्यावर संपुर्ण व्यवस्थापन सांभाळतात. जुना गोठा हा दुध काढण्यासाठी वापरला जातो व मशीनच्या सहाय्याने दुध काढल्या जाते. मुक्त गोठ्यात पाण्याची सोय २४ तास आहे. चारा गव्हाणीतच टाकला जातो. उन्हाचा त्रास होवू नये म्हणुन शेड नेट बांधले आहे. ५० गिरीराज जातीच्या कोंबडया ठेवल्या आहेत. त्या शेण भुसभुसीत करण्याचं आणि गोचिड वर नियंत्रणाचं काम करतात.

सर्व खर्च वजा केला असता वर्षाकाठी ४,७०,०००/- रू. निव्वळ नफा उपरोक्त व्यवसायातून मिळतो. त्यामुळे ते आत्मसमाधानी आहेत. मुक्त गोठा पध्दतीमध्ये वेळेची, कामाची, पैशांची बरीच बचत होत असल्याचे त्यांनी स्वानुभवातुन कथन केले आहे.

श्री संदीप बापुराव नाळे
गांव : विडणी ता. फलटण जि. सातारा

मार्गदर्शक :
डॉ. सारीपुत लांडगे
सहाय्यक प्राध्यापक व तांत्रीक अधिकारी,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संकलन : डॉ. पवन पावडे





पौष्टिक पशुपोषण आहार उत्पादनाकरीता अझोला व हायड्रोपोनिक पध्दतीने चारा निर्मीती

श्री संग्रामप्पा सुगवडे यांनी पारंपारिक दुधव्यवसायाला नवचेतना दिली ती मुक्त गोठयाच्या माध्यमातून. दोन वर्षा आधी त्यांनी मुंबई पशुवैद्यक महाविद्यालयाचे तज्ञ आणि गोविंद डेअरीच्या पशुवैद्यकांच्या तज्ञांच्या देखरेखीत मुक्त गोठा पध्दतीचा अवलंब केला. सध्या त्यांच्याकडे १३ दुधाळ गायी, ४ भाकड गाई, ७ कालवडी अशी एकुण २४ संकरीत जनावरे आहेत. १५० X ५० चौ.फुटांचा मुक्त गोठा तयार करण्यासाठी सिमेंटचे खांब व जाळीच्या मदतीने गोठा तयार केला आहे. त्याची उंची ६ फुट आहे. त्यावर पत्रे टाकुन केलेला गोठा हा ५०ग८ चौ.फुट एवढा आहे. उन्हाची तीव्रता कमी करण्यासाठी मोकळया जागेत झाडे आहेत. त्यामुळे जनावरांना सावलीचा भरपूर फायदा होतो. गोठयात पाण्याची व चाऱ्याची व्यवस्था केली आहे.

सुगवडे हे चारानिर्मिती साठी अझोला व हायड्रोपोनिक संयत्राचा वापर पशुपोषण आहारात करतात. दुध काढणी यंत्राचा वापर केल्यामुळे वेळेची बचत होते. तसेच मुक्त गोठा दररोज स्वच्छ करण्याची गरज भासत नाही. रोजंदाराची गरज नसल्यामुळे पैशाची बचत होते. मुक्त गोठयामूळे जनावरांची उत्पादन क्षमता चांगली राहते, आरोग्य देखील चांगले राहते, पाणी भरपूर दिल्यामुळे फायदा होतो, माज ओळखणे सोपे होते. जनावरांना आरामशीर वातावरण असल्यामुळे कसल्याही प्रकारचा तणाव नसतो. पैशांची बचत जनावरांच्या न होणाऱ्या आजारामुळे होते. कारण त्यांची देखरेख अशा उपरोक्त पध्दतीने केली असल्यामुळे उपचाराची गरजच भासत नसल्याचे व मुक्त गोठयाच्या फायद्यामुळे खुप मोठी बचत होत असल्याचं समाधान त्यांना मिळते आहे.

त्यांच्याकडे ५ एकर ओलीताची जमीन आहे. त्यातल्या काही जमीनीत ते मका व इतर चारापिके घेतात. १४० लि. दुध दिवसाला मिळते. ते दुध खाजगी डेअरीला वितरीत केल्या जाते. वार्षिक दुध विक्रीतून ६ लाखांचे उत्पादन सुगवडे यांना मिळत आहे. उपरोक्त व्यवसायात संधी शोधुन त्यांनी रोजगार सुरू केला आहे. तरूणांनी त्यांचा आदर्श उरी बाळगून तशी कार्यतत्परता दाखवावी. अनुकरण करण्यास त्यांची प्रेरणा कामात येईल यात शंका नाही.

श्री संग्रामप्पा सुगवडे
मु. गुणवरे, ता. फलटण, जि. सातारा

मार्गदर्शक :
डॉ. सारीपुत लांडगे
सहाय्यक प्राध्यापक व तांत्रीक अधिकारी,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संकलन : डॉ. पवन पावडे






मुक्त गोठा पध्दती करते बचत श्रमाची

श्री. संजय सोनवलकर यांनी मुंबई पशुवैद्यक महाविद्यालयाचे तज्ञ आणि गोविंद डेअरीच्या पशुवैद्यकांशी दुग्धव्यवसायात मुक्त गोठा पध्दतीचा अवलंब कसा करायचा या संदर्भात दोन वर्षाआधी सल्लामसलत केली. उपरोक्त पध्दत वापरणाऱ्या पशुपालकांच्या प्रक्षेत्रांना भेट देवून त्या पध्दतीनुसार २०,०००/- रूपये खर्च करून दहा गायींसाठी मुक्त गोठा तयार केला. त्यांच्यानुसार पारंपारिक पध्दतीपेक्षा ही पध्दत चांगली आहे कारण त्यासाठी बांधकामाचा खर्च कमी लागतो. व्यवस्थापन अतिशय सोपे होते, जनावरे शारीरिक दृष्टया सुदृढ राहतात. यामूळे व्यवसायात अर्थकारणाचा तोल सांभाळल्या जातो. त्यामुळे व्यवसाय फायदेशीर ठरतो.

सध्या त्यांच्याजवळ ८ दुधाळ गायी, ३ भाकड गायी, ४ कालवडी या सर्व संकरीत गायी व २ खिल्लारी जातीचे बैल आहेत. ही सर्व जनावरे मुक्त गोठयात राहतात. सोबत गावराणी कोंबडया सुध्दा त्यात ठेवल्या आहेत त्यामुळे गोचिड नियंत्रण व शेण सुकण्यास मदत होते. त्यामुळे खत चांगल्या प्रतिचे तयार होते. गोठयातील अझोला उत्पादनामूळे दुधातील स्निग्धांश वाढविण्यास मदत होते व एस.एन.एफ सुध्दा वाढतो. त्यांचेकडे कमी खर्चात बनविलेले हायड्रोपोनिक यंत्रसुध्दा आहे.

मुक्त गोठयामुळे श्रम कमी करावे लागतात. त्यामुळे रोजंदार ठेवण्याची गरज भासत नाही. जनावरे गोठयामध्येच असतात, दुध काढतेवेळी आणि वातावरणात ऊन, थंड, पाऊस, प्रखरता जाणवत असेल तेव्हा जनावरे गोठयात बांधली जातात. दुध काढणी ही यंत्राच्या सहाय्याने केली जाते. त्यामुळे दुधाचे उत्पादन स्वच्छ तऱ्हेने होते, वेळेची व मेहनतीची बचत होते. ११० लि. दुध उत्पादन दररोज होते. ते खाजगी डेअरीला विकल्या जाते. त्यामुळे दुधविक्रीतुन ४,६०,०००/- रू नफा दरवर्षी मिळतो. खताच्या विक्रीतुन १,५०,०००/- रू. मिळतात, शेतीचे वेगळेच उत्पन्न. त्यांच्या या कार्यशैलीमुळे लोक त्यांना आदर्श शेतकरी म्हणून मान देतात. त्याच्या या अभ्यासूवृत्ती, जिद्द, चिकाटीच्या भरवशावर प्रगत शेतकरी म्हणुन त्यांनी स्वत:ला सिध्द केले आहे.

श्री संजय लाला सोनवलकर
गाव : राजुरी, ता. फलटण जि. सातारा

मार्गदर्शक :
डॉ. सारीपुत लांडगे
सहाय्यक प्राध्यापक व तांत्रीक अधिकारी,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संकलन : डॉ. पवन पावडे



तज्ञांच्या मार्गदर्शनामुळे दुग्धव्यवसाय झाला रोजगाराचा उत्तम पर्याय

श्री हिरालाल सस्ते यांनी युवा प्रगतीशील पशुपालक म्हणुन स्वत:ची एक ओळख तयार केली आहे. पारंपारिक शेती व पशुपालनाचा व्यवसाय त्यांनी सुरू केला तेव्हा फारसा प्रतिसाद त्यांना मिळाला नाही. परंतु गोविंद डेअरी ला भेट देवून तेथील तज्ञांशी सल्ला मसल्लत करून माहिती मिळविली. सोबतच त्यांना मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय आणि उपरोक्त डेअरीच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या मुक्त संचार गोठा पध्दती बद्दल तांत्रिक माहिती व गोठा तयार करण्यासंबंधी मार्गदर्शन लाभले. ज्या ठिकाणी झाडे होती त्याच्या सावलीचा उपयोग करून घेत त्यांनी मुक्त गोठा तयार केला. जाळीचे व लोखंडी पाईपांचे ६० X १२० फुट आकाराचे मुक्तांगण तयार करून त्यात जनावरांची सोय केली. जमिनीवर मुरूम टाकुन एक खांब उभा करून त्याला दोरखंड बांधला. त्यामुळे गायींना अंग घासण्याची सोय झाली. पाण्यासाठी व चाऱ्यासाठी सिमेंटचे टाके व गव्हाण तयार केले. गोठयात गावरान कोंबडया सुध्दा सोडल्या.

अझोला, हायड्रोपोनिक, मुरघास या तंत्रज्ञानाचा वापर करून कमी पैशामध्ये चारा उत्पादन केले आहे. व्यवस्थापनामध्ये उपलब्ध असलेल्या जमिनीचा वापर करून त्यात पिकांची लागवड केली. पारंपारिक पध्दतीमध्ये वेळ व श्रम जास्त लागायचे. परंतु मुक्त गोठयाचा वापर केल्यामुळे वेळ, श्रम व मजुरांची बचत झाली व गरज भासत नाही. २४ तास पाण्याची व्यवस्था आणि उत्तम चाऱ्याच्या व्यवस्थापनामुळे जनावरे तंदुरूस्त राहतात. त्यामुळे स्तनदाह आजार कमी होतात. मुक्त गोठयामुळे जनावरांना स्वच्छंद विहार करता येतो.

सस्ते यांच्याकडे सध्या १० दुधाळ गायी, २ भाकड गायी, ५ कालवडी व एक वासरू आहे. दुध काढते वेळी पोषण आहार दिला जातो. त्यात ३ कि.ग्रॅ. इतका खुराक व अर्धा कि.ग्रॅ. अझोला दिला जातो, असेही सस्ते यांनी सांगीतले.

उपरोक्त जनावरांपासुन दररोज १३० लि. दुध उत्पादन होते. त्यामुळे महिन्याकाठी ५०,०००/- रू इतका निव्वळ नफा मिळतो. शेणखत स्वत:च्या शेतात वापरले जाते, त्यामुळे शेतीची मशागत न करता उत्पन्न वाढले आहे. या सर्व उपक्रमातुन त्यांनी आपली आर्थिक बाजु भक्कम तऱ्हेने उभी केली आहे. मुक्त गोठयामुळे त्यांची वाटचाल समृध्दीकडे जात आहे.

श्री हिरालाल हनुमंत सस्ते
गाव : निंबळक, ता. फलटण जि. सातारा

मार्गदर्शक :
डॉ. सारीपुत लांडगे
सहाय्यक प्राध्यापक व तांत्रीक अधिकारी,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संकलन : डॉ. पवन पावडे




मुक्त गोठा पध्दत अवलंबनामुळे आर्थिक अडचणींवर केली मात

झाडांच्या सालीचा आणि उपलब्ध साहित्यातुन कमीत कमी खर्चात तयार मुक्त गोठा श्री दत्तु सोडमिशे यांच्याकडे पाहायला मिळतो. दुग्धव्यवसाय गेल्या १५ वर्षापासुन करीत होते, पाहिजे तेवढी मिळकत नसल्यामुळे कंटाळून गेले होते. परंतु कुटुंबाची जबाबदारी असल्यामुळे पुर्ववत व्यवसाय त्यांनी सुरू केला. १० एकर ओलीताची शेती असुन पारंपारिक पध्दतीने ते व्यवसाय करीत होते. मुंबई पशुवैद्यक महाविद्यालयाने गोविंद डेअरीच्या सहकार्याने राबविलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत त्यांना मुक्त गोठ्याबद्दलची माहिती मिळाली. उपरोक्त डेअरीचे दुधसंकलन केंद्र गावातच असल्यामुळे डेअरी कडुन मदत व मार्गदर्शन त्यांना मिळू लागले. त्यांनी बाहेर बांधलेली जनावरे मुक्त गोठ्यात ठेवण्यास सुरूवात केली. सुरूवातीस बऱ्याच गोष्टींचा अनुभव नसल्यामुळे कुचंबना व्हायची, परंतु त्यांनी अनुभवी शेतकऱ्यांच्या मुक्त गोठ्यांना भेटी देवून त्यातील फायदे, बारकावे समजुन घेतलेत आणि तशी सुरूवात केली.

त्यांच्याकडे १० दुधाळ गायी, २ भाकड गायी आणि १० कालवडी व म्हशी सुध्दा आहेत. त्यात एक दुधावर व पहिल्यांदाव गाभण असलेल्या दोन म्हशी आहेत. फार कमी वेळ म्हशींना गोठ्यात ठेवण्यात येते. कारण त्यांच्यात भांडण झाल्यास जनावरांना इजा होवू नये, हा त्या मागील मुख्य हेतू. दिवसाकाठी १२८ लि. दुध उत्पादन होते ते सर्व दुध डेअरी ला विकतात, त्या विक्रीतून ४ लक्ष २० हजार इतका नफा त्यांना वर्षाकाठी होतो. उपरोक्त जनावरांपासुन जे शेण गोळा होते ते खताच्या स्वरूपात शेतात वापरल्या जाते. त्यामुळे बाहेरून खत विकत घेण्याची गरज पडत नसल्यामुळे पैशांची बचत होते.

दुध काढण्यासाठी यंत्राचा ते वापर करतात. कुट्टी यंत्रामुळे चारा बारीक केल्या जातो. पाण्याची व्यवस्था गोठ्यातच करण्यात आली. २४ तास जनावरे मुक्त वातावरणात असल्यामुळे आजारांचे प्रमाण नगण्य आहे. मुक्त गोठा पध्दतीमुळे दुधव्यवसाय परवडण्यासारखा आहे, तो पारंपारिक पध्दतीचा नको, असे सोडमिशे यांचे ठाम मत आहे. मुक्त गोठा पध्दतीमुळे उत्पन्नात जी भर होत आहे, त्यामुळे मी आत्मसमाधानी आहे, असेही सोडमिशे म्हणतात.

श्री दत्तु साधु सोडमिशे
गाव : सोमंथळी, ता. फलटण जि. सातारा

मार्गदर्शक :
डॉ. सारीपुत लांडगे
सहाय्यक प्राध्यापक व तांत्रीक अधिकारी,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संकलन : डॉ. पवन पावडे









छोटया गावांत दुग्धोत्पादनाने साधली उद्योगक्रांती

ग्रामीण भागातील उद्योग म्हणजे दुग्धोत्पादन. हे श्री विठ्ठल नारायण सोडमिशे राबविलेल्या उपक्रमातून सिध्द केले आहे. विठ्ठलरावांकडे शेतजमीन ८ एकर आहे, त्यावर ते चारापिकांची लागवड करतात.

त्यांच्याकडे होलस्टीन फ्रिजियन या जास्त दुध देणाऱ्या गायी आहेत. त्यात ६२ गायी या दुध देणाऱ्या, ३० भाकड गायी, ३२ कालवडी व १६ वासरे आहेत. एवढया मोठया जनावरांचे पारंपारिक पध्दतीने व्यवस्थापन करणे तसे अवघडच काम होते. त्यातुन सुकर मार्ग काढण्याकरीता मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय आणि गोविंद डेअरीच्या तज्ञांकडुन उपयुक्त मार्गदर्शन घेत उपरोक्त व्यवसायाला मुक्त गोठा पध्दतीत परिवर्तीत केले. श्री सोडमिशे यांच्याकडे सुरूवातीला १० कामगार काम करीत असंत. सध्या त्यांच्याकडे सहा कामगार काम करतात. परंतु मुक्त गोठा पध्दतीचा वापर केल्यामुळे उर्वरित कामगारांचा ८ एकर असलेल्या शेतीमध्ये चारा पिके घेण्याकरीता उपयोग केला जातो.

सर्व जनावरांची व्यवस्था मुक्त गोठयात करण्यात आली. परंतु वासरे वेगळी ठेवल्या गेली आहेत. कडबा कुट्टी यंत्राचा वापर केला जातो, दुध यंत्राद्वारे काढल्या जाते. आठवडयाला शेणखताचा निचरा करण्याकरीता ट्रॅक्टरच्या सहाय्याने उचलून रोटावेटर फिरवून विकल्या जातो. त्यातुन महिन्याकाठी ३० हजार मिळतात. कारण त्यावर ई.एम. सोल्युशन या द्रवाचा फवारा मारून चांगल्या प्रतिचे खत तयार केले जाते. त्यामुळे या खताची मागणी जास्त आहे. सोडमिशे यांनी २० वर्षाआधी ४ गायींपासुन सुरू केलेला व्यवसाय आज नावरूपास आला आहे. त्यांनी दुध संकलन केंद्र सुरू केले.

सध्या त्यांच्या दुधाची विक्री 'नेस्ले' या खाजगी कंपनीस व सोबत गोविंद डेअरीला सुध्दा करतात. 'नेस्ले' ही कंपनी जास्त दराने दुध विकत घेते व त्यासाठी ठरविलेली मानके सोडमिशेंना तंतोतंत पाळवी लागतात. प्रतिजैविक विरहीत दुध हा त्यांचा विशेष मानक आहे. त्यामुळे त्यांना दुध सांभाळुन विकावे लागते, त्याची किंमतही जास्त मिळते. फक्त शेणाच्या विक्रीतून व्यवस्थापनाचा संपूर्ण खर्च निघतो. वार्षिक दुध विक्रितून २० लक्ष रूपये नफा त्यांना मिळतो. लहान गावात सुध्दा त्यांनी मोठा उद्योग उभा केला आहे. मुक्त गोठा पध्दतीचा अवलंब केल्यामुळे आज माझे कुटुंब सुखी व समाधानी आहे, असे गौरवोद्‌गार ते काढतात.

श्री विठ्ठल नारायण सोडमिशे
रा. सोमंथळी ता. फलटण जि. सातारा

मार्गदर्शक :
डॉ. सारीपुत लांडगे
सहाय्यक प्राध्यापक व तांत्रीक अधिकारी,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संकलन : डॉ. पवन पावडे






मुक्त गोठयाच्या अवलंबनामुळे पशुपालकांनी मिळविले आर्थिक बळ

श्री. मंगेश नाळे यांचे गांव कमी पाण्याच्या पट्ट्यातील असुन त्या ठिकाणी सिंचन सुध्दा नाही. त्यामुळे शेती ही जेमतेम होणारी. अशा परिस्थितीत पशुपालनाचा व्यवसाय करून विकासाकडे वाटचाल करणारे शेतकरी म्हणजे श्री.मंगेश नाळे.

त्यांच्याकडे ८ दुधाळ गायी, ५ वासरे असा एकुण १३ जनावरांचा कळप आहे. ते खुप वर्षापासुन पारंपारिक पध्दतीने व्यवसाय करीत होते. परंतु मनासारखी मिळकत त्यांना मिळत नसल्यामुळे ते फार त्रस्त होते.

तेव्हा त्यांनी गोविंद डेअरी ला भेट दिली व मुंबई पशुवैद्यक महाविद्यालय आणि गोविंद डेअरीच्या संयुक्तरित्या राबविल्या गेलेल्या मुक्त गोठयाची संकल्पना समजुन घेवून मुक्त गोठयाचा वापर करून त्यात जनावरे ठेवण्यास सुरूवात केली. ते कडबा कुट्टीचा वापर केलेला चारा जनावरांना देतात. सोबत खुराक देखील विकत आणली जाते, पशुखाद्य चांगल्या कंपन्यांकडुन खरेदी केल्या जातो. वाळलेला चारा शेतातूनच वापरला जातो. उपरोक्त जनावरांपासून दरदिवशी ७० लि. दुध उत्पादन होते. दरवर्षी विकत असलेल्या कालवडीतूनही उत्पन्न मिळते. जनावरांना मुक्त गोठयात ठेवल्यामुळे त्यांचे आरोग्य उत्तम राहते, त्यामुळे औषधोपचाराचा खर्च देखील नसतो. त्यामुळे वेळेची व श्रमाची बचत होते. दुध काढता वेळी गायींना बांधल्या जाते नंतर दुध काढल्यानंतर मोकळं करावे लागते. वासरांची वेगळी व्यवस्था करण्यात आली आहे. गोठयात झाडे आहेत. उतार व्यवस्थित असल्यामुळे पावसाळयात चिखल होत नाही. शेण एक महिन्यानंतर उचलले जाते. मुक्त गोठयाचा वापर केल्यामुळे दुधेबाबी गावांत त्यांचा आदर्श समोर ठेवून इतरही शेतकऱ्यांनी जनावरांना मुक्त गोठयात ठेवून फायदा घेतला आहे. श्री नाळे यांना फक्त दुधाच्या विक्रीतून २,००,०००/- रूपये नफा मिळतो. त्यांच्याकडे चांगल्या प्रतिचे खत सुध्दा उपलब्ध असते. इतरांनीही उपरोक्त पध्दतीचा वापर करावा असेही नाळे म्हणतात.

श्री मंगेश नारायण नाळे
रा. दुधेबाबी, ता. फलटण, जि. सातारा

मार्गदर्शक :
डॉ. सारीपुत लांडगे
सहाय्यक प्राध्यापक व तांत्रीक अधिकारी,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संकलन : डॉ. पवन पावडे







परितक्त्या महिलेने शेळीपालन व्यवसायातून साधला उपजिवेकेचा मार्ग

श्रीमती सुचिताबाई धनबहादुर यांना कुणाचाही आधार नाही, रोज त्याचं तळ हातावर पोट, आज कमवा, आज संपवा. स्वत: कष्ट केल्याशिवाय पर्याय नाही. परिस्थिती सुध्दा हलाखीची, सुचिताबाई परितक्त्या, त्यात वडीलांची जबाबदारी. तेव्हा डॉ. एस. व्ही. कुरळकर, प्रकल्प प्रमुख, पशुअनुवांशिकी व प्रजनन विभाग, स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला टाकळी यांनी ग्रामस्थांना शेळीपालन कसे करावे, या संबधीची माहिती देण्यासाठी टाकळी गावात आले असता, शेळीपालनाविषयी होतकरू सुचिताबाईंनी त्यांना माहिती विचारली. उपरोक्त व्यवसाय करण्याची उत्सुकता व मेहनत करण्याची त्यांची तयारी पाहुन डॉ कुरळकर यांनी "बेरारी जातीच्या शेळयांचे संगोपन तंत्रज्ञानाचे ग्रामस्थांना प्रात्यक्षिक व प्रशिक्षणाद्वारे प्रसारण" या जैवतंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली तर्फे पुरस्कृत प्रकल्पाअंतर्गत लाभार्थी म्हणून सुचिताबाईची निवड करून त्यांना उपरोक्त व्यवसायाचे पाच दिवसाचे प्रशिक्षण दिल्यानंतर दोन बेरारी शेळया व एक बोकड असे युनिट देण्यात आले. त्याची योग्य निगा व देखरेखीचा परिणाम असा झाला की, एका वर्षातच शेळयांची संख्या ३ वरून ७ वर गेली. काही स्वकष्टातून विकत घेवून १० ते १२ शेळयांवर त्यांचे पोषण सुरू आहे. या व्यवसायातून वर्षाकाठी सुचिताबाईंना ४५,०००/- रू. नफा होतो. आज १५ शेळया, १ बोकड त्यांचेकडे आहे. आपल्या व्यवसायासंबंधी इतरांना सांगतांना त्यांचा आनंद द्विगुणीत होतो. डॉ. कुरळकरांचे आभार व्यक्त करतांना त्यांचा कंठ दाटून येतो.

श्रीमती सुचिताबाई सुरेश धनबहादुर
रा. टाकळी ता. बाळापुर जि. अकोला

मार्गदर्शक :
डॉ एस.व्ही. कुरळकर
सहयोगी प्राध्यापक,
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला







शेळी पालनातून घेतली भरारी

श्री साठे यांच्या घरची परिस्थिती फारच हलाखीची असल्यामुळे सैरभैर मन:स्थितीत असतांना मिळेल ते काम करण्याची मानसिक तयारी त्यांनी केली. शेतात राबणे, उन्हातान्हात कष्ट करून कसा तरी प्रपंच सांभाळणे त्यांच्या नशिबी होते, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. डॉ. एस. व्ही. कुरळकर, प्रकल्प प्रमुख, पशुअनुवांशिकी व प्रजनन विभाग स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला यांची भेट साठे गावांतील बकऱ्या चारायला नेत असतांना झाली. त्यांनी त्यांची आस्थेवाईक विचारपूस केली असता शेळयाबाबत त्यांना असलेली माहिती आणि काही तरी करायची जिद्द, जिज्ञासा साठेत असल्याचे त्यांना जाणवले असल्यामुळे 'बेरारी जातीच्या शेळयांचे संगोपन तंत्रज्ञानाचे ग्रामस्थांना प्रात्यक्षिक व प्रशिक्षणाद्वारे प्रसारण' जैवतंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली तर्फे पुरस्कृत प्रकल्पाअंतर्गत लाभार्थी म्हणून डॉ कुरळकर यांनी साठेंची निवड केली. त्यांना ५ दिवसाचे शेळी पालनाचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणामध्ये शेळीपालन याची माहिती तांत्रिक तज्ञांद्वारे दिल्यानंतर उपरोक्त प्रकल्पाअंतर्गत त्यांना दोन शेळया व एक बोकड देण्यात आले. त्यात पुन्हा त्यांनी दोन शेळया उपरोक्त जातीच्या विकत घेतल्या आणि पाहता पाहता एका वर्षात त्यांच्याकडे १५ शेळयांचा कळप तयार झाला. या व्यवसायातून वर्षाचे उत्पन्न म्हणुन ५०,०००/- रू नफा झाला. या नफ्यातुन ते प्रपंचाची जबाबदारी नेटाने पार पाडत असल्यामुळे सुखी, समाधानी व सन्मानाने जीवन जगताहेत. याच उत्पन्नातून त्यांनी शेळयांसाठी कच्चा गोठा देखील तयार केला आहे. या उपक्रमातून संसाराची घडी सुव्यवस्थित करून दिल्याबद्दल साठेंनी डॉ कुरळकर, संस्था आणि विद्यापीठाचे सदैव ऋणी राहू असेही त्यांनी म्हटले.

श्री प्रल्हाद जाणू साठे
रा. कडोशी ता. बाळापुर जि. अकोला

मार्गदर्शक :
डॉ एस.व्ही. कुरळकर
सहयोगी प्राध्यापक,
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला





धर्माळा स्वच्छता.. एक स्तुत्य कार्यक्रम

पशुधनाचे आरोग्य चांगले राहावे, पर्यायाने ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत व्हावी, या हेतूने अकोला जिल्ह्यातील गावांमध्ये उपलब्ध असलेले धर्माळे/पाणवठे ज्याठिकाणी लहान-मोठी जनावरे सामुहिकरित्या पाणी पितात. अशा धर्माळ्यांची पाहणी केली असता सामान्यत: असे आढळून आले की, हे सर्व धर्माळे/पाणवठे यांची अवस्था इतकी वाईट आहे की, धर्माळ्यामध्ये असलेल्या पाण्यात शेवाळ, प्लॅस्टीक पॉलीथिन, खिळे, गोटे, खडे आढळून येतात. धर्माळा सभोवतालच्या परीसरात घाणीचे साम्राज्य दिसते. धर्माळ्याच्या पाण्यात, बरेचशे गावकरी कपडे, फवारणी यंत्रे, अन्य सामुग्री सुध्दा धुतात. त्यामुळे पशुआरोग्यावर त्याचा अनिष्ठ परिणाम होतो, पशुपालकांचे आर्थिक नुकसानही होते.

जनावरांना अशा दुषित धर्माळयातील पाण्यामुळे कृमिबाधा, जंतबाधा, पचनाचे विकार, चर्मरोग, पोटफुगी (पानफुगी), संसर्गजन्य रोग ईत्यादि बाधा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच त्याचा उत्पादनावर तथा प्रजोत्पादनावर परिणाम होतो. इतकी दुरावस्था धर्माळयाची झाली आहे. दुर्लक्षीत झालेल्या धर्माळ्याची कशी काळजी घ्यायची ते लक्षात आल्यावर स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला व आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील निवडक तालुक्यातंर्गत काही गावांमध्ये वरील विषयाच्या अनुषंगाने धर्माळा स्वच्छता अभियानाअंतर्गत मोहिम सुरू केली. त्यामध्ये साफसफाई करून सभोवतालचा परीसर स्वच्छ करणे, पाणी साचणार नाही याची काळजी घेण्यासाठी तिथे मुरूम टाकणे, चुण्याने रंगरंगोटी करणे इत्यादि कामे करण्यात आली. श्री. जी. श्रीकांत, मा. जिल्हाधिकारी, अकोला यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित आत्मा नियामक मंडळाच्या सभेमध्ये यशस्वीपणे राबविलेल्या मोहिमेचा आढावा डॉ. मिलींद थोरात यांनी सादर केला असता सदर विषयांचे गांभीर्य लक्षात घेता मा. जिल्हाधिकारी, अकोला यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना धर्माळा स्वच्छता अभियान संपुर्ण जिल्ह्यात राबविण्याचे सुचित करून त्याअनुषंगाने महिन्याकाठी क्षेत्रीय अधिकारी यांच्या कडुन प्राप्त होणाऱ्या मासिक अहवालामध्ये धर्माळा स्वच्छता विषयी अहवाल समाविष्ट करण्याचे आदेश दिले.

सदर कार्यक्रमांतर्गत अकोला जिल्ह्यातील ३९९ गावांमध्ये धर्माळा स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली. उपरोक्त विषयासंदर्भात गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले. याबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून मासिक अहवाल नियमितपणे सादर करण्यात येत आहे.

जि. अकोला

मार्गदर्शक :
डॉ. एम. जी. थोरात, विभाग प्रमुख,
पशु शल्यक्रियाशास्त्र व क्ष-किरण विभाग,
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला







कुक्कुटपालनाचा तरूण उद्योजक

श्री. गौरव हे तंत्रनिकेतनचे विद्यार्थी असून त्याचे आई वडील शेती करतात. शेतीला जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन करायचा निश्चय केला आहे. त्यासाठी नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत आवश्यक पाच दिवसाचे प्रशिक्षण घेतले. उपरोक्त व्यवसायासंबधी काही माहिती नसतांना गौरव साठी हे प्रशिक्षण फार उपयोगी ठरले. पक्ष्यांचे लसीकरण, व्यवस्थापन, मार्केटींग सारखी माहिती प्रशिक्षणातून मिळाली.

बॅकेचे किंवा शासकिय अनुदानाचा लाभ न घेता स्वत: ४,५०,०००/- रू भांडवल गुंतवणुक करुन १००० चौरस फुट क्षेत्रफळ असलेल्या जागेवर शेड उभारून त्यांनी १०० पक्ष्यांपासून व्यवसायाला सुरूवात केली. आज गौरव मेश्राम यांचेकडे १००० ब्रॉयलर पक्षी असून प्रति बॅच रू. १५,००० ते १८,००० एवढा नफा त्यांना होतो. आई-वडीलांसोबत एक कामगार सुध्दा या व्यवसायात सहकार्य करतो.

या व्यवसायात पक्षांची विक्री करण्याची थोडी अडचण असल्याचे गौरव यांनी सांगीतले. भविष्यात व्यवसाय वाढविण्याचा मानस असून या तरुण उद्योजकाने जे यश संपादन केले आहे, त्याचे श्रेय आई-वडीलांसोबत डॉ. कदम यांना दिले आहे. नवं आव्हान, नवीन धोके, नवं यश पेलायला हे तरूण खांदे पुढे सरसावत आहेत. आज प्रत्येक क्षेत्रात अशाच तरूणांची गरज आहे.

श्री गौरव मेश्राम
रा. अडयाळ टेकडी, नागभीड रोड, ब्रम्हपूरी

मार्गदर्शक :
डॉ. एम. एम. कदम,
सहायक प्राध्यापक,
नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर







विद्युत अभियंत्यांने कुक्कुटपालनातून विकास साधला

श्री फैयाज नाजिन हे अभियांत्रिकी (विद्युत) शाखेचे अभियंता आहेत. कुक्कुटपालनातुन मिळणारा नफा लक्षात घेता हा व्यवसाय करावा असा निश्चय त्यांनी केला. त्यानुसार एप्रिल २०१६ पासुन त्यांनी व्यवसायास सुरुवात केली. ५००० चौरस फुट एवढया जागेत (मोहपा, ता. कळमेश्वर) येथे शेड उभारून व ४३०० पक्ष्यांपासून सूरूवात केली. त्यासाठी त्यांना १४ लाख एवढा खर्च करावा लागला. त्यांनी कोणत्याही सरकारी योजनेचा लाभ घेतला नसून स्वखर्चातून या व्यवसायाची उभारणी केली.

नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयातील कुक्कुटपालन शास्त्र विभागाअंतर्गत ऑगस्ट २०१६ मध्ये ५ दिवसाचे प्रशिक्षण घेतले. त्यामुळे पहिल्या बॅचच्या वेळी झालेला मृत्युदर नंतरच्या बॅचेसमध्ये कमी झाला व व्यवस्थापनही कमी झाले. त्यांच्या फार्मवर १ कामगार काम करतोय. साधारणत: ४०,००० रुपये इतका नफा प्रत्येक बॅचला होतो.

उपरोक्त व्यवसायात त्यांनी जे यश संपादन केले आहे. त्याचे संपूर्ण श्रेय नाजिन यांनी त्यांच्या आई-वडीलांना दिले आहे. भविष्यामध्ये देशी पक्षी पालन करण्याची त्यांची मनिषा आहे.

श्री फैयाज नाजिन,
मोहपा, ता. कळमेश्वर

मार्गदर्शक :
डॉ. एम. एम. कदम,
सहायक प्राध्यापक,
नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर





इंजिनिअरींग डिप्लोमा धारकाने वराह पालन व्यवसायात घेतली उंच भरारी

श्री गोपाल सुराल यांना मेकॅनिकल इंजिनियरिंगचा डिप्लोमा घेऊन सुध्दा नोकरी मिळत नव्हती. वडील टेल्को कंपनीतुन सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांना नोकरीची नितांत गरज होती तेव्हा काहीतरी व्यवसाय करावा या शोधात असतांना त्यांना डॉ. बिराडे यांचे मार्गदर्शन लाभले आणि त्याच वेळेस त्यांना स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडुन मदत मिळाली. वराहपालन व्यवसाय करायचा म्हटला तर तो गावापासुन लांब, जिथे शेती वगैरे काही नसेल, एकंदरीत जागा मोकळी हवी, रस्त्या नजीक हॉटेल असेल तरी चालेल कारण हॉटेल मधील उष्टावळ मिळेल, अशा जागेच्या शोधात सुराल होते. जागा शोधतांना त्यांना त्रास जाणवत होता. परंतु खचुन न जाता डोंगरावर ५ गुंठे जमिन भाडेपट्ट्यावर मिळाली आणि त्यांनी व्यवसायाला सुरूवात केली. त्या दरम्यान २००७ ला क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकिय महाविद्यालय, शिरवळ येथे प्रशिक्षण घेण्यासाठी १०००/- रू फी भरून एका दिवसाचे प्रशिक्षण घेतले. पाहता-पाहता उपरोक्त व्यवसायात २००८ मध्ये वर्षाकाठी ७ ते ८ लाख रू नफा झाला. त्यानंतर त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मी सुराल यांनी क्रांतिसिंह नानापाटील पशुवैद्यकीय महाविद्यालयात राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत ५ दिवसांचे निवासी प्रशिक्षण घेतले. त्यांना या प्रशिक्षण अंतर्गत डुरॉक व लार्जव्हाईट, यॉर्कशायर या प्रजातीच्या संकरापासुन तयार झालेली ६ पिल्ले त्यांना देण्यात आली. सुरालकडे सध्या लार्जव्हाईट, यार्कशायर, डुरॉक व संकरीत प्रजातीच्या १०० मादया व ८ नर डुकरे आहेत. या सर्व जनावरांना हॉटेलची उष्टावळ खाऊ घालावी लागते. त्यांना दररोज ४ ते ५ क्विंटल उष्टावळ लागते. उष्टावळ आणण्यासाठी साधन म्हणुन जीप आहे. उष्टावळ वर महिन्याकाठी रू ३५,०००/- एवढा खर्च होतो. सुराल यांना डुक्करे धुणे, त्यांना खाऊ घालणे, औषधोपचार करणे ईत्यादि कामे स्वत: करावी लागतात. इतर कामासाठी त्यांच्याकडे ५ मजुर आहेत, त्यांना महिन्याकाठी १०,०००/- रू. पगार द्यावा लागतो.

त्यांच्याकडे असलेल्या १०० मादयांपासुन वर्षाला १५०० पिल्ले मिळतात. एका डुकराचे ८ महिन्यात १०० किलो वजन वाढते. जिवंत डुक्कर कमीत कमी ६० रू. प्रतिकिलो भावाने जागेवरच विकल्या जातो म्हणजे एका १०० किलो वजनाच्या डुकराची किंमत ६०००/- रू एवढी असते. त्यामुळे वार्षिक उलाढाल ५० ते ६० लाख दरम्यान होते. सुराल शेतकऱ्यांना पैदाशीसाठी पिल्ले विकतात, मार्गदर्शन ही करतात आवश्यकता भासल्यास शेतकऱ्यांची इच्छा असल्यास फार्मवर ३ ते ४ दिवस प्रत्यक्ष काम करवुन, अनुभव घेऊ देतात. त्यानंतर उपरोक्त महाविद्यालयात प्रशिक्षणासाठी पाठवतात. त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मी सुराल या विक्री आणि आर्थिक व्यवहार सांभाळतात. वराहपालनास भविष्यात वाव आहे, कारण वराहाचे मांस खाणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

श्री गोपाल सुराल
रा. बेबोडोह, ता. मावळ,जि.

मार्गदर्शक :
डॉ. हे. शं. बिराडे,
सहयोगी अधि□ठाता,
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला






मत्स्य विज्ञान महाविद्यालय,उदगीरच्या दत्तक गावामधील मत्स्यसंवर्धनाची यशोगाथा

सन् २०१५-१६ यावर्षी उदगीर तालुक्यातील नावंदी या गावाचा मत्स्यसंवर्धनातून विकास व्हावा, या हेतूने हे गाव तांत्रिक मार्गदर्शनासाठी मत्स्यविज्ञान महाविद्यालय, उदगीरने दत्तक घेतले. श्री. ब्रम्हाजी केंद्रे या नावंदी गावातील प्रगतीशील शेतकऱ्याने फळबागेसाठी पाण्याचा पुरवठा करण्याच्या हेतूने सोय म्हणून ४४ मी. x ४४ मी. या आकाराच्या शेततळयांची निर्मिती केली. हया शेततळयाचा अवलंब मत्स्यपालनासाठी करता यावा म्हणून उपरोक्त महाविद्यालयातील तज्ञ व्यक्तीकडून श्री. केंद्रे यांनी प्राथमिक ज्ञान घेतले. १० जुलै २०१५ रोजी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या शेतकरी कार्यशाळेत सहभागी होवून अधिक मार्गदर्शन प्राप्त केले. या मार्गदर्शनाचा वापर करून शेततळयामध्ये मत्स्यसंवर्धन करायचेच असा पक्का मनसुबा केला. मत्स्यपालना दरम्यान बीज, जल, खाद्य, विक्री इत्यादिंचे व्यवस्थापन कशा पध्दतीने करायचे याबाबत अनुभव शुन्य असल्यामुळे अनेक प्रश्न केंद्रे यांच्या मनाला बेचैन करीत होते. परंतु मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचे तत्कालीन अधिष्ठाता डॉ. ए. पी. सोमकुंवर यांच्या पाठींब्यामुळे आत्मविश्वास बळावण्यास मदत झाली. महाविद्यालयामधील सहाय्यक प्राध्यापक श्री. एस. आर. यादव, प्रयोगशाळा सहाय्यक श्री. बी. एस. चौधरी व इतर तज्ञ व्यक्तींच्या वेळोवेळी मार्गदर्शन व प्रोत्साहनामुळे त्यांनी शेतळयांमध्ये मत्स्यपालन सुरू केले.

श्री. केंद्रे यांनी ऑगस्ट महिन्यामध्ये पंगस जातीचे अंदाजीत १५००० अर्धबोटूकली आकारमानाचे मत्स्यबीज शेततळयामध्ये संचयित केले. मत्स्यविज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापकांनी नियमित भेट देवून जल, खाद्य, व विक्री व्यवस्थापन याबाबत सखोल असे मार्गदर्शन केले. त्यानुसार शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन केलेमुळे माश्यांना उत्तम विक्रीसाठी समाधानकारक बाजारभाव मिळाला.

माश्यांना योग्य भाव मिळावा म्हणून मासे एकदाच न पकडता टप्प्या-टप्प्याने पकडले व त्याची विक्री जिवंत अवस्थेत गाव परिसरात केली जाते. मे महिन्यामध्ये माश्यांचे वजन अर्धा ते पाऊन किलो एवढे होते. संवर्धनाअंती एकंदरीत ६ टन एवढे मत्स्योत्पादन मिळाले. संवर्धनासाठी एकूण रूपये ३.५ लाख एवढा खर्च आला. त्यामधून त्यांना रूपये ७.२ लक्ष एकूण उत्पन्न झाले. म्हणजेच निव्वळ नफा रू. ३.७ लक्ष इतका झाला. सोबतच त्यांनी ३२०० शेवगा, १६०० आंबे, ५८० लिंबू आणि २३१ नारळ या झाडांची लागवड केली आहे. मत्स्यसंवर्धनामधुन निचरा केलेल्या पाण्याचा बागायतीसाठी अनुकूल परिणाम होत असल्याचे त्यांचे मत आहे.

नावंदी गावातील पहिलेच यशस्वी शेतकरी म्हणुन केंद्रे ज्यांनी उदगीर परिसरामध्ये शेततळयाचा वापर करून मत्स्यसंवर्धनाच्या माध्यमातून दुष्काळी परिस्थितीवर मात केली. त्याची माहिती इतर शेततळीधारकांना मिळाल्यामुळे चालू वर्षी अनेकांनी शेततळयामध्ये मत्स्यसंवर्धन सुरू केले आहे.

श्री. ब्रम्हाजी केंद्रे
मु.पो. नावंदी ता. उदगीर जि. लातूर

मार्गदर्शक :
श्री. एस.आर. यादव, श्री. यु. ए. सुर्यवंशी
सहाय्यक प्राध्यापक,
श्री. बी. एस. चौधरी, प्रयोग शाळा सहाय्यक,
मत्स्यविज्ञान महाविद्यालय, उदगीर






जलाशयातील शाश्वत मत्स्यव्यवसायातून उद्योजकता विकास

जिद्दीच्या बळावर चंदु पाटील नावाचा उच्चशिक्षित युवक विदर्भातील मत्स्यव्यवसायामध्ये नेत्रदिपक यश मिळवत आहे. उद्योगातून स्वयंरोजगाराची कास धरू पाहणाऱ्या युवकांना प्रेरणादायी ठरावे असे मोलाचे काम हा युवक विदर्भामध्ये करतो आहे, हे अभिमानास्पद आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर चालून आलेली नोकरीची संधी झुगारून त्यांनी उद्योजक होण्याचे ठरविले. नोकरीतून क्रमप्राप्त असलेली दुसऱ्याची गुलामी करण्यापेक्षा उद्योजक होऊन अर्थाजन करण्यासाठी आणि स्वत:चा वेळ भरीव कार्याकरीता व्यतीत करण्याकरीता त्यांनी स्वबळावर मत्स्यव्यवसायात पदार्पण केले. मत्स्यव्यवसाय हा एक फायदेशीर व्यवसाय असून शेतीला पुरक मुख्य व्यवसाय अशा दोन्ही पद्धतीने करता येतो, हे त्यांनी जाणले. या व्यवसायात उद्योजकतेला असलेली प्रचंड संधीही त्यांनी ओळखली.

राज्य शासनाच्या कृषि विकास योजनेंतर्गत १०० ग १०० फुट आकाराचे शेततळे वडीलोपार्जित शेतीत खोदून त्यांनी मत्स्यसंवर्धनास सुरूवात केली. यावेळी शास्त्रोक्त पद्धतीने मत्स्यसंवर्धन कसे करावे, याविषयीचे मार्गदर्शन त्यांना महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत असलेल्या मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथिल तज्ञांकडून मिळाले. शेततळ्यातील मत्स्यसंवर्धनातून मिळालेला नफा आणि अनुभव या आधारावर गावाशेजारील पाझर तलाव तसेच जिल्हा परिषद अंतर्गत असलेले काही लहान तलाव भाडेपट्टीवर घेऊन त्यामध्ये मत्स्यसंवर्धनावर आधारीत व्यवसायात त्यांनी जम बसवला. पूर्वापार परंपरागत पद्धतीने करण्यात येत असलेल्या या व्यवसायामध्ये मत्स्य जिऱ्याच्या ऐवजी मत्स्य बोटुकली आकाराच्या बिजांचे संचयन, माशांसाठी कृत्रीम खाद्याचा वापर आणि पाण्याचे योग्य व्यवस्थापन या शास्त्रीय बाबींचा त्यांनी कटाक्षाने अवलंब केला. प्रारंभी छोट्या स्वरूपात सुरूवात केलेल्या मत्स्यव्यवसायास अधिक वृद्धींगत करण्याची संधी त्यांना लवकरच मिळाली. राज्य शासनाने जलाशयातील मत्स्यव्यवसायामध्ये खासगी उद्योजकतेला चालना देण्याचे ठरविले आणि या योजनेअंतर्गतच त्यांनी विदर्भातील वर्धा जिल्ह्यात येथे अस्तित्वात असलेला सुमारे २००० एकर आकाराचा बोरधरण जलाशय महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विकास महामंडळाकडून २०१६ ते २०२१ या कालावधीकरीता 'जलाशयामध्ये बंदिस्त पिंजऱ्यातील मत्स्यसंवर्धन व खुले मासेमारी करीता भाडेपट्टीवर घेतला.

पिंजऱ्यातील मत्स्यसंवर्धनासाठी मुख्यत: ६ ग ४ ग ५ मिटर आकाराचा आणि एच.डी.पी.ई. जाळीचा पिंजरा उपयोगात येतो. प्रत्येक पिंजऱ्यामध्ये सुमारे ३० ग्रॅम वजनाचे तिलापीया अथवा पंगॅसिअस माशांचे बिज प्रति पिंजरा ४,००० बोटुकली या प्रमाणात संचयीत करण्यात येते. ३१ ते १०० ग्रॅम वजनाच्या बोटुकल्यांसाठी २ मि.मि. आकाराचे तयार मत्स्यखाद्य नंतर १०१ ते ४०० ग्रॅम पर्यंत वजनाच्या माशांना ३ मि.मि. आकाराचे खाद्य आणि त्यापुढील वजनाच्या माशांकरीता ४ मि.मि. आकाराचे सरासरी २२ ते ३२ टक्के प्रथिने असलेले तरंगते तयार मत्स्यखाद्य वापरण्यात येते. पुरक खाद्यामुळे माशांची जलद वाढ होते आणि उद्योजकांना चांगला आर्थिक लाभ होतो. साधारणत: १० महिन्याच्या कालावधीत तिलापीया माशांची ५०० ते ७५० ग्रॅम आणि पंगॅसिअसची ७५० ते १००० ग्रॅम अशी वाढ अपेक्षित असते. माशांची वाढ बाजारातील मागणीनुसार झाल्याची खात्री केल्यावर घाऊक विक्रेत्यांशी चर्चा करून योग्य भाव मिळाल्यास मासेमारी करून माशांची विक्री केली जाते. या योजनेत मोठा प्रकल्प असल्यास स्थानिक मासेमारांना मुलभूत सुविधा उदा. ५ टन बर्फ कारखाना, शितगृह, मत्स्यविक्री केंद्र, शितवाहन इत्यादि बाबी उपलब्ध होऊ शकतात.

पिंजरा पध्दतीतील सर्वात खर्चिक बाब म्हणजे पिंजरा बांधणी. व्यवसाय म्हटला तर आर्थिक बाजु भक्कम असणे गरजेचे असते. परंतु त्यांनी कशाचीही तमा न बाळगता हे साध्य केले. पिंजऱ्यातील संवर्धनासाठी माशांना कृत्रिम तरंगणारे मत्स्यखाद्य





माशांच्या वजनाच्या प्रमाणात दोन किंवा तीन समभाग करून दिवसातून दोन किंवा तीन वेळा देणे, पंधरा दिवसाच्या फरकाने माशांची वाढ तपासणे व त्यानुसार खाद्य व्यवस्थापन करणे, पिंजऱ्याच्या जाळीला लागलेले शेवाळ व कवचधारी प्राणी साफ करणे आणि मासोळीवर रोगांचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास तज्ञांच्या सल्ल्यानुसार औषधोपचार करणे, या बाबी ते मत्स्य व्यवसायीकांना आवर्जुन सांगतात.

पाटील यांनी जलाशयांमध्ये माशांचे संवर्धन या संकल्पनेवर आधारीत सुधारीत मत्स्यव्यवसायाचा अंगीकार केल्यामुळे त्यांना वैयक्तिक लाभ झाला आहेच, शिवाय तेथील स्थानिक ६०० ते ७०० लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे. मच्छिमारांना मासेमारीचे सुधारीत तंत्रज्ञान अवगत व्हावे यादृष्टीने जाळी बांधणी, जाळी वापरण्याच्या पद्धती व लाईफ जॅकेटस्चा वापर याविषयाचे प्रशिक्षणही देण्यात येते. तलावामधील हंगामी मत्स्य व्यवसायाचे स्वरूप आज त्यांच्या प्रयत्नांमुळे पूर्णकालीन आणि वर्षभर उत्पन्न देणारा व्यवसाय, असे झाले आहे. यामुळे स्थानिक लोकांना उपजिविकेसाठी इतरत्र भटकण्याची गरज वाटत नाही. मासे प्रथिनयुक्त खाद्य असल्यामुळे मागासभागातील कुपोषणग्रस्तांना सकस आहाराची उपलब्धता या व्यवसायामुळे वाढली आहे.

मत्स्यबिजासाठी बाहेरील राज्यांवर अवलंबून राहावे लागते. यावर पर्याय म्हणून त्यांनी स्वत:च मत्स्यबिज निर्मिती क्षेत्रात उतरण्याचे ठरविले आहे. जेणेकरून त्यांच्याकडील जलाशयांमध्ये संचयनासाठी आवश्यक मत्स्यबिज उपलब्ध होऊ शकेल आणि इतर व्यवसायीकांनाही ते पुरवता येईल. मासेमारी केल्यानंतर माशांना तात्काळ बाजारपेठेमध्ये विक्रीसाठी न्यावे लागते ज्यामध्ये उत्पादकांना बाजारभावाशी तडजोड करावी लागते. ही समस्या ओळखून जलाशयालगतच शितगृहाची उभारणी तसेच मासे वाहतूकीसाठी शितवाहनाची सोय करण्याचे त्यांनी ठरविले आहे. गोड्या पाण्यातील माशांची महाराष्ट्रात इतरत्र आणि बाहेरील राज्यात विक्री व निर्यात करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला आहे. आजच्या घडीला त्यांना या व्यवसायात भरभरून प्रतिसाद मिळत आहे व भविष्यात या उद्योगाला क्लस्टर व मोठ्या इंडस्ट्रीजचे रूप देवून मोठ्या प्रमाणात ग्रामीण क्षेत्रातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा संकल्प आहे.

महाराष्ट्राच्या एका लहानशा खेडयातील शेतकरी कुटुंबातुन आलेला एक सर्वसामान्य तरूण केवळ दुर्दम्य आत्मविश्वास, प्रचंड इच्छाशक्ति आणि जिवापाड मेहनत करण्याची तयारी या बळावर एवढे मोठे यश मिळवतो हे खरोखरच कौतुकास्पद आहे. त्यांनी शुन्यातून विश्व निर्माण केलं ते त्यांच्या अपार कष्टातून व जिद्दीतून. ही केवळ एका यशस्वी मत्स्यव्यवसायीकाची गाथा नसून काहीच हाती नसतांना आणि कोणतीही पार्श्वभूमी नसतांना केवळ जिद्दीच्या जोरावर मत्स्यव्यवसायामध्ये उत्तुंग यश प्राप्त केलेल्या युवा उद्योजकाची यशोगाथा आहे. उपरोक्त प्रकल्पाकरिता ज्यांनी-ज्यांनी त्यांना प्रोत्साहित केले त्या सर्वांचे ते ऋणी आहेत. भविष्यात औद्योगिक स्वरूपाचा मत्स्यव्यवसाय प्रकल्प उभा करण्याचा त्यांचा मानस आहे.

श्री. चंदु दौलतराव पाटील
रा. धानोली ता. कारंजा (घा) जि. वर्धा

मार्गदर्शक :
डॉ. प्रशांत ए. तेलवेकर
सहाय्यक प्राध्यापक,
मत्स्यविज्ञान महाविद्यालय, नागपूर



माफसु यशोगाथा

संरक्षक

प्रा. ए. एम. पातुरकर
कुलगुरु

संपादकीय मंडळ

डॉ. ए. पी. सोमकुवर
संचालक, विस्तार शिक्षण व प्रशिक्षण

डॉ. जी. व्ही. दुमे
तांत्रिक अधिकारी

डॉ. एस. पी. लांडगे
सहा. प्राध्यापक, विस्तार शिक्षण व तांत्रिक अधिकारी

श्री. पी. एम. बागडे
कनिष्ठ लघुलेखक

शब्दांकन

श्री प्रभाकर सोमकुवर
कवि समिक्षक, नागपूर

प्रकाशक

विस्तार शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर- ४४० ००१



महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर ४४० ००१

फोन नं : ०७१२—२५११७८४,२५११७८५

फॅक्स : ०७१२—२५११२८२,२५११२७३

ईमेल : registrarmafsu@yahoo.com संकेतस्थळ : www.mafsu.in

टोल फ्री क्र. : १८००—२३३—३२६८